# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा.विशेष महासभा दि. २४/०२/२०१६

आज बुधवार दि. २४/०२/२०१६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.३०वाजता सभा सुचना क्र. १० दि. १७/०२/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ६) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ७) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ८) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ९) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| १०) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ११) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १४) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १५) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १६) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १७) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १८) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १९) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २०) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २१) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २२) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २३) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २४) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २५) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २६) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २७) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| २८) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३०) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३१) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३२) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३३) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३४) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३५) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३६) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३७) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३८) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३९) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४०) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४१) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४२) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४३) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४४) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४५) | लियाकत ग. शेख | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४६) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ४७) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ४८) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४९) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ५०) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५१) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ५२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५३) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | सदस्या |
| ५४) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ५७) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ५८) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ५९) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६०) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६१) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६२) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६३) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६४) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६६) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ६७) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ६८) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ६९) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७०) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ७१) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७२) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७३) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ७४) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ७५) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |
| | <u>गैरहजर सदस्य –</u> | |
| १) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ४) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ५) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ८) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ९) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| १०) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ११) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| १२) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| १३) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| १४) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| १५) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| १६) | भोईर भावना राजू | सदस्या |
| १७) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| १८) | सुमबंड महरुन्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| १९) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| २०) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

रजेचा अर्ज –निरंक

नगरसचिव :-

सर्वांनी राष्ट्रगीतासाठी जागेवर उभे रहायचे आहे.

मा. महापौर :-

पहले मैं मिटींग चालु करने की तो घोषणा करु पर आप सभी को यह सूचना की स्टेम प्राधिकरण से दो अधिकारी मिलने आए है तो आयुक्तजी का और मेरा वहाँ होना बहुत जरुरी है। इसलिए मिटींग मैं १५ मिनिट के लिए तहकुब करती हूँ। १५ मिनिट के बाद फिर हम मिटींग के लिए मिलेंगे।

हंसुकुमार पांडे :-

महापौर मॅडम लेकिन उनको यहाँ पे बुलाइए ना। हम लोगो को पता चलना चाहिए ना क्या प्रॉब्लेम है।

भगवती शर्मा :-

कौन है यह मॅडम?

मा. महापौर :-

वो हमें जवाब देंगे। दे आर नॉट आन्सरेबल टू यू ऑल.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम से बडे है क्या वो?

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा बुधवार दि. २४/०२/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका,स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. १०, दि. १७/०२/२०१६ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.प्रकरण क्र. १६३, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चित्रिकरणासाठी मराठी मालिका व चित्रपट यांच्याकडून आकारण्यात येत असलेल्या भाड्यात व नगरभवन वापराच्या सवलत भाड्यात देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरादेवी यादव :-

महापौर मॅडम आपके इजाजत से में बोल रही हूँ। कमिशनर साहब १८ तारीख का अपना बी.एस.यू.पी. का विषय उठायी थी। तो हमको एक हफ्ता का टाईम दिया था आज यह दुसरी महासभा २४ तारीख की है। अभीतक एक भी काम वहाँ पे चालू नही है। अब उन गरिब जनता को जवाब क्या दूँ। आप अच्छा अच्छा आश्वासन दिए। घर खाली कराने का जब समय हुआ उनका बस यही जवाब से हमने १८-२४ महिने में घर बनाके देंगे और जो खाली नही करेगा घर उसके उपर कारवाई करेंगे। आज किसके उपर कारवाई होना चाहिए। आज जनता के उपर कारवाई होनी चाहिए की प्रशासन के उपर कारवाई होना चाहिए। आप २०१२ में घर खाली किए है। अभी कुछ लोग ऐसे है की उनको अभी तक चेक नही दिया गया है। वो दरदर भटक रहे है। जब नही क्षमता थी तो गरिब जनता को क्यों सताए क्यों उनका घर खाली कराए। आज दुनिया भर की योजना लाने के लिए आप प्रयास कर रहे है मगर एक योजना पूरा नही कर पाए। दुसरा योजना कैसे मिरा भाईंदर शहरवासियों को पूरा करके देंगे।

मा. आयुक्त :-

खांबित साहब उत्तर दे रहे है।

दिपक खांबित :-

मा. महापौरांच्या परवानगीने थोडा आर.सी.सी. ड्रॉईंग येण्यामध्ये विलंब झालेला आहे. म्हणून कामास विलंब झाला आहे. आर.सी.सी. ड्रॉईंग अभी ग्राऊंड प्लस १६ का पूरा आ गया है कन्स्लटन्ट से।

मिरादेवी यादव :-

जो आया है नही आया है कभी आनेवाला है और किस दिन से काम चालू होगा। किस दिन आपका हर हफ्ता ड्रॉईंग प्लान चालू हर हफ्ता संदेश मिल रहा है। कभी ड्रॉईंग आने वाला है, या प्लान आने वाला है तो किस दिन यह आनेवाला है। किस दिन से यह काम शुरु होगा और किस दिन लास्ट होगा। आज मुझे लिखित मैं चाहिए नही तो आज की महासभा चलने नही दूँगी। आज हमको लिखीत मैं चाहिए।

दिपक खांबित :-

ठिक है लिखित में दे देंगे।

मिरादेवी यादव :-

लिखित में आज के आज, अभी के अभी चाहिए। बाद ही महासभा चलेगी।

दिपक खांबित :-

लिखित में दे देंगे।

मिरादेवी यादव :-

दे कैसे देंगे। जनता के सामने मजाक हो रहा है क्या? आज धूप से साप आया घर में बैठ गए है उधर कुछ तरस रहे है कुछ इधर तरस रहे है। कुछ लोग की अभी तक रेंट नही मिला वो दर दर भटक

रहे है। तीन साल हो गया। १८ महिना मुझे टाईम दिया गया था की १८-२४ महिने मैं घर बनाके देंगे। आज २०१२ से २०१६ चल रहा है। जब ये ड्रॉईंग यह प्लान नही था तो उनका घर नही खाली कराना चाहिए। जब आपका प्लान पुरा हो जाता तभी घर खाली करा देते।

सुरेश खंडेलवाल :-

खांबित सर वो लिखित में मांग रहे है और वो लिखित में देने के लिए तयार है तो आप उनको दे दिजिए और महासभा शुरु किजीए।

मिरादेवी यादव :-

मिटिंग चालु तब ही होगी जब हमें लिखित में मिलेगा।

दिपक खांबित :-

ठिक है लिखित में जवाब देंगे एक घंटे में।

मा. महापौर :-

मिरादेवी आपको अधिकारी एक घंटे के अंदर लिखित में जवाब दे रहे है। और एक घंटे में अगर आपको जवाब नही मिले तो आप फिर.............

मिरादेवी यादव :-

हम एक घंटे तक खडे रहते है।

मा. महापौर :-

मिरादेवीजी आप तब तक बैठिए।

अनिल भोसले :-

मॅडम लिहून काय देणार? कमिशनर साहेब मला एक सांगा गेल्या महासभेमध्ये आपण काम चालू करण्यासाठी आपण चर्चा केली. एक महिना निघून गेला यासाठी.

मा. महापौर :-

अनिलजी मिरादेवीने यह सब विषय बोल दिया है। आपके पास कुछ नया है क्या?

अनिल भोसले :-

मिरादेवी जे बोलल्या त्यावर काय लिहून देणार याचा आम्हाला खुलासा करा.

मा. महापौर :-

ते देताय ना तुम्हाला कधी चालू करणार.

अनिल भोसले :-

प्रशासन काय करणार हे तीन वर्ष झाले ऐकतो आहे.

मा. महापौर :-

ऐकताय ना आता लिखित देता तुम्हाला.

अनिल भोसले :-

नाही पण काय लिहून देणार ते खुलासा करा ना.

दिपक खांबित :-

जुलै २०१५ मध्ये जी महासभा झाली त्यामध्ये निर्णय झाले त्यानुसार आम्ही संबंधित त्या बिल्डींगचे प्लान रिव्हाईज केले आणि ठेकेदारांना रिव्हाईज रेट करुन दिले. त्यांना रिव्हाईज प्लान करुन दिले त्यानुसार ते काम सुरु करायला तयार असल्यामुळे त्यांनी सर्वांनी संमती दिली त्यानुसार ते काम सुरु करतात त्यांना आर.सी.सी. ड्रॉईंग देण्यामध्ये विलंब झाला. आम्ही पहिले त्यांना ड्रॉईंग दिले होते फाऊंडेशन प्लस ४ माळ्यापर्यंत दिले होते ते बोलतात आम्हाला पूर्णच पाहिजे. त्यांना ग्राऊंड प्लस १६ आणि पाण्याची टाकी पर्यंतचे सगळे आर.सी.सी. ड्रॉईंग हे दिलेले आहेत ८ दिवसांपूर्वीच दिलेले आहे आणि हे असेच ट्रु प्लान मध्ये काम सुरु करतील.

अनिल भोसले :-

आ.सी.सी. डिझाईन यायला किती महिने लागतात.

मिरादेवी यादव :-

यह डिझाईन प्लान आपका हम २०१२ से सुन रही हूँ। लेकिन आज हमको लिखित में चाहिए।

अनिल भोसले :-

कमिशनर साहेब गेल्या महासभेला ज्यावेळी चर्चा झाली महासभेला चर्चा होऊन ६ महिने झाले १६ महिन्यामध्ये बी.एस.यू.पी. चे १ प्लस १६ करणार आहोत यासाठी ६ महिने चर्चा झाली. डिझाईन बनवायला ६ ते ८ महिने लागले.

दिपक खांबित :-

हो लागतात ना साहेब हे शासन मंजूर आहे सगळे.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, जुलै महिन्यात आपल्या महासभेमध्ये आपण आता खांबितने सांगितल्याप्रमाणे ठराव घेण्यात आला आणि तो प्रस्ताव आपण म्हाडाकडे पाठवला आहे. तरी सायमेंटली आपण अशी तयारी ठेवली होती की, तिकडनं प्रस्ताव मंजूर होऊन येईल आणि जुना प्रस्ताव आहे आपला ग्राऊंड प्लस ८ चा आणि आपल्याला आता सविस्तर माहिती आहे सभागृहात चर्चा झालेली आहे. ४३०० घरे आहेत त्याच्यातील

शासनाने २००० घर केंद्र शासनाकडे जी बैठक झाली त्याच्यामध्ये रद्द करण्यात आलेली आहे. फक्त २३०० घरे बांधली जाणार आहेत. त्याच्यासाठी केंद्र शासन पैसा देणार आहे. आणि बाकी मग आपल्या महासभेमध्ये ठरल होत की आपण त्या ४३०० लोकांचे सर्व्हे केला ४३०० घरे झाली पाहिजे म्हणून तसा ठराव झाल्यानंतर आपण तो ठरावासह म्हाडाकडे पाठवला. म्हाडाकडून शासनाकडे फाईल गेलेली आहे पण शासनाकडून त्याला मंजुरी अजुन आलेली नाही किंवा निर्णय झालेला नाही तोपर्यंत आपण काय केले की ही २००० जी घरे आहेत त्याच्यासाठी जे डिझाईन तयार करायचे आमचे असे मत आहे की शासनाकडून मंजूरी आल्यानंतर आपण सगळ सोबत करु परंतु ते तस न होता मग नंतर आमची महापौर मॅडमशी चर्चा झाली, खांबित आम्ही बसून एक बैठक घेतली. त्याच्यामध्ये असं ठरलं की शासनाकडून मंजूरी येत राहील तोपर्यंत बाकीच दर आपण मंजूर करुन घेऊ. मागच्या आठवड्यामध्ये आपल्याला सगळे ग्राऊंड प्लस ८ चे जी डिझाईन होत अगोदरचे त्याच्यामध्ये तुमचे ४३०० घरे बसत नाही. त्यामुळे आपण ते डिझाईन चेंज केले आहे त्याला मंजुरीसाठी आपण प्रस्ताव सगळा टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटकडे दिला आणि ड्रॉईंग जे आहे ते सगळे गेल्या आठवड्यामध्ये आपल्याला प्राप्त झालेले आहेत त्यानुसार तिथे खोदकामाला सुरुवात देखील केलेली आहे आणि याचे लिमिट आहे की २०१७ पर्यंत शासनाचा निर्देश आहे की २०१७ पर्यंत आपल्याला ही स्किम पूर्ण करायची आहे त्याच्यामुळे आता पाठीमागे काय झाले नाही त्याच्यापेक्षा आता पुढे काय करायचे. आपली कामाला सुरुवात झालेली आहे. मागच्या ४ वर्षामध्ये काही झालं नाही त्याचे खापर आमच्या डोक्यावर न फोडता आता आपले काम लवकरात लवकर पूर्ण होईल याचा आमचा जास्तीत जास्त प्रयत्न आहे.

अनिल भोसले :-

साहेब आपण बोलता काम चालु झालेले आहे. कुठलेच काहीच चालु झालेले नाही. आपल्याकडे जी माहिती आहे ती खोटी माहिती आहे. त्या वॉर्डात आम्ही राहतो. तिथे काही कामच चालु झालेले नाही. तरी तुम्ही बोलता काम चालु झाले. खोदकाम चालु झाले.

मा. आयुक्त :-

मिरादेवी मॅडमने मला फोन करुन सांगितले की साहेब धन्यवाद काम चालु झालेले आहे.

मिरादेवी यादव :-

साहब एक दिन के लिए १८ तारीख को महासभा थी १७ तारीख को एक जे.सी.बी. लगाके सिर्फ फोटो निकाले। मुझे क्या मालुम मेरे साथ धोका कर रहे है। एक जे.सी.बी. लगाके फोटो निकालके वॉट्स अप पे देके चुना मारके एक दिन के लिए चालु किया। मैं तो सोच रही थी आजसे चालु होगा। एक दिन दिखाके बंद कर दिए।

दिपक खांबित :-

साहेब कन्टीन्यु काम सुरु आहे परंतु खोदाई कामच सुरु होते. आर.सी.सी. डिझाईन नसल्यामुळे आर.सी.सी. चे काम सुरु झाले नव्हते साहेब त्या आर.सी.सी. चे काम आता फुल प्लेसमध्ये सुरु होईल साहेब.

मिरादेवी यादव :-

जभी जभी मैं चर्चा की होगी तब बस प्लान चालु है, ड्रॉईंग चालु था इसका वो चालु है, कितने बार चेंज होगा। अभी २०१६ चल रहा है। २०१७ आने में कौन समय जाएगा।

अनिल भोसले :-

साहेब जे१, जे २ चे अजुन काही चालु नाही.

मा. आयुक्त :-

भोसले साहेब आता सगळी तयारी झाली आहे.

अनिल भोसले :-

चालु कधी होईल. डेट पाहिजे आपण सांगितले लेखी उत्तर देतो म्हणून मला डेट लिहून द्या या दिवशी हे काम चालू होईल. आश्वासन नको आहे. जे १, जे २ चे काय फायनल झाले त्याचा खुलासा करा.

मिरादेवी यादव :-

मुझे लिखित में चाहिए। कौनसी डेट को चालु कर रहे हो कौनसी डेट को काम पूरा करके देंगे।

अनिल भोसले :-

कमिशनर साहेब सभागृहाच्या वतीने मी आपणाला विनंती करतो बी.एस.यु.पी. हा गंभीर विषय आहे. जे१, जे २ चे कॉन्ट्रॅक्टर मस्ती करतात, काम करत नाही. तुमच बैठक झाली, मिटींग झाली त्यात काय झाले त्याचा खुलासा करा. कधी काम चालु करणार ते होणार की नाही होणार. जे १, जे २ चे जे कॉन्ट्रॅक्टर आहेत त्यांनी ३ वर्ष काम न केल्यामुळे त्यांच्या मस्तीमुळे काम होऊ शकले नाही. जे ३ मध्ये काम चालु आहे. जे ३ मध्ये काही शंका नाही १ बिल्डींगचे काम चालु आहे पण जे२ जे १ मध्ये जे कॉन्ट्रॅक्टर आहेत त्यांची तुमची काय बैठक झाली. आणि कधी काम चालु होणार आहे ते खुलासा करा काय चर्चा झाली तुमची.

दिपक खांबित :-

जे ३ चे पॅकेज आहे त्याच्यामध्ये आपण ग्राऊंड प्लस १६ च्या एकूण ज्या ६ बिल्डींग बसवल्या त्या ६ मध्ये पण जवळ जवळ आपले १५०० फ्लॅट होतात. तर ते जे काम आहे ते जे ३ वाल्याला आपण सगळे ड्रॉईंग दिलेत त्याने कन्सेन्ट दिले आहे ते काम तो फुल प्लेसमध्ये आजपासूनच तो आर.सी.सी काम सगळ

फुल प्लेसमध्ये सुरु करणार आहे. आणि जे १ चा जो ठेकेदार आहे त्याने अजुनपर्यंत कन्सेन्ट दिलेले नाही. त्याच्याशीही बैठक झाली परवाच्या दिवशी तोही आता १-२ दिवसात कन्सेन्ट देईल आणि तेही काम सुरु होईल. बाकी जे ३ च्या ठेकेदारांनी कन्सेन्ट दिले आहे त्यांनी काम पण सुरु केले आहे.

अनिल भोसले :-

मी जे विचारतो आहे खांबित साहेब जे १ चा ठेकेदार आणि जे २ चा ठेकेदार यांची काम करण्याची मानसिकता आहे की नाही. आपण जी बैठक घेतली आहे त्याचा खुलासा व्हावा अशी माझी विनंती आहे.

दिपक खांबित :-

जे-२ ला आपण ऑलरेडी रद्द केले आहे आणि जे-१ आहे त्याच्याशी बोलणी सुरु आहे आपली. त्याने कन्सेन्ट दिल्यावर तेही काम सुरु होईल. किंवा त्याने जर काम नाही सुरु केले एक आठ दिवसांमध्ये तर या जे-३ वाल्यालाच हे काम द्यायचे अस महासभेने निश्चित केले आहे त्याप्रमाणे ते सुध्दा काम सुरु करण्यांत येईल. जे-३ वाल्याकडूनच ते काम करुन घेणार आपण. त्याला अजून ८ दिवस देवू आपण.

मिरादेवी यादव :-

खांबित साहेब जे-१ का पूरा खाली किया है। जे-२ का भी कुछ लोग खाली किए है। जे-३ को पूरा खाली किए है और दुसरी बात २३०० लोगो की बात कर रहे है २५०० लोग किधर जाऐंगे।

दिपक खांबित :-

अभी मॅडम जे-२ आपण खाली नही कर रहे है। पुरी बिल्डींग जो है वो जे-३ और जे-१ मैं बना देंगे।

मिरादेवी यादव :-

कुछ लोगो को जे-२ वालो को भी खाली कराया गया है।

दिपक खांबित :-

किया है ना खाली उन लोगो को भी फ्लॅट देंगे बाजूमें।

मिरादेवी यादव :-

२५०० लोगो को किधर साईट में किया जा रहा है।

अनिल भोसले :-

कमिशनर साहेब ज्या लोकांना चेक देऊन आपण भाडे तत्वाने बाहेर पाठवले होते त्यांना १-१ वर्ष पूर्ण झाले. त्यांना घर ही मिळत नाही आणि भाड्याने चेकही मिळत नाही. ते लोक दरदरच्या ठोकरा खात आहेत. आपण या महिन्यामध्ये घर देऊ त्या महिन्यामध्ये घर देऊ रोज आश्वासन चालु आहे. तुम्ही त्यांचे धोरण काय निश्चित केले आहे.

दिपक खांबित :-

आपल्याला बांधकाम करुन जी घर मिळणार आहे ती अजून येण्यास थोडा विलंब होतो त्यामुळे आपण त्यांना घर दिली नाहीत साहेब. दरम्यानच्या काळात हा प्रोजेक्ट सुरु झाल्यानंतर भाडे जे थकीत असेल ते देऊ सर आपण.

अनिल भोसले :-

पण आता साहेब ज्या माणसाकडे भाडे भरायला पैसे नाही त्यांनी जायचे कुठे. जोपर्यंत घर देऊ शकत नाही तोपर्यंत भाडे द्यायचे तरी तुम्ही निश्चित करा. कुठेतरी धोरण निश्चित करा साहेब. १-१ वर्ष झाले, कुणाला दिड वर्ष झाले त्यांना भाडेही देत नाही आणि राहायला घरही देत नाही त्यांनी जायचे कुठे. त्यांची घरे पाडलेली आहेत.

दिपक खांबित :-

साहेब ज्यांची मुदत संपली त्यांची आपण लिस्ट तयार केली त्यांना लवकरच आपण भाडे देऊ.

अनिल भोसले :-

किती वेळ साहेब ६ महिने, ८ महिने, १-१ वर्ष काही लोकांना ३-३ वर्ष मिळाली नाहीत.

दिपक खांबित :-

या महिन्या अखेरीस साहेब सगळ आपण क्लिअर करु. कुणाचच भाडे राहणार नाही.

अनिल भोसले :-

कधीपर्यंत होईल.

दिपक खांबित :-

मार्च एन्डपर्यंत.

अनिल भोसले :-

आजच्या आज तुम्ही जे देणार आहे लिखित पत्रामध्ये सगळ्यांचे उत्तर द्यावे अशी माझी विनंती.

बर्नड डिमेलो :-

आपण दि. १७/०२/२०१६ रोजी कोर्टाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने आपण दिलेल्या २/०३/२०१५ च्या विरोधी पक्षनेत्याचे निर्णय कलम ४५१/३ नुसार विखंडीत केल्यामुळे आम्ही आपणास दि. २३/२/१६ रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे श्री. लियाकत शेख यांचे नाव विरोधी पक्षनेते पदी घोषित करण्यात यावे अस पत्र दिले आहे म्हणून आजच्या सभेत विरोधी पक्षाचे नाव घोषित करण्यात यावे अशी मी तुम्हाला विनंती करतो.

मा. महापौर :-

बर्नडजी आपको भी पता है यह मॅटर कोर्ट में था तो कोर्ट का जबतक मुझे निर्देश नही आता है मैं आपका लेटर मिला है मुझे और मैंने रखा है उसको जैसे ही कोर्ट का निर्देश आ जाता है मेरे पास वैसे योग्य निर्णय लेके।

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम आपका वकील कोर्ट के अंदर में हाजिर था। महाराष्ट्र शासनने सरकारी वकील के माध्यम से उनको वहाँपे सूचना दी थी। आपका वकील मतलब आपकी स्वयं की उपस्थिती रहती है। वहाँ पे उनको लेखी सूचना दि थी तो उसके नुसार आपको यह कहने का मेरे ख्याल से अच्छा बनता है की मेरे को जानकारी...............

मा. महापौर :-

नही मुझे देने में कोई हरकत नही मेरे पास जैसे ही कोर्ट के निर्देश आ जाते है योग्य निर्णय लिया जाएगा। कोर्ट मॅटर है तो कोर्ट से आएगा ना।

भगवती शर्मा :-

कोर्ट में आपका वकील था मॅडम।

मा. महापौर :-

मैं क्या बोल रही हूँ कोर्ट से निर्देश आते ही योग्य निर्णय लिया जाएगा।

भगवती शर्मा :-

ठीक है।

मा. महापौर :-

आपका पत्र मिला मैं उसे डिनाय नही कर रही हूँ। आपने इनका नाम लिया उस से भी डिनाय नही है।

भगवती शर्मा :-

नही नही कोर्ट के अंदर में आपके वकील को सूचना दि गयी थी। मैं यह बता रहा हूँ उसका यह पत्र है मेरे पास।

मा. महापौर :-

मेरे पास लेखी ऑर्डर आते ही योग्य निर्णय लूँगी।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, आजची ही विशेष सभा आपण परत बोलवून, विशेष सभेचा अर्थ शहरामध्ये ज्वलंत विषय किंवा त्याला अनुसरुन खरोखर महत्वाचे विषय शहराचे या सभागृहामध्ये आले पाहिजे याच्यासाठी विशेष सभा बोलाविली गेली पाहिजे. कुठलीही विशेष सभा वेळोवेळी तुम्हाला अधिकार आहे की तुम्ही विशेष सभा बोलावू शकता. लक्षात येत नाही आमच्या की असे कुठले महत्वाचे विषय याच्यामध्ये. या शहराला ज्वलंत विषय ज्याचा निर्णय आजच्या आजच करायचा, पाण्याचा विषय ज्वलंत होता तो विषय सन्मा. सदस्य मॉरस सरांनी जस मांडल एकतर हा विषय दुसरा दिलेल्या विषयपत्रिकेमधून अजून ५-६ गोषवारा अजून उपलब्ध नाहीत. ३ दिवसाच्या अवधीमध्ये देण्यात आलेले आम्हाला अशा सूचना आम्ही कधी चर्चा करणार त्याचा अभ्यास आम्ही कसा करायचा.

मा. महापौर :-

माझा अधिकार आहे विशेषसभा लावायचा.

जुबेर इनामदार :-

नाही आपला अधिकार आहे. महापौर आम्ही कुठे बोलतो तुम्हाला अधिनियमानी वेळोवेळी पाहिजे तितके विशेष सभा लावायचा अधिकार दिलेला आहे आम्ही कुठे नाही म्हणतो. आम्ही कुठे त्याला अमान्य केले. विषय असा आहे एकतर विषय महत्वाचा नाही एवढे काही ज्वलंत नाही की त्याचे आजच्या आज तुम्हाला विशेष सभा लावून ३ दिवसाच्या अवधीमध्ये सदस्यांना त्याचा अभ्यास करायला सुध्दा वेळ मिळत नाही. अशाप्रकारे विशेष सभा लावली. ठिक आहे लावली विषयपत्रिका पाठविली त्यात गोषवारे नाही. अशा परिस्थितीचं आम्ही समजायचं काय. प्रशासनाने हा विषय दिलेला आहे जे विषय तुमचे आहेत. सचिव महोदय तुम्ही उत्तर द्या. विषयपत्रिकेवरचे विषय हे कुणी दिलेत तुम्हाला हे अधिकारी कुणाचे आहेत. विषयपत्रिकेवर विषय घेण्याचा अधिकार कुणाचा आहे.

नगरसचिव :-

प्रत्येक विषयपत्रिकेवर विषय महापौरांच्या मंजुरीने घेतले जातात. महापौर त्याला मंजूरी देतात.

जुबेर इनामदार :-

गोषवारा असायला पाहिजे.

नगरसचिव :-

त्यांचे विषय आहेत महापौरांचे.

जुबेर इनामदार :-

वाचा अधिनियम. सचिव महोदय तुम्ही सर्वांत ज्येष्ठ सचिव आहे महानगरपालिकेचे आपल्या ठाण्याच्या. असा कुठे उल्लेख आहे का विषय महापौर घेईल. महापौराला अधिकार आहे. विषय नाही घ्यायचा. विषय प्रशासनाने दिला पाहिजे. फक्त प्रशासनाने दिला पाहिजे आणि महापौरांना विषय घ्यायचा नसेल तर अधिनियमामध्ये त्याची तरतूद दिली आहे नाही घेतला महापौराने तर आयुक्ताला अधिकार आहे. ९० दिवसाच्या आतमध्ये त्यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यायचा. विषय घ्यायचा अधिकार महापौरांना कधी झाला. प्रशासन विषय देईल आणि त्याला गोषवारा असायला पाहिजे. परिपत्रक आयुक्तांचे मिरा भाईंदर महानगरपालिका ९/१/२०१५ ला स्पष्ट सांगते महासभा, स्थायी समिती यांच्या समोर आयुक्ताने स्वाक्षरीने गोषवारा पाठविण्यात यावा. आयुक्ताची स्वाक्षरी विनाप्राप्त कोणताही गोषवारा नगरसचिव यांनी स्विकारु नये. मला सांगा अशी परिस्थिती असताना तुम्ही विषयपत्रिकेवर का घेतात? कायद्याच्या नियमबाह्य काम करायची आपल्याला काय सवय झाली आहे. तुम्हाला माहिती आहे तुम्ही नियमबाह्य कृती केल्यानंतर तुमच्यावरती कारवाई होऊ शकते. आम्हाला संधी द्या ना. चर्चा करु आम्ही सभागृह कशाला म्हणतात या शहराच्या विषयावर चर्चा होण्यासाठी तुमच्याकडे विषय असतील गोषवारा द्या आम्हाला घाबरता कशाला द्यायला आम्ही आयुक्त महोदय अशा विषयावर चर्चा होऊ देणार नाही. तुमचा गोषवारा असला तर सन्मानाने आम्ही त्याच्यावर चर्चा करु. त्याच्यावरती ठराव मांडू. सचिव महोदय आजच्या सभागृहामध्ये.............

मॉरस रॉड्रीक्स :-

महापौर मॅडम, आणि आयुक्त साहेब पहिली गोष्ट पाण्याचा प्रॉब्लेम आहे हा विषय पहिला असायला पाहिजे आणि तो पाण्यापासून चालू करावा.

सुरेश खंडेलवाल :-

पाण्याच्या विषयावर चर्चा होऊ द्या त्यानंतर आपण महासभा चालू करु.

मॉरस रॉड्रीक्स :-

१२० तासाने भाईंदरमध्ये पाणी येते. कस येतो, का येतो?

मा. महापौर :-

मॉरस साहेब पानी का विषय पे अभी अभी निचे चर्चा की, काफी सारे वहाँ नगरसेवक मौजुद भी थे और फिर भी आपको चर्चा करनी है तो हम जरुर से लास्ट में पानी के विषय में भी चर्चा करेंगे।

मॉरस रॉड्रीक्स :-

नही आप आश्वासन देके बोलो।

मा. महापौर :-

आश्वासन दे दिया सभी थे वहाँ।

मॉरस रॉड्रीक्स :-

मैं नही था ना। मुझे क्या पता कितने घंटे में पानी आएगा। नही आएगा तो मैं पुरे भाईंदर में होर्डिंग्ज लगाऊंगा की पानी बिल कोई भी मत भरो और टॅक्स भी मत भरो। जबतक २४ घंटे में पानी नही आता।

जुबेर इनामदार :-

पानी कटौती रद्द होने का बॅनर लगाया वो झुठा था।

मॉरस रॉड्रीक्स :-

१०० बॅनर लगाऊँगा कल के कल।

मा. महापौर :-

मॉरसजी पानी का प्रॉब्लेम ऑल ओवर महाराष्ट्र में है। हमारी सभी कार्पोरेशन में है और इस साल बारीश कम है यह सभी को पता है। पानी का विषय जल्द ही सॉल्व्ह होगा और अभी अभी सब नगरसेवक भी निचे थे उसका रास्ता निकाला है, लेकिन बारीश नही है यह बात भी सही है। कटौती सब के लिए है।

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम मैं आपको ध्यान दिलाना चाहूँगा की जनवरी के फर्स्ट विक में इसी पानी के विषय को लेकर हमने एक सांकेतिक मोर्चे का आयोजन किया था और उसके ठिक एक दिन पहले आपने प्रेस कॉन्फरन्स लगाकर पूरे मिडिया मैं आपने एक जाहिर संदेश दिया था साथ में एक लेटर भी दिया था सबको की पानी की कटौती मिरा भाईंदर शहर में रद्द हो चुकी है। सारे मिडिया ने उसको बहुत अच्छी तरह से छापा था। लेकिन आपने मिडिया को भी मिसगाईड किया, कटौती रद्द नही हुई थी, कटौती शिथिल की गई थी। जिसमें कही कोई मिनिट के अंदर उल्लेख नही है। आपने पुरा सब जगह प्रचार किया की मिरा भाईंदर मैं पानी की कटौती रद्द हो गई लेकिन मैं आपको यह बताऊँगा आप भी यह अपने व्यासपीठ से बोल रहे है की पानी की कटौती अभी चल रही है। जो कटौती पहले मॅडम १ दिन की थी मॅडम अभी २-२ दिन पानी की कटौती चल रही है।

मा. महापौर :-

आप बैठिए खंडेलवालजी आप निचे थे और मुझे आपसे यह आशा नही थी की कहने का मतलब आप गलत लेंगे। आपने निचे आपने कानो से सुना है की हमारे पास मिनिटस थी और आपके हाथ में भी वो मिनिट्स है। आप दिशाभुल करना चाहते है तो आप बैठ जाइए।

सुरेश खंडेलवाल :-

हम महासभा में आपसे पुछले वाले थे और निचे जो लोग आए हुए थे ना वो स्वेच्छा से आए थे और आपने किसी को बुलाया नही था। आपने मिडिया को मिसगाईड किया मॅडम मैं आपको ध्यान दिलाना चाहता हूँ आपने बोला कटौती.......

मा. महापौर :-

मैं आपको उपर आके वही जवाब देने वाली थी। मैंने मिडिया को मिसगाईड नही किया। आप आरोप मत लगाइए।

सुरेश खंडेलवाल :-

आपने मिडिया की प्रेस कॉन्फरन्स बुलाई और बोला कटौती रद्द हो गई और कटौती रद्द नही हुई है।

मा. महापौर :-

बिलकुल सही बोला कटौती रद्द हुई है। और आपक पास भी वो मिनिट्स है आपने अभी अभी निचे बताया था आपके पास वो मिनिटस है।

सुरेश खंडेलवाल :-

पर वो मिनिट्स मैं कही भी नही लिखा है की मिरा भाईंदर में पानी की कटौती रद्द हो गई है। आपने प्रेस कॉन्फरन्स के माध्यम से सबको यह बताया और आपने गलत पुरे शहर में प्रचार किया। लोग हमसे पुछ रहे है की पानी की कटौती रद्द हो गई तो पानी गया किधर और अभी २-२ दिन पानी की कटौती शुरु हो गई। आप पुरे सभागृह को बताइए की आपने यह क्यों बोला मिनिस्टर महोदय का आदेश यदी अधिकारी इसका पालन नही करेंगे तो आप क्या करेंगे मॅडम पानी का विषय है गंभीर विषय है।

दिनेश जैन :-

महापौर मॅडम पानी का विषय अभी लेनेवाले हो क्या बाद में लास्ट में।

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम मेरे कहने का मतलब है की आप पुरे सभागृह को जानकारी दिजीए की आपने यह जो क्या ऑर्डर हुआ था आज क्या स्थिती है आप पुरी जानकारी दिजीए सभागृह को। आपने अभी इन्ड्युज्वल मिटींग लगाई थी सभागृह को उसके बारे में जानकारी नही है।

मा. महापौर :-

आप बैठ जाइए मैं बता रही हूँ। मैंने पहली बात तो यह मिटींग बुलाई नही थी।

अनिल भोसले :-

खंडेलवालजी निचे आप मिटींग में थे, चर्चा हुई है आप खुद वो मिटींग में गए। सब कुछ मालुम है तो सभागृह को.............

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम का यह वर्ड था मिटींग के अंदर यह महासभा नही है। हम सिर्फ सुनके आए है। लेकिन यहाँ पे महासभा के अंदर हमारा अधिकार है की हम मॅडम से सवाल कर सकते है की आप प्रेस कॉन्फरन्स में क्या बोल रहे है और जगह पे स्थिती क्या है।

मा. महापौर :-

आपको जवाब सुनना है ना सभी लोग बैठे जाइए जुबेरजी बैठ जाइए।

सुरेश वाकोडे :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो पाटबंधार विभागामध्ये मा. मंत्री महोदय साहेबांकडेजी मिटींग झाली होती त्या मिटींगमध्ये त्यांनी लेखी आदेश दिलेले आहेत. मिरा भाईंदर ची स्टेमची कपात ही रद्द केलेली आहे. त्याप्रमाणे जानेवारी महिन्यामध्ये स्टेमने एकही कपात आपल्याकडे केलेली नाही. आता फेब्रुवारी महिन्यामध्ये जी झालेली कपात आहे ही २ दिवस कपात झाली बुधवारी स्टेमने पाणी बंद केले ते ४८ तासांसाठी. एम.आय.डी.सी. ने बंद केलेले पाणी होते ६० तासांसाठी, एम.आय.डी.सी. चे पाणी सकाळी शुक्रवारी ४ वाजता चालु होणे अपेक्षित होते त्यावेळी त्यांचा १ वॉलचा प्रॉब्लेम झाला त्यामुळे पाणी सुरु झाले नाही. हे पाणी शनिवारी संध्याकाळी ४ वाजता सुरु झाले सुरु झाले त्यावेळी ती लाईन फुटली ७ वाजता लाईन फुटल्यामुळे परत ते लाईनचे रिपेअरींगचे काम घेतले आणि रविवारी १ वाजता पाणी सुरु झाले. यामुळे काय झाले एम.आय.डी.सीच्या पाण्याचा शट डाऊन हा ९० तासाचा झाला. स्टेमचा ४८ तासांचा शट डाऊन झाला. हा एकच वेळेला एवढा मोठा शट डाऊनमुळे मिरा भाईंदर शहराची स्थिती ही पाणी पुरवठा १०५ ते ११० तासांवर गेला त्यामुळे हा प्रॉब्लेम झालेला आहे. आज त्यासाठी स्टेमचे एम.डी. आणि एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर त्यांना आपण या मिटींगसाठी बोलवले होते खाली. ती मिटींग जेव्हा झाली त्यामध्ये आपण हे सांगितले त्यांना की हे जे मिनिस्टर साहेबांनी दिलेले मिनिट्स आहेत ते तुमच्याकडे आहेत त्यामध्ये डायरेक्ट ऑर्डर दिलेली आहे ती ऑर्डर पाळून झाली पाहिजे. तुमच्याकडे काही वॉरन्ट काही लेखी दिले आहे का की ही झालेली कपात रद्द आहे म्हणून आहे का तुमच्याकडे काही कागदपत्र नाही. त्यामुळे

त्यांनी आताच आपल्याला सांगितले की आम्ही बुधवार आणि गुरुवारी जे पाणी बंद ठेवणार होतो ते पाणी चालु ठेवणार आहे. फक्त एम.आय.डी.सी. ची जी रेग्युलर कपात आहे ती चालु राहणार आहे.

जुबेर इनामदार :-

तुम्ही बोलता ना कपात नव्हती रोजची रिडींग सांगा.

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम, वाकोडे साहेब आज पण आपल्याकडे रिक्षा फिरतात बुधवारी १२ ते शुक्रवारी रात्री १२ पर्यंत ४८ तास झाले तुम्ही शनिवार रविवार पाणी देणार.

(सभागृहात गोंधळ)

प्रेमनाथ पाटील :-

कोणाकोणाला पाणी देणार. परत तुमच रात्री सोमवारी १२ वाजल्यापासुन ते बुधवारी रात्री १२ वाजेपर्यंत शट डाऊन आहे म्हणजे हफ्त्यातून १ दिवस पाणी देणार का तुम्ही आम्हाला.

सुरेश खंडेलवाल :-

वाकोडे साहब यह बताइए अभी शट डाऊन बंद हो गया क्या? मिनिस्टर के आदेश के बाद में आपने कहा था की एकबार शट डाऊन हुआ अभी बंद हो गया क्या?

सुरेश वाकोडे :-

मी आताच तुम्हाला सांगितले स्टेमचा शटडाऊन बंद झालेला आहे. एम.आय.डी.सी. चा शट डाऊन चालु आहे. एम.आय.डी.सी. ची लाईन बंद करता येत नाही. एम.आय.डी.सी. चे जे ५० एम.एल.डी. पाणी ६० तास बंद राहणार आहे. ६० तास बंद राहिल्यामुळे आपला होणारा पाणी पुरवठा जो ४८ तासांचा होता तो पाणी पुरवठा आपला ६५ ते ७० तासावर जातो त्यासाठी आपल्याला अनाऊन्समेंट करणे लोकांना जागृत करणे जरुरी आहे पण आजची परिस्थिती जी आहे ना साहेब धरण फक्त ५० टक्के भरलेले आहे. जो आपला बारवी धरण आहे ६२ टक्के भरलेले आहे. अशी भयानक परिस्थिती ५० वर्षात पहिल्यांदा आली आहे.

प्रेमनाथ पाटील :-

एम.आय.डी.सीचे ४८ तास बंद राहणार बरोबर आहे.

सुरेश वाकोडे :-

६० तास बंद राहणार एम.आय.डी.सीचे, स्टेमचे चालु राहणार.

प्रेमनाथ पाटील :-

मग आता सोमवार रात्री १२ ते बुधवार रात्री कोणाचे पाणी राहणार आहे.

सुरेश वाकोडे :-

एम.आय.डी.सी. फक्त बंद राहणार आहे.

प्रेमनाथ पाटील :-

माझ्याकडे मॅसेज आहे. तुमचाच पाठविलेला मॅसेज आहे. सोमवारी रात्री १२ वाजेपासून ते बुधवारी रात्री १२ वाजेपर्यंत कुणाचे पाणी राहणार एम.आय.डी.सी. का स्टेमचे पाणी राहणार.

सुरेश वाकोडे :-

सोमवारी नाही पहिले टाईम टेबल चेंज झाले आहे आता त्यांनी काय केले बुधवारी संध्याकाळी ६ वाजता एम.आय.डी.सी. बंद राहणार ते शुक्रवारीच चालु होणार.

प्रेमनाथ पाटील :-

बरोबर आहे.

सुरेश वाकोडे :-

साहेब मागचा वेळ वेगळा होता. मागच्या याच्यामध्ये स्टेमने ४८ तास बंद केला होता.

प्रेमनाथ पाटील :-

सोमवार ते बुधवार बंद राहणार नाही का.

सुरेश वाकोडे :-

नाही स्टेम बंद राहणार नाही.

प्रेमनाथ पाटील :-

ठिक आहे.

तारा घरत :-

पाण्याची बिले डबल तिबल येतात त्याचे काय साहेब पाणी तर कमी येते आणि पाण्याची बिल वाढुन येतात.

प्रमोद सामंत :-

तुम्ही प्रत्येक टाकीवरती ऑर्डर केली आहेत की या दिवशी झोन बंद ठेवायचा त्या दिवशी झोन चालु ठेवायचा त्यांच काही कॅलक्युलेशन आहे की नाही. का आपल्याला मनात येईल तेव्हा झोन बंद करायचा,

मनाला येईल तेव्हा चालु करायचा. काय आहे हे? आम्ही समजू शकतो कपात आहे ३० टक्के कपात आहे पण ते पाणी न सोडण्याचे तुमचे जे कॅलक्युलेशन आहे त्याचे काय प्रमाण आहे.

सुरेश वाकोडे :-

तुम्ही माझ्याकडे या तुम्हाला सगळ दाखवतो मी.

प्रमोद सामंत :-

दरवेळी कस काय येणार साहेब अस नाही तुम्ही काय कॅलक्युलेट केले. तुम्ही तुमचे झोन कसं ठरवले ते सांगा ना.

सुरेश वाकोडे :-

हो पण साहेब अस १-१ झोनच कस सांगणार तुम्ही माझ्याकडे या मी तुम्हाला सांगतो.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम, याच्यासाठी विशेष महासभा लावावी अस माझं निवेदन आहे तुम्हाला.

प्रमोद सामंत :-

सगळ्या झोनचा विषय आहे भाईंदर ईस्ट, भाईंदर वेस्ट, मिरारोड, चेणाच्या बाजुला सांगितले पाहिजे ना तुम्ही.

अनिल भोसले :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो आता सध्याला सविस्तर सभागृहाला जर माहिती दिली, आपल्या दोन्ही तलावामध्ये असलेले पाणी, स्टेमची कपात, आणि जनतेला कन्वेन्स करण्यासाठी अगर सविस्तर आपण व्यवस्थित माहिती दिली ओरडाओरडीमध्ये माहिती मिळत नाही. आपण माईकवर सांगता बाकी नगरसेवकांना लोक प्रश्न विचारतात पाण्याचा गंभीर प्रश्न आहे दुसरे यासाठी आयुक्त साहेब आपल्या शहरामध्ये तलावामध्ये पाणी नाही. हे खरं आहे या शहरामध्ये असलेले विहीरी या शहरामध्ये असलेले बोअरिंग यासाठी आपण काही नियोजन केले आहे का? म्हणजे जे आहे येणार नाही हे तर खरं आहे पण या शहरामध्ये असलेल्या विहीरी आपण समजा साफसफाई करुन त्या विहीरी मधून काही कमीत कमी वापरायचे तरी पाणी मिळेल. ज्या असलेल्या बोअरींग आहेत ज्या बंद पडल्यात हॅन्ड पंम्प चालु करुन पाण्याच्या परिस्थितीवर आपण मात करु यासाठी आपलं काही नियोजन आहे का?

सुरेश वाकोडे :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मागच्या विकमध्ये १० बोअरिंगचे बोअरिंग घेतले आहे. ॲडिशनल बोअरींगचा आपण प्रस्ताव जे.ई.टी. ला दिला. जे.ई.टी. हून पास होऊन आता आमच्याकडे ८-९ बोअरींगचा प्रस्ताव आलेला आहे. ते पण बोअरिंग बांधणार आहेत. आणखी काही लोकांची मागणी आमच्याकडे बोअरिंग आली ते सुध्दा आम्ही जे.ई.टी. ची परवानगी घेऊन बांधणार आहोत. आणि दुसरे विहिरीच्या साफसफाईचे आहे तर विहीरीची साफसफाईची आपण निविदा काढलेली आहे. फायनल केलेले आहे.

रोहिदास पाटील :-

वाकोडे साहेब या सभागृहाला तुम्ही काय समजता. तुम्हाला समजते आम्हाला समजत नाही. दुष्काळ आज नाही आला ऑक्टोबर महिन्यामध्ये शासनाने जाहिर केले होते हे वर्ष दुष्काळाचे आहे. तुम्ही काय केले. तुम्ही आयुक्तांना कोणता प्रस्ताव दिला. महापौरांना कोणता प्रस्ताव दिला की या शहरात दुष्काळ येत आहे या गोष्टी करणे तुम्ही तर करतच नाही. आम्ही जीव तोडून सांगतो तुम्ही ऐकत नाही. आयुक्त साहेब आम्ही तुम्हाला १,२,३,४ पत्र दिली आहेत. विहीरी साफ करा त्यातील एकही काम झाले नाही. मी तुम्हाला त्या दिवशी सांगितल आमची सर्व मंडळी ते तुम्ही भाषणात वापरलं मंत्र्यांच्या समोर त्या डबक्याची काय हालत आहे. अख्खा घोडबंदर ते पाणी पित होते. पूर्ण घोडबंदर गाव, व्यापार रेतीबंदर ते पाणी पित होते ते पाणी बघू शकत नाही अशी स्थिती आहे. त्याला सांगितल तुमचा कोण ओळखीचा कॉन्ट्रॅक्टर असेल त्याला खाजगीत सांगा की ते पाणी तेवढे काढा. आपले प्रभाग अधिकारी त्यांना सांगूनही ते ऐकत नाही. त्यांना काही वाटत नाही. त्यांना अस वाटत हे सभागृह आहे मी उभा राहीन, बोलेलइथे कोणीच सिरियस नाही. एक विहिर सुध्दा तुम्ही साफ केली नाही. बोअरिंगसाठी तुम्हाला पत्र दिले. काय सर्व्हे चालला आहे. जर तुम्ही सक्षम असाल तर तुमची पध्दती असायला पाहिजे. ज्यांना तुम्ही बोलावलं सर्व्हे केले बोअरींगसाठी बोअरिंग बांधले. आयुक्तांनी परवानगी नाही दिली तर आम्हाला सांगा ना प्रस्तावच जात नाही. तुमचा त्याच्या पलीकडचे सांगतो आयुक्त साहेब तुम्हाला हे माहिती का नाही मला माहित नाही. अख्ख भाईंदर याच पाण्यावर वाढल जे मुंबईचे अडीच एम.एल.डी. पाणी येत होते किती वर्ष झाले थेंब येत नाही. आणि आम्ही स्टॅन्डिंगला होतो त्यावेळीही सांगण्यात आले पाणी मंजूर करुन आलो त्या आयुक्तांचीही दिशाभूल केली तुम्ही त्याच दिवशी यांना निलंबित करा साहेब खोटी माहिती देतात हे मुळात जे शहराचे पाणी होते ते पाणी बंद झाल्याचे यांना माहिती नाही आणि त्या भाईंदरचा जो मुळ नागरिक आहे तो त्याच पाण्यावर वाढला आहे. ते पाणी आजही बंद आहे चालु नाही. अडीच एम.एल.डी. मुंबईहून येणारे पाणी आज बंद आहे आणि महानगरपालिका आपली कार्यरत आहे. २४ तास पाण्याची चिंता करते. चेण्याच्या बोअरिंगसाठी मंजूरी घेतली चेण्याची विहीर कुठे हवी आम्हाला काय समजते की नाही समजते. या सभागृहामध्ये कोणत्याही पक्षाचा कोणीही सदस्य असला तरी पाणी प्रश्नासाठी तो सातत्य येतो विरोध करत

नाही. पाणी पाहिजे पण तुमची काम करण्याची इच्छा नाही. आम्ही गेलो होतो यांनी नकारात्मक उत्तर दिले की तुम्ही पाणी बंद ठेवू नका साहेब. परवाच दिवशी एम.आय.डी.सी. लाईन तुटली ती एअर लॉकमुळे तुटली हे काहीही कारण सांगतात तुम्ही २४ तास नाही ४८ तास पाईपलाईन बंद ठेवली नंतर तुम्ही सोडलं लोकांचे, खासदार, आमदार, मंत्री यांचे प्रेशर असतेच पाणी सोडा, पाणी सोडा ४ वॉल जास्त खोलले लाईन ब्लॉक होणार, एअर ब्लॉक होणार, लाईन बर्स्ट होणार. हायड्रोलिक सिस्टम आहे ती ते नविन नाही. विधिलिखित आहे ते एअर लॉक झाले की पाईपलाईन बर्स्ट झाली. एम.आय.डी.सी. पाईप लाईन बर्स्ट झाली आणि पुन्हा पुन्हा होणार. पाऊस पडेपर्यंत. जर तुम्ही २ दिवस यांनी नकारात्मक उत्तर दिले होते चौधरी समोर आम्ही पाच लोक बसलो होतो. कुठे झोनिंग करणार कुठे कन्ट्रोल करणार आम्ही सांगितल होते की तुम्ही पाणी कपात करा आदेशच आहे तर ठिक आहे पण पाणी रोजच चालु ठेवा आपण नियंत्रण करु आणि पाणी ४८ तास ५२ तासांनी जस येईल तस सोडू. पण यांनी भूमिका नाही घेतली ठेवा बंद ठेवा. बंद ठेवल्यावर हे होणारच आहे. आज नाही उद्या पण चालु होईल ज्या दिवशी बंद राहील २ दिवस, एम.आय.डी.सी. लाईन तुटेल. ज्या दिवशी स्टेमची लाईन बंद राहील ती लाईन तुटेल. याच जमिनीमध्ये अस एक हालचाल आहे जसजस उन वाढत जाईल या पाईपलाईनमध्ये लांबी रुंदी वाढते. पहिल्यांदा या सगळ्या पाईपलाईन तुटत होत्या नंतर त्याला आपण जिप्सी जाईंट लावले ९ इंचाचे. ९ इंच लाईन जरी सरकली तरी ते तुटत नाही असे ते पाईपलाईनचे जॉईंट डेव्हलप केले. उन चालु होणार जमिनिचे हालचाली होणार पाईपलाईन तुटणार पाणी बंद होणार यांचे काय म्हणणे आहे सांगा ना तुम्ही. अहो ४८,६०,९० तासांनी पाणी जाते तरी आपण सिरियस नाही. आता तुम्ही उत्तर द्या आयुक्त साहेब किती दिवसात तुम्ही विहीरी साफ करणार, किती दिवसात तलाव साफ करणार आहात किती दिवस बोअरिंगचा कार्यक्रम चालणार उत्तर द्या ना.

सुरेश वाकोडे :-

पुढच्या आठवड्यापासून विहिरी साफसफाईचे काम चालू होणार आहे.

रोहिदास पाटील :-

आम्ही कधी सांगितले होते.

सुरेश वाकोडे :-

अहो निविदा काढली आहे ना.

रोहिदास पाटील :-

तुमच्या लक्षात येत नाही साहेब हे महिन्यामध्ये टेंडर काढणार.

अनिल भोसले :-

कमिशनर साहेब आपल्या शहरामधील जेवढे तलाव आहेत, जेवढ्या बोअरिंग आहेत, जेवढ्या विहीरी आहेत हे जरी साफ करुन घेतले तरी पण पाण्याचे थोडेफार जे गावखेडे आहेत त्या गावखेड्यामध्ये किंवा ज्या-ज्या शहरामध्ये ज्या-ज्या ठिकाणी विहीरी आहेत त्या ठिकाणी आपणाला फायदा होईल. दुसरा महत्वाचा विषय की चेणा, काजुपाडा, पाटीलपाडा, गावठण पर्यंत ज्या बोअरिंगने प्रायव्हेटने पाणी विकले जाते शहराच्या बाहेर पाणी जाते हे थांबवण्यासाठी गेल्या महासभेला आमदार साहेबांनी विषय घेतला होता. तो आपण ठराव पास केला त्याच्यावर कुठलीही कारवाई झाली नाही. मोठ्या प्रमाणात पाणी शहराच्या बाहेर जात आहे हे पाणी जर इथे थांबवलं तर हे ही शहराला कुठे तरी फायद्याचे होईल. यासाठी महासभेत ठराव होऊन सुध्दा अधिकारी सिरियस नाहीत.

नयना वसाणी :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते मिरा भाईंदर शहरात पाण्याची टंचाई आहे. आपले जे सामान्य नागरिक आहेत ते एक थेंब थेंब पाण्याला त्रस्त आहेत. तेव्हा सगळीकडेच मिरा भाईंदरमध्ये हॉटेल्स, वॉटर पार्क जेथे हजारो लिटर पाणी वापरले जाते ते पाणी कुठून येते. या ठिकाणी जे नविन भवन निर्माण आहे त्याच्यावर आपण पाबंदी का लावत नाही.

अनिल भोसले :-

दुसरा एक महत्वाचा प्रश्न आपल्याकडे जे वॉटर पार्क आहेत, हॉटेल्स आहेत या ठिकाणी जाणारे पाणी यासाठी आपणाला काही कपात करता येईल का? यासाठी नियोजन आहे का? या ठिकाणी सध्याला मौजमस्ती करण्यासाठी पाण्याचा वापर केला जातो आणि अशा ठिकाणचे पाणी कपात करता येईल का? जर प्यायला पाणी नाही, अंघोळीला पाणी नाही मस्ती मजा करण्यासाठी प्यायला पाणी आहे. या ठिकाणचे पाणी का कपात करु शकत नाही आम्ही. कमर्शिअल आहे पालिकेला आवक यायला पाहिजे हे खरं आहे. असे अनेक ठिकाणे आहेत ज्या ठिकाणी पाण्याचा वेस्टेज होतोय ते थांबवण्यासाठी नियोजन आहे का?

सुरेश वाकोडे :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. आपण जे पर्याय सुचविले आहेत बोअरिंगचे, विहिर त्याचा आम्ही पूर्णपणे कारवाई चालू करणार त्याप्रमाणे पण हे बोअरिंग आणि विहिर म्हटले ना टोटल रिक्वायरमेंटच्या ३-४ टक्के पर्यंत आपण काम भागवू शकतो. त्यापेक्षा जास्त त्यामध्ये मिळत नाही.

अनिल भोसले :-

तलाव या शहरातील तलाव.

सुरेश वाकोडे :-

तलावाचे पाणी आपण टेस्ट केले आहे साहेब पिण्यासाठी वापरता येत नाही.

अनिल भोसले :-

कपडे धुण्यासाठी वापरता येईल.

तारा घरत :-

साहेब आमच्याकडे विहिरीचे पाणी अख्खे गाव प्यायला वापरत होता. नवघर, गोडदेव, खारीगाव यांना सगळ्यांना विहिरीचे पाणी जात होते.

भगवती शर्मा :-

वाकोडे साहेब विहिरी साफ करने का काम आपका है की सार्वजनिक बांधकाम का है?

सुरेश वाकोडे :-

नही विहिरी सब हम ही करते है।

भगवती शर्मा :-

मग तुम्हाला मी सांगतो बाबरा मॅडम आज ४ महिन्यांपासून तुम्हाला पत्र दिलेले आहे. आजपर्यंत ती विहिर साफ झाली नाही.

सुरेश वाकोडे :-

त्याचे टेंडर काढले होते. आता पुढच्या आठवड्यात काम चालु होणार.

भगवती शर्मा :-

आयुक्त साहेब, ऐका आता टेंडर काढले विहिर साफ करण्यासाठी ४ महिन्यांपासून सांगतात.

सुरेश वाकोडे :-

साहेब दरवर्षी आपण करतो. मागच्या वर्षीही केले होते या वर्षीचे टेंडर आता फायनल केलेले आहे. आता करतोय ते.

ग्रिटा फॅरो :-

मी किती वेळा तुमच्याकडे आले सांगा मला.

सुरेश वाकोडे :-

तस नाही आता टेंडर फायनल झाले आहे आमचे.

ग्रिटा फॅरो :-

माझ्या प्रश्नाचं उत्तर द्या मी कितीवेळा तुमच्याकडे आले.

सुरेश वाकोडे :-

मॅडम २-३ वेळा आलात तुम्ही बोलणे झाले.

ग्रिटा फॅरो :-

कुठल्या प्रश्नासाठी, कुठल्या विषयावर.

भगवती शर्मा :-

आयुक्त साहेब तुम्ही ऐका काम होत नाही.

सुरेश वाकोडे :-

विहिरीसाठी बोलणं झाल होत ना आपल मॅडम.

ग्रिटा फॅरो :-

हा विषय तुमच्याकडे ४ महिन्या अगोदर घेऊन आलेली मी बोलले आमच्या परिसरातल्या विहिरी साफ करा तुम्ही काय उत्तर दिलं.

सुरेश वाकोडे :-

हो मॅडम मी म्हटलं तुम्हाला इंजिनिअरला पाठवतो कुठल्या लिस्ट आहेत, लिस्ट करु त्याच्या.

ग्रिटा फॅरो :-

निविदा काढल्यात त्याच्या? मला उत्तर पाहिजे याचे हा विषय मी तुमच्याकडे कधीच आणलेला होता साहेब. तुम्ही त्याच्यावर विचार केला का? उडवाउडवीची तुम्ही उत्तर देता.

सुरेश वाकोडे :-

मला ८ दिवस वेळ द्या मी करुन देतो.

भगवती शर्मा :-

आता किती दिवसात साफ करणार तुम्ही. किती दिवस लागेल.

सुरेश वाकोडे :-

त्यांनी विषय जो काढला तो सुरज वॉटर पार्कचा ते ठाण्याचे सांगतात. आता जी गर्व्हमेंटची मिटींग झाली त्याच्यामध्ये त्यांनी ते कनेक्शन कट करायला सांगितले.

भगवती शर्मा :-

नाही आमची ही विहिर कधी साफ होणार?

सुरेश वाकोडे :-

८ दिवसात.

अनिल भोसले :-

या शहरामध्ये कर्मशिअल असलेले पाणी जे स्विमिंग पूल आहेत जे हॉटेल्स आहेत त्यासाठी हे पाणी ४ महिने थांबवण्यासाठी पर्यायी व्यवस्था करता येईल का?

निलम ढवण :-

महापौर मॅडम, मिरा भाईंदरचा पाणी प्रश्न हा काही नव्याने उपस्थित झालेला नाही. मिरा भाईंदरचा पाणी प्रश्न हा पहिल्यापासून अजूनपर्यंत इतक्या वर्षापासून आहे. पाणी प्रश्न हा ९६-९७ ला जो उद्रेक झाला होता लोकांचा. तो उद्रेक कदाचित आता होण्याची शक्यता आहे. कारण लोक त्या दृष्टीने बाहेर उतरतात आमच्यापर्यंत येतात. दुसरी गोष्ट मराठीत म्हण आहे तहान लागली की विहीर खोदायला जाणे. आज आता उद्रेक होण्याचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर आपण सगळे साफसफाई आणि पाण्याच्या सोयी करण्याचा विषय चालु आहे. पुन्हा हा ९६-९७ चा उद्रेक होऊ नये याची काळजी आता आपली मिटींग झाली खूप चांगल होणार परंतु जी हॉटेल्स आणि बाकी इतरत्र जे टँकरने पाणी जाते त्यांचे मात्र कन्टीन्यू चांगल्या प्रकारे धंदे चालु आहेत परंतु घरोघरी पिण्यासाठी पाण्याला आमच्या स्वतःच्या घरात देखील पाणी नाही अशी अवस्था असते. लोक आम्हाला हा प्रश्न विचारतात की नगरसेवकांच्या घरात पाणी नाही तर आम्हाला काय देणार. लाज वाटते आम्हाला या गोष्टीची. प्रत्येक सोसायटीला इतक्या कमी प्रेशरने पाणी असतं. येत पाणी १५-२० मिनिट, २० मिनिट सोडून द्या १० मिनिट सुध्दा पाणी मिळत नाही. १० मिनिटाच्या पाण्यामध्ये लोक अंघोळ करतील का पिण्यासाठी वापरतील. याची पर्यायी व्यवस्था एकतर झाली पाहिजे.

मॉरस रॉड्रीक्स :-

२४ तासात पाणी नाही दिले तर पाण्याची बिल भरू नये.

प्रेमनाथ पाटील :-

आयुक्त साहेब मला एक प्रश्न विचारायचा आहे. मिरा भाईंदरमध्ये जेव्हा पाण्याच्या टाक्या आहेत तिथे आपण प्रत्येकाला फोन नंबर दिले आहेत. ते फोन कशासाठी दिलेत त्यांचे बिल कोण भरते. जे फोन लॅन्डलाईन दिले आहेत त्यांचे बिल कोण भरते? आपण भरतो ना. मग हे कर्मचारी, मी २० तारखेला साहेब ट्राय केले ९ वाजेपासून ११ वाजेपर्यंत फोन करत होतो. ते फोन बाजूला करुन ठेवतात. मग त्या कर्मचा-यांवर काय करायचे. आम्हाला लोक प्रश्न विचारतात. आम्ही फोन करुन विचारतो की पाणी कधी येणार हे लोक अक्षरशः साहेब फोन बाजूला काढून ठेवतात मग त्याला जिम्मेदार कोण? आम्ही कोणाकडे तक्रार करायची, कोणाकडे विचारपूस करायची की पाणी कधी येणार, किती वाजता येणार? यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार ते सांगा मला. माझ्याकडे तिघांची नावे पण आहेत नाईटला तिकडे होते त्यांची सर्वांची. ९ वाजेपासून फोन करत होतो ११ वाजेपर्यंत. फोन बाजूला नेऊन ठेवतात. आम्ही कोणाला प्रश्न विचारायचे. आम्ही आमचे फोन २४ तास चालु ठेवायचे लोकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी आणि तुमचे फोन बाजुला उचलून ठेवायचे. यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार सांगा मला पहिले.

शिल्पा भावसार :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलु इच्छिते कमिशनर साहेब मला एवढेच विचारायचे आहे की, पाण्याचा हा मोठा ज्वलंत विषय मिरा भाईंदर शहरात असून सुध्दा आपले पाणी डिपार्टमेंटचे जे कार्यकारी आहेत ते लोक मोबाईल बंद करुन ठेवतात. लोकांचे सकाळपासून ते रात्रीपर्यंत आमचे डोके खाऊन आम्हाला पण जबाब द्यायला लागतो आम्ही एक जबाबदार व्यक्ती आहोत. आम्हाला फोन कोणाला करायचा आणि विचारायच की पाणी ४-४, ५-५ दिवस बंद आहे. त्यांनी तर फक्त मॅसेज पाठवून सुटले ते की हे पाईप तुटले आणि ते पाईप तुटले. तुम्हाला २४ तास पाणी येणार नाही ४८ तास येणार नाही. २४ तास आम्हाला ऑफिसमध्ये बसावे लागते. लोक आम्हाला विचारतात की हर आठवड्यात तुमची पाईप कशी काय तुटतात. तर आम्ही काय उत्तर देऊ त्यांना आणि दुसरे टँकर सुध्दा आम्हाला आमच्या वॉर्डात पाणी जेव्हा नसते पाणी पिण्यासाठी पण नसते तेव्हा आम्हाला खाली १-२ टँकरसाठी आम्ही कधीपासून मागणी करतो आम्हाला १-२ टँकर सुध्दा देण्यात येत नाही. सरळ तोंडावर नाही म्हणतात की तुम्हाला टँकर भेटू शकणार नाही मॅडम तिकडे मारामारी होते अस आम्ही ऐकून घेतो रिक्वेस्ट करतो तरीसुध्दा ते काम होत नाही.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब टँकर आम्हाला देत नाही मग टँकर जातात कुठे.

शिल्पा भावसार :-

आणि आता या बिल्डींगमध्ये पाणीच नाही पिण्यासाठी तर आपण लोकांना पाणी पिण्यासाठी द्यायला पाहिजे. काम नंतर पण होऊ शकते ना बिल्डींगचा. दुसरे झोनमध्ये पाणी कधीच येत नाही तर ते कधी येणार. कधी सुटणार त्याचा रिपोर्ट सुध्दा आम्हा नगरसेवकांना द्यायला पाहिजे की आम्ही लोकांना उत्तर देऊ शकतो की या झोनमध्ये या वेळेस पाणी सुटणार आहे ते ही सुध्दा तुम्ही आम्हाला मॅसेज करा ना. जेव्हा तुम्ही एवढे मॅसेज करतात तर तेही करा. जे पाणी सोडतात ना वॉर्डात आमच्या त्यांनी काय-काय सोसायटी बांधायला गेलेले आहेत त्यांच्याकडून ते पैसे घेतात आणि काही सोसायटीमध्ये व्यवस्थितपणे पाणी माझ्या वॉर्डामध्ये सुटले जाते आणि काही सोसायटीत कपात करुन पाणी सुटले जाते हे सुध्दा न्याय पाहिजे हे असं का होते. याच्यावर कोण लक्ष देणार, उत्तर आम्हाला द्यावी लागतात ना. ते लोक प्रुफ करुन सांगतात मला माझ्या समोर प्रुफ घेऊन येतात.

सिमा शहा :-

महापौर मॅडम पानी की कपात है यह सारी बात सबको पता है। पहली बार मैंने ८ तारीख को एक टँकर बुक किया था। टँकर बहुत समय से आ गया साहेब पानी की पाईप वहाँ मेरे बिल्डींग तक नही पहूँच रही थी। मैने वहाँ खुद पर्सनली जाके देखा है एक नही १०-१०, १२-१२ टँकर भरते है तो मुझे खाली एक सवाल यह पूछना है की इतना सारा पानी कौन कौन सोसायटी को जाता है/ विथईन अे टू मिनिट थ्री मिनिट वो पानी भर जाता है। मेरे वहाँ पे पाईन न पहूँचने की वजह से मेरा पेंडीग चल रहा है। क्योंकी मेरी सोसायटी की टँक जहाँ पे है वो काफी अंदर है। मुझे अधिकारीने जवाब दिया की १०० मिटर की पाईप लगेगी जो पाईप उनके पास अवेलेबल नही है। मेरा पेमेंट आज भी वहाँ पे जमा पडा हुआ है। सवाल यह है की ४ सोसायटी मेरे प्रभाग में है जहाँ मैं बारी बारी एक ही बात बोलती हूँ। पानी की कपात आज के दिनो में आई है जब वो टाईम कपात नही थी वो टाईम भी वो सोसायटी को पानी पुरता नही था। हमारे एक भी अधिकारीने वहाँ पे जाके देखने के आने के बाद में कोई सोल्युशन आजतक नही निकाला है। मेरा भी कम से कम पेज ३ के ७ लेटर जमा होंगे वॅाटर डिपार्टमेंट मै की ४ सोसायटी की जो तकलीफ है वो सोल्युशन करके दिजीए। आज के दिन मे मैं खुद उनको मेरे पैसो से टँकर डालके देती हूँ।

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम, काकानी आता जो विषय घेतला दोन विषय आहेत. मुंबई महानगरपालिकेचे पाणी आपल्याला येते की नाही येत. याच उत्तर द्या आणि आत्ता मॅडम म्हणत होत्या तस तुम्ही प्रत्येक सोसायटीला पाण्याचे टँकर देतात का? ते पण द्या. दोन्ही गोष्टीचे जरा उत्तर दिले पाहिजे. बाकीच्या बयाच समस्या आहेत. काकांनी आपला एक्सपिरियन्स सांगितला की जमिनि खालच्या हालचाली आणि तापमान यामुळे पाईपलाईन एक्सपान्ड होते हे विधीलिखित आहे आणि असं असताना या गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

(सभागृहात गोंधळ)

सुरेश वाकोडे :-

आपण वॅाटर पार्कचे कुठेही कनेक्शन दिलेले नाहीत. सुरज वॅाटर पार्क हे आपल्या हद्दीतले नाही ठाण्याच्या हद्दीतील आहे. त्यांचे जे काही असेल ना ते ठाणे महानगरपालिकेने करायचे आहे. सुरज वॅाटर पार्क हा ठाण्याच्या हद्दीतला आहे.

अनिल भोसले :-

मिरा भाईंदर शहरामध्ये येणाया पाईप लाईनला सुरज वॅाटर पार्कला एवढी मोठी लाईन जॅाईन्ट आहे ना.

सुरेश वाकोडे :-

आपल्या लाईनला काही जॅाईन्ट नाही. आपला त्यांचा काही संबंध नाही. दुसरे पुनम नगर सोसायटीचे आपण बोलला होता त्यासाठी आपण पाईपलाईन मंजूरी केली आहे ते काम आपण करुन घेतो. ते प्रॅाब्लेम सॅाल्व्ह झाले की हे काम करुन घेऊया.

अनिल भोसले :-

मॅडम या शहरामध्ये कर्मशिअल कनेक्शन हॅाटेल्स नाही येत? या शहरामध्ये हॅाटेल्सला कनेक्शन आहेत की नाही? त्यांना व्यवसाय करण्यासाठी पाणी हवे आहे लोकांना इथे पिण्यासाठी पाणी हवे आहे.

राजेंद्र जैन :-

सुझाव है मेरा. पानी की दिक्कत इसलिए हो रही है क्योंकी पानी कमी है और इसलिए एक दुसरे के कपडे फाडे जा रहे है। ७ साल पहले मैंने एक लेटर दिया था वहाँ पर की अभी तक हम एम.आय.डी.सी के उपर डिपेन्डन्ट है। पानी दुरसे आता है नवी मुंबई महानगरपालिका के थ्रु आता है इतनी लंबी पाईपलाईन है। लंबी पाईप लाईन है तो डिस्टर्ब भी होगी और तुटेगी भी। हमारा शहर का खुद का रिझर्व्हेशन हमारे पास नही है। चेणा नदी के उपर ३ साल से पहाड गिरा हुआ है। गर्मी के अंदर भी मिठा पानी वहाँ पे रहता है। जो टँकर वाले बेचते है हमने सुझाव दिया था वहाँ पे लॅन्ड एक्वीझेशन करके फॅारेस्ट डिपार्टमेंट से वापस डॅम बनाए जाए। ताकी ऑटो सप्लाय बने फॅारेस्ट लाईन आती है चेणा नदी से लाईन हमारी ऑलरेडी यहाँ तक आई हुई है उस लाईन में पानी अॅड कर सकते है। जाधव सर आय.ए.एस. ऑफिसर थे उनसे बात किया था वाकोडे साहब से बात कीया उन्होंने कहाँ फिजिबल नही है। फिजिबल कबतक नही है जब तक पानी मिल रहा है जब तक उसकीइकोनॅामिक सँग्शन दे सकते है। फिजिबल है की नही जलजीवन मैं पानी है ही नही तो फिजिबिलीटीवाली बात आती नही है। हमने ७ साल में अभी तक एक भी इस तरह से काम नही किया है की मालुम पडे वो फिजिबल है की नही। मैं चाहता हूँ वापिस बात करके आज की चेणा नदी के उपर डॅम बांधने से हमे कितना एम.एल.डी. पानी एक्स्ट्रा मिल सकता है। कितनी पाईपलाईन काम आ सकती है इसका पुरा-पुरा सर्व्हे होना चाहिए यह मैंने ७ साल पहले बोला था अभी तक इसपे काम नही हुआ है। इसको टाला गया है बार बार। इसके उपर अच्छे सर्व्हे हो की चेणा नदी पर हमारा डॅम बन सकता है। क्या राज्यसभा इसको बनाके दे सकती है या हमे खुदके इसमें से १० टक्के, २५ टक्के फंड में से कर सकते है। इसका आप रुलिंग दिजीए इसपर।

सुहास रकवी :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, आता डॅाक्टर साहेबांनी जे सांगितले तेच आम्ही तुम्हाला स्थायी समितीच्या वेळी घेतलेला. प्रशांत साहेबांनी सुध्दा सुचविले की चेणा नदीचे पाणी तेव्हा तत्कालीन जे इकडचे आमदार होते गणेश नाईक साहेबांनी सुध्दा सर्व्हे केला होता. आम्ही त्यांना सांगितले की तुम्ही या

आठवडा भरामध्ये त्याचा सर्व्हे करा ते पाणी आपल्याला वापरायोग्य असेल त्याचे फिल्टरायझेशन करता येत असेल ते नसेल समुद्र जवळ आहे आता परदेशात बघितले असेल की फिल्टरायझेशन होते दुबई अरब या कन्ट्रीमध्ये होते तर ते  जर शक्य होत असेल तर त्याचे तुम्ही सोर्सेस पण तुमची इच्छा शक्ती नाही. तुमची इच्छाशक्ती नसल्या कारणाने हे सगळे प्रॉब्लेम क्रिएट होत आहेत.

मा. आयुक्त :-

१० रुपये लिटर चालेल का?

सुहास रकवी :-

साहेब अस पण २५ रु. लिटर तर बिसलरी आहे. १० रुपये लिटर बघा पाणी आणा..................

मा. महापौर :-

खूप झाला हा विषय आपण सगळ्यांनी आता बसून जा. सगळ्यांना उत्तर भेटत आहे.

सुहास रकवी :-

मॅडम ऐका जरा आमच्या या जुन्याकाळामध्ये विहिरी आहेत. आमचे जे प्रश्न होते ते आम्ही सांगतो ज्यांच्याकडे नाहीत त्यांचे आम्हाला माहित नाही. पण त्या सुध्दा साफ केल्या तिकडच्या त्या म्हणतात २,५,७ टक्के तेवढ्या लोकांना तर रिलॅक्सेशन मिळेल प्रयत्न करा इच्छाशक्ती ठेवा सर. आमच म्हणण काही नाही पाण्याचा प्रश्न विरोधी किंवा सत्ताधारी असा नाही. आम्ही आमच्या विहीरी आधी स्वतः साफ करायचो आता कस बाजुला गटार असल्या कारणाने.............

मा. महापौर :-

तुमची मागणी आहे की विहिर साफ करायची त्याचे उत्तर देतात ना ते.

सुहास रकवी :-

मॅडम याच्या पलीकडे जाऊन सांगतो दरवर्षी नियमित साफ झाल्या पाहिजे त्याच्याकरिता आमची सूचना आहे.

मर्लिन डिसा :-

साहेब दोन गोष्टी आहेत आम्हाला एक तर शेडयूल्ड द्या. कम्पलीट की पाणी आता एक्झाक्टली किती तास येणार किती तास नाही येणार प्लस झोन व्हाईस जे तुम्ही पाणी सोडणार.प्रत्येक नगरसेवकाला आम्हाला तुम्ही कळवा म्हणजे आम्हाला घडी घडी फोन करण्याची संधी नको. विक्रमकुमार साहेब जेव्हा होते त्यांनी पावसाळयात कॅचमंट एरिया मध्ये जे नॅशनल पार्क आहे आमच्याकडे जास्त पाणी तिथून येते आम्हाला. ते कॅचमंट एरिआ आहे तिकडे ट्युबवेलस्, आर्टिफिशिअल टँक हे सगळे केले तर आम्ही खूप पाणी जमा करु शकतो. जसं सोसायटी मध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग सांगतात तसं तुम्ही रेन वॉटर हार्वेस्टींग तिथे पण करा ते पाणी जर आपण पकडून ठेवले तर आम्हाला ते पूर्ण वर्षभर काम येईल ही माझी सूचना होती ती तुम्ही घ्या.

सुरेश वाकोडे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. आत्ता यात जे नगरसेवकांनी वेगवेगळे आपले प्रस्ताव सांगितले सूचना सांगितल्या हे सगळं काय आहे की आपण कमी पाणी आले त्यामुळे एवढे प्रॉब्लेमस् सुरु आहेत. आता याच्यामध्ये जे आपल्याकडे कम्युनिकेशनचा गॅप होत आहे की आपल्याकडे माहिती पोहचत नाही. कोणी फोन बरोबर ठेवत नाही. या बाबतीत आम्ही त्या लोकांची आयुक्त साहेबांकडे मिटींग घेतो आणि असा प्रकार परत होऊ नये त्याची आम्ही दक्षता घेऊ आणि लोकांना कम्युनिकेशन कस वाढवता येईल त्यांना सांगूया. ॲक्च्युअली वॉर्ड मधील लोकांचा प्रॉब्लेम काय होतो की, टाकी केव्हा भरेल हे त्यांना समजत नाहीए. त्यामुळे सांगायच काय हा त्यांना प्रश्न येतो. आम्ही तिथे चांगला प्रॉपर माणूस बसवू या आणि कम्यूनिकेशन वाढवू या याच्यामध्ये. दूसरे आपण बीएमसी च्या बाबतीत बोलतात बीएमसी चे आपण पाइपलाईन टाकून तयार झाली आहे आपण त्यांना कनेक्शन जोडण्यासाठी पैसे भरलेत, कनेक्शन जोडा म्हणून सांगितले त्यांच्याकडे विनंती केली आहे. नेमकी कपात सुरु झाल्यामुळे त्यांनी ते कनेक्शन आपल्याला जोडलेले नाहीत तरी आपण आयुक्त साहेबांकडून आमदार साहेबांकडून पत्र ही पाठवलेले आहे. त्याचा पाठपुरावा चालु आहे आपला. इव्हन म्हाडाचे उपाध्यक्ष आहेत त्यांनी सुध्दा बीएमसी कमिशनरला पत्र दिलेले आहे हे दिड एम.एल.डी. चे पाण्याचे कनेक्शन तात्काळीने चालू करा म्हणून तो पाठपुरावा चालु आहे.

प्रमोद सामंत :-

ठराव झाला आहे त्यांना पाणी द्यायचे नाही.

जुबेर इनामदार :-

त्यांच पाणी शहरामध्ये पाच वर्ष बंद आहे मग तुम्ही पाणी दिले कसे?

प्रमोद सामंत :-

त्या दिवशी तुम्ही सांगितले मिटींगमध्ये की म्हाडाला मुंबईचे पाणी देतो म्हणून.

सुरेश वाकोडे :-

म्हाडाचे जे गर्व्हरमेंट कम्पोडंट आहे त्या लोकांना ताब्यात घेण्यासाठी म्हणून आपण ते...............

(सभागृहात गोंधळ)
जुबेर इनामदार :-

त्यांना काय विशेष सवलत दिली पाहिजे आणि बाकीचे शहर उपाशी राहिले तरी चालेल का?

सुरेश वाकोडे :-

साहेब आत्ता नाही. ते काकाणी साहेब असतांना केले आहे. आपण त्यावेळेला म्हाडा सोबत, बीएमसी सोबत मिटींग झाली त्यांनी दिड एम.एल.डी. चे पत्र दिले साहेब आपल्याला आणि हे कनेक्शन चालु करण्यासाठी पयत्न चालु आहे सर.

प्रमोद सामंत :-

आयुक्त साहेब ज्यावेळी चार एफ.एस.आय एम.एम.आर.डी.ए. ने सॅक्शन केले त्यावेळी ठराव झालेला आहे की, त्यांना आपल्याकडे पाणी नाही. नविन बांधकामाला पाणी देवू नये म्हणून त्यानंतर त्यानंतर गेल्या मिटींगमध्ये ३-४ मिटींगपूर्वी त्यांच्याकडे विचारले गेले होते की त्यांना कुठल्या लाईनमध्ये पाणी देत आहेत. कोण पाणी देत आहेत आणि तोंडी सांगितलेले आहे की मुंबईचे पाणी देतात. आज सांगतात काकांनी सांगितले की मुंबईकडून पाणी नाही आले म्हणजे नेमके काय सांगतात ते. पाणी बंद करा म्हाडाचे येईल ना मुंबईचे पाणी.

सुरेश वाकोडे :-

आपण तशी त्यांना म्हाडाला नोटिस पण दिली होती. पाणी बंद करा म्हणून त्याच्यावर म्हाडाच्या उपध्यक्षांनी बी.एम.सी. ला पत्र दिले आहे की यांचे कनेक्शन चालू करा.

प्रमोद सामंत :-

तुम्ही त्यांना पत्र दिले होते असे की तुम्ही पाणी द्या आमच्याकडे पाणी नाही म्हणून.

सुरेश वाकोडे :-

दिले आहे पत्र.

प्रमोद सामंत :-

तुम्ही २ एम.एल.डी. पाणी देत आहोत.

सुरेश वाकोडे :-

दिड एम.एल.डी. मंजूर आहे. त्यांना पाणी देतो आपण फक्त पॉईंट ५ पाणी.

प्रमोद सामंत :-

सभागृहाला वाकोडे साहेब खोटी माहिती कशाला देतात नेहमी.

सुरेश वाकोडे :-

कुठली माहिती खोटी दिलेली नाही.

प्रमोद सामंत :-

मग गेल्यावेळी तुम्ही सांगितल की नाही मुंबईचे पाणी देणार म्हणून. आपल्याकडे पाणी नसताना तुम्ही म्हाडाला पाणी का दिले?

सुरेश वाकोडे :-

म्हाडाला आता पाणी नाही दिले साहेब. काकाणी साहेब असताना त्यावेळी उपाध्यक्ष बी.एम.सी यांची मिटींग झाली त्यावेळेला दिलेले........

भगवती शर्मा :-

आयुक्त साहब यह जो बोल रहे है ना काकाणी साहेब के टाईम के अंदर में उस समय भी सभागृह में यह चर्चा हुई थी तब भी इन्होंने कहाँ था हम नही देंगे।

जुबेर इनामदार :-

मुंबई महानगरपालिकेने आश्वासन दिले होते आम्ही पाणी देऊ. परिस्थितीच्या अभावी ते देत नाही. त्यांना तुम्ही ८ दिवसांची नोटिस द्या. तुमच पाणी नाही आलं पाणी डायरेक्ट बंद करणे इमिजिएट हे योग्य नाही. त्यांना ८ दिवसांची नोटिस द्या. त्यांनी आपल्याला पाणी नाही रिलिज केले मुंबईने तर म्हाडाचे कनेक्शन बंद करा या पूर्ण शहरामध्ये आपण एक धोरण निश्चित केलेले आहे. नविन पाणी साठा जोपर्यंत आपल्याकडे उपलब्ध होत नाही. तोपर्यंत ............

हंसुकुमार पांडे :-

महापौर मॅडम, इतनी चर्चा कर रहे है कन्क्लुजन क्या निकला।

सुरेश वाकोडे :-

तशी आम्ही नोटिस देतो म्हाडाला.

हंसुकुमार पांडे :-

पाणी किती तासात भेटणार कन्क्लुजन काय?

मा. महापौर :-

अभी आप सब बैठ जाइए। अभी कमिशनर सर जवाब दे रहे है।

अशरफ शेख :-

वाकोडे साहेब आपण नोटिस दिली का मुंबई महानगरपालिकेला? कधी दिली नोटिस? नोटिसमध्ये नेमके काय लिहिले आपण

सुरेश वाकोडे :-

२० दिवसांपूर्वी नोटिस दिली आहे आपण त्यांना म्हटल बी.एम.सीचे पाणी आम्हाला मिळत नाही. अजून सुरु झाले नाही त्यामुळे तुमचे कनेक्शन खंडीत करु आम्ही.

अशरफ शेख :-

किती तारखेला दिले आहे आणि किती तारखेपर्यंत दिले आहे.

सुरेश वाकोडे :-

२० दिवसांची दिली होती. त्यावर त्यांनी उपाध्यक्ष साहेबांना पत्रही दिले आहे. बी.एम.सी. कमिशनरला पत्र लिहिले आहे त्यांनी.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, पाणी पुरवठाचा प्रश्न दिवसेंदिवस या शहरामध्ये गंभीर होत चाललेला आहे. याची आम्हाला जाणीव आहे. आणि याच्याबद्दल काय आम्ही कारवाई केली त्याबद्दल आम्हाला बैठकीमध्ये मा. आमदार साहेब होते. आपण होतात काही गटनेते होते आणि सर्व पक्षाचे नगरसेवक होते. तिथे चर्चा झाली आहे. थोडक्यात मी आपल्याला सांगू इच्छितो की, मिरा भाईंदर शहराला दोन ठिकाणाहून पाणी पुरवठा होतो. ८६ एम.एल.डी. पाणी आपल्याला स्टेममधून मिळते स्टेमची यंत्रणा ही जी प्रायव्हेट कं. स्थापन झालेली आहे. ती ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका आणि मिरा भाईंदर महानगरपालिका आणि एकाच लाईनमधून काही ठिकाणापर्यंत पाणी येते आणि ते नंतर आपली मिरा भाईंदरची लाईन ठाण्यापर्यंत आहे. ठाण्यापासून नंतर सेपरेट होते. भिवंडीचे पाणी भिवंडीला जिथे पाण्याचे शुध्दीकरण होते तिथून जाते आणि ठाण्याची लाईन वेगळी आहे. म्हणजे काही एरियापर्यंत एकत्र पाणी येते आणि पुढे वेगळी होते अशी एकत्रित पाणी पुरवठाही योजना आहे. आणि आपल्याला ५० एम.एल.डी. पाणी भेटते एम.आय.डी.सी. कडून. आता बरीच चर्चा झाली याच्यावर कपात झाली, नाही झाली वगळली नाही वगळली मी आपल्याला सांगू इच्छितो की आपल्याला जे ८६ एम.एल.डी. पाणी स्टेममधून मिळते त्याची सुध्दा ३० टक्के कपात झाली होती. मात्र मा. महापौर, मा. आमदार साहेबांनी संबंधित मा. मंत्री महोदयाकडे बैठक लावली. त्या बैठकीमध्ये सगळ्या संबंधित डिपार्टमेंटच्या अधिकायांना बोलावले आणि त्या ठिकाणी बैठक झाल्यानंतर ती कपात शिथिल करण्यात आली म्हणजेच रद्द करण्यात आली. आता विषय असा झाला की आपला एकत्रित सगळा उपसा असल्यामुळे स्टेम एकच ऑथिरीटी आहे एकत्रित सगळ्यांचे पाणी एका ठिकाणी शुध्दीकरण होऊन तिथून पूढे मिरा भाईंदर, भिवंडी आणि ठाण्याला डिस्ट्रीब्युशन होते. त्यामुळे या ८६ एम.एल.डी. पाण्यामध्ये आजच्या तारखेला कपात नाही ती कपात शिथिल करण्यात आलेली आहे. पण दुर्देवाने अशी घटना घडली या आठवड्यामध्ये की आपल्याला २ दिवसाची कपात आपली एम.आय.डी.सी. च्या कपातकर कंडीशनमध्ये चालु होती आणि ती कपात चालु असतानाच पाईप लाईन फुटली आणि ती दुरुस्त करण्यासाठी जो काही कालावधी लागला हे एकत्रित मिळून जवळपास तीन साडे तीन दिवसांच्या कालावधी लागला आणि त्यानंतर पाणी तुम्हाला चौथ्या दिवशी मिळाले. सॉरी ४ दिवसांचा कालावधी गेला आणि पाचव्या दिवशी पाणी मिळाले. त्याच्यामुळे हाहाकार झाला सगळीकडे अशी परिस्थिती निर्माण झाली. त्याच्यामुळे आम्ही आज परत यांना बोलावले होते. स्टेमचे जे डायरेक्टर आहेत त्यांना बोलावले ती बैठक आपल्या समक्ष झालेली आहे. तर स्टेमकडून कपात होणार नाही मात्र एम.आय.डी.सी. कडून जे ५० एम.एल.डी. पाणी भेटते अस आपल्याला एकत्रित १३६ एम.एल.डी. पाणी या शहराला भेटते. एम.आय.डी.सी. मध्ये आपल्याला जी कपात लागू झालेली आहे. ३० टक्के कपात त्याच्यामध्ये एम.आय.डी.सी. ची लागू आहे. त्याच्यामूळे आपल्याला मिळणारा पाणी पुरवठा १०५-११० एम.एल.डी आहे किंवा ११३ एम.एल.डी. होतो आणि याच्यामध्ये वॉटर लॉसेस विचारात घेता आपल्या घरापर्यत पाणी किती पोहचते आणि पाण्याची काय परिस्थिती हे सगळया जगाला माहित आहे. आणि आपल्या ठाणे जिल्ह्यामध्ये जी धरणे आहेत त्या धरणातून कुठे-कुठे पाणी पुरवठा होतो आणि किती टक्के पाणी त्या धरणामध्ये आहे याचे नियोजन इरिगेशन डिपार्टमेंटने सगळ केलेले आहे. १५ जुन पर्यंत पाणी मिळेल असं नियोजन केलेले आहे. परंतु थोडे आपण सर्वांनी सहकार्य करावे कारण फार पाणी पुरवठा बद्दल क्रायसेस झालेले आहेत आणि प्रत्येक जण एकमेकांवरती डिपेन्ड आहे. एकाच पाईपलाईन मधून आपण ३-३ लोकांचे पाणी येत आहे. आणि सगळ्यात महत्वाचा मुद्दा म्हणजे जयस्वाल साहेब चेअरमन आहेत ठाणे कार्पोरेशनचे आयुक्त त्यांच्याकडे पण आम्ही एक बैठक परवा मागच्या २-४ दिवसांपूर्वी झाली आणि स्टेमची आपली बैठक होती त्यानंतर बैठक झाली त्याच्यामध्ये पण आम्ही त्यांना विनंती केली की ठाणे महानगरपालिकेकडे जवळपास २० एम.एल.डी. का ३० एम.एल.डी. माझ्या माहितीनुसार पाणी शिल्लक आहे. म्हणजे त्यांच्या आवश्यकतेनुसार त्यांच्याकडे पाणी कोटा शिल्लक आहे. त्यामधून १० एम.एल.डी. पाणी त्यांनी आपल्याला १५ जूनपर्यंत देण्याचे कबूल केलेले आहे. आणि दुसरी एक अशी गोष्ट आहे की इरिगेशन डिपार्टमेंटला जे सिंचन भवनला चिफ इंजिनिअर आहेत त्यांच्याकडे मी आणि वाकोडे आणि स्टेमचे आमचे डायरेक्टर आम्ही तिघा जणांनी मिळून एकत्रित बैठक घेतली आहे. त्या बैठकीमध्ये त्यांनी आम्हाला थोडा क्लू असा दिला की, वरच्या स्तरावरती आपला नवि मुंबई महानगरपालिकेकडे काही पाणी शिल्लक आहे त्याच्यामधून आपण १० एम.एल.डी. पाणी १५ जून पर्यंत मागण्यांच आमचं अस मानस आहे की मिरा भाईंदर शहराला कसल्याही परिस्थितीत पाणी कमी पडू नये या दृष्टीकोनातून आम्ही आमच्याकडून प्रयत्न जेवढा होईल तेवढा जास्त करत आहोत. आता काकांनी सांगितले आणि मला वाटते काका आपण माझ्याकडे निवेदन जवळपास दिड

महिन्यांपूर्वी किंवा दोन महिन्यांपूर्वी दिलेले आहे की, विहिरी उपसा ज्या बद्दलचे आणि ते एकदम रास्त होते. या वर्षी पाऊसकाळ कमी पडलेला आहे. पाऊस कमी पडल्यामुळे तळ्यामध्ये पाणी कमी म्हणजे स्टोरेज, कॅपिसिटी, साठा कमी आहे. याची सगळ्यांना जाणीव होती आणि त्यामुळे पुढे आपल्याला नियोजन करणे गरजेचे आहे. म्हणून आम्ही त्याचे टेंडर काढलेले आहे. टेंडर फायनल झालेले आहे. फक्त आदेश देण्याचे बाकी आहे तर त्यांना मी सांगितले आहे की आजच्या तारखेमध्ये सगळ्या काही फॉरमॅलिटिज आज उद्या करुन घ्या आणि शुक्रवारपर्यंत आदेश देऊन आम्ही १५ मार्चपर्यंत हे जास्तीत जास्त यंत्रणा लावून जे काही टेंडर मंजूर झाले असेल त्या दराने वेगवेगळ्या प्रभाग समितीमध्ये जेवढ्या विहिरी असतील तिथल्या विहिरी साफ करण्यासाठी आपण जास्तीत जास्त यंत्रणा लावून १५ मार्चपर्यंत सगळ्या विहिरी साफ करुन घेण्याची कारवाई युध्द पातळीवर करुन घेऊ आणि ज्या प्रभागामध्ये काही अनइक्वल डिस्ट्रीब्युशन आहे त्याच्याबद्दल आता वाकोडेने सांगितल की प्रत्येक प्रभागामध्ये वेगवेगळ्या टाईमला वेगवेगळे झोनिंग आहे. त्यात जर काही प्रॉब्लेम असेल तर तुम्ही माझ्या डिपार्टमेंटमध्ये या मी ते तुम्हाला डिस्ट्रीब्युशनचे सगळे व्यवस्थित करुन सांगतो आणि आपण सर्वांनी सहकार्य करावे अशी मी सर्वांना विनंती करतो. कारण आता आपण फेब्रुवारी एंडिंगमध्ये आहोत. अजुन याच्यापुढे मार्च, एप्रिल, मे जर पाणी पावसाळा आपल्याकडे सुर्देवाने मे महिन्याच्या शेवटी कोकणामध्ये पावसाला सुरुवात होते आणि जनरली कधी-कधी तर १५ जूनपर्यंत तरी अर्ध्याच्या वर भरून जातात. म्हणजे अशी परिस्थिती आम्ही मागे पाहिली आहे पण पहिल्यांदाच या कोकण एरियामध्ये गेल्या वर्षी फार कमी प्रमाणामध्ये पाऊस पडला त्याची मला सुध्दा जाणीव झाली की मी मराठवाड्यातला आहे. आमच्याकडे तर पाऊस कमी असतोच पण कोकणामध्ये पहिल्यांदा पाणी कमी पडतो या सारासार परिस्थितीचा आपण विचार करावा कारण फार गंभीर परिस्थिती आहे. मी परवा माझ्या गावी गेलो होतो. मराठवाड्यामध्ये तर एवढी बेकार परिस्थिती आहे की लातुरसारख्या ठिकाणी एक महिन्याला एकदा पाणी आहे. आता तर असं कळत की लातुरचा जिथुन पाणी पुरवठा आहे त्या तळ्यामध्ये थेंबभर पाणी उरलेले नाही त्याच्यामुळे आता रेल्वेने पाणी कुठून तरी येणार आणि मग पाणी वाटप होणार अशी गंभीर परिस्थिती आहे. त्यामुळे आपल्याकडे त्यापेक्षा फार शुल्लक परिस्थिती आहे. त्यामुळे आपण जे काही पाणी आपल्याकडे उपलब्ध आहे. त्याचे व्यवस्थित नियोजन करुन जे पाणी आपल्याला लवकरात लवकर जास्तीत जास्त दिवस कस पुरेल याच्यासाठी पाणी कपात लागलेली आहे. पाणी स्टोरेज असताना पाण्याची कपात लावली अशातला काही विषय नाही तरी पण आपल्या सर्वांनी सहकार्य करावे. आणि आपल्याला जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे पाणी डिस्ट्रीब्युशन करण्यासाठी आमचा देखील भरपूर प्रयत्न चालू आहे. यासाठी मा. आमदार, मा. महापौर सर्व गटांचे गटनेते या ठिकाणी जे गट अध्यक्ष आहेत त्यांचे पण सहकार्य आहे. आणि त्यांनी असच सहकार्य करावे एवढी मी सभागृहामध्ये विनंती करतो.

रोहिदास पाटील :-

रिसायक्लींगचे तुमच्याकडे पत्र लिहितो. त्याच्यावर विचारच होत नाही म्हणजे काय?

मा. आयुक्त :-

आता अंडरग्राऊंड ड्रेनेजची स्किम जी काका चालु आहे त्याच्याबद्दलची परिस्थिती आपल्याला माहित आहे की आपण आता त्याच्यातले तीन वॉटर ट्रिटमेंट प्लान्ट चालु झाले आहे. रिसायक्लींगचे फक्त पाचचे प्रोव्हिजन आहे. मार्च एंडिंगपर्यंत आम्ही रिसायक्लींगमध्ये ११५ एम.एल.डीचे आपले टोटल प्रोजेक्ट आहे तर तो ११५..................

हंसुकुमार पांडे :-

महापौर मॅडम एवढ सांगा फक्त पाणी किती तासात भेटणार आम्हाला.

(सभागृहात गोंधळ)

दक्षता ठाकूर :-

महापौर मॅडम कमिशनर साहेबांना माझा प्रश्न आहे. साहेब मध्ये मी तुम्हाला फोन केलेला वर्सोवा घोडबंदर इकडे टोलनाक्याकडे टँकर रात्री चोरीने भरले जातात. कारण तो वॉल फुटलेला थोडासा. पण फोडून फोडून लोकांनी तो जास्त करुन त्याच्याने इललिगली रात्रीचे १०० टँकर तरी भरले जात होते. त्याच्यावर तुम्ही कारवाई काही केलेली नाही अजून. ते वॉल बंद केलेत पण अजून का काही कारवाई नाही झाली. पेपरमध्ये बातमी पण आली.

सुरेश वाकोडे :-

स्टेमच्या पाईप लाईनला एअरवॉल जो होता त्याचा लिकेज सुरु झाला होता. त्या लिकेजचे पाणी खाली पडत होते आणि खाली पडलेले ते पाणी पंपाने भरत होता तो माणूस.

दक्षता ठाकूर :-

एक महिना अगोदर तुम्हाला अर्ज केलेला तरी पण तुम्ही काही कारवाई केलेली नाही.

सुरेश वाकोडे :-

तस नाही मॅडम आता मला सांगा एखाद्या चेंबरचे पाणी खाली पडते. खाली ओव्हर फ्लो होतो म्हणून तेथून कोणी माणूस खड्ड्यामधून पाणी भरतो.

भगवती शर्मा :-

तिथे लोकांनी फोडला तो वॉल.

सुरेश वाकोडे :-

एअरवॉलचे कसे आहे प्रेशरने कधी बॉल खाली बसत नाही त्यावेळेला काय होते तेथून पाणी पडायला लागते ती परिस्थिती होती. दुसया दिवशी स्टेमने येऊन त्याची व्यवस्था केली वरुन पॅक करुन टाकल होत ते.

मा. आयुक्त :-

मॅडम आपल्या प्रश्नाचे उत्तर मी देत आहे कृपया आपण बसावे.

दक्षता ठाकूर :-

अजून एक प्रश्न आहे वाकोडे साहेबांना घोडबंदर गावामध्ये जी मोठी टाकी आहे तिथे पाण्याचा साठा केला जातो ती टाकी लिकेज आहे त्याच्यासाठी पण मी अर्ज केलेत. जवळ-जवळ अख्ख्या गावाला पाणी पुरेल इतके पाणी वाया जात आहे तिकडनं.

सुरेश वाकोडे :-

ती जी टाकी आहे ती जुनी टाकी आहे. ती लिकेज आहे रेक्टीफिकेशनचे काम करुन घेतो ते.

आसिफ शेख :-

महापौर मॅडम, सन्मा सदस्या दक्षता ठाकूर इन्होंने जो बात बहुत गंभीर बात यहाँ पे रखी है या संदर्भात सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो या संदर्भात बातमी पण आली आहे की भाईंदरमध्ये सुरु आहे पाण्याची चोरी, जलवाहिनीच्या वॉलमधून रात्री लुट, कर्मचायांच्या संगनमताने टँकर लॉबी सक्रिय. आमच्या सन्मा. सदस्या बोलल्या १०० टँकर तिकडन ते चोरीला जात आहेत. पाणी चोरून विकले जात आहे आणि हजार-दिड हजार रुपयांना १-१ टँकर इथे तर पाण्यासाठी आग लागली आहे आणि मिरा भाईंदर पेटत चालले आहे. वाकोडे साहेबांनी खुलासा काय केला की तिथे लिकेज झालेला आहे. याचा अर्थ काय चोरी करायला त्यांना खुली पावर देऊन टाकली. बिनधास्त तुम्ही लुट सके तो लुट तुमच्या खुलासाचा अर्थ असा होत आहे.

दक्षता ठाकूर :-

साहेब याची अधिकायांना पण माहिती आहे. पण काहीच कारवाई केली नाही.

आसिफ शेख :-

तुम्ही गुन्हे दाखल करायला पाहिजे. कोण टँकरवाले होते कोणी पाणी चोरले आपले कर्मचारी सामिल आहेत का? तपास केला पाहिजे. पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल केला पाहिजे. ते नाही करत तुम्ही उलटा खुलासा करतात. लिकेज होत आहे म्हणून त्यांनी पाणी नेले म्हणजे तुम्ही समर्थन करतात चोरीचे.

सुरेश वाकोडे :-

साहेब आम्ही स्टेमला ही सूचना दिल्या तुमची माणसं रात्रीला ..........

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, मॅडम आपण मला फोन केला होता त्याच्यानंतर त्याच्यामध्ये चौकशी करण्यात आली आणि त्या ठिकाणी महानगरपालिकेची जी पाईप लाईन आपल्याकडे येते त्या एक वॉल लिकेज झाला होता. मी ताबडतोब वाकोडेला बोललो आणि काय झालयं की वॉल लिकेज झाल्यामुळे तिथे पाण्याचा फ्लो होत होता म्हणून तिथे चोरी करणारे म्हणा किंवा टँकरवाले जे लोक आहेत म्हणजे टँकरवाले लोक चोरी करणारे आहेत असं मी म्हणत नाही पण ते टँकरवाले लोक जिथे दिसेल तिथे पाणी उचलतात म्हणून त्यांनी काय केले तिथे खड्डा खोदला आणि खड्डा खोदून जे पाणी गळत होते त्या खड्डयातून त्यांनी पाणी भरलेले आहे ही गोष्ट बरोबर आहे परंतु आम्ही ताबडतोब स्टेम ऑथिरीटीचे जे लोक आहेत त्यांना सांगितले असे या ठिकाणी वॉल लिकेज झालेला आहे परंतु पाईपलाईनमधून पाणी चालू असताना त्या वॉलचे काम करता येत नाही. म्हणून त्यांनी काय केले ज्या दिवशी शट डाऊन असतो त्या दिवशी त्या वॉलचे काम केले आणि आपण फोन केल्यानंतर २-३ दिवसानंतर त्या वॉलचे काम केले आणि ते काम केल्यानंतर ते पाणी भरण्याचे बंद झाले आहे. आणि आपल जस अस म्हणणं असेल की परत त्याच लिकेज होत आहे तर मी स्वतः तेथे व्हिजीट करायला तयार आहे. परंतु त्यांनी जर माझ्या पाईपलाईनला पाईप लावून पाण्याची चोरी केली असती तर आम्ही त्यांच्यावर गुन्हा करण आमच्यावर बंधनकारक आहे परंतु रस्त्यावर पाणी वाहत चालले आहे. एखाद्या ठिकाणी आणि खड्डयातून कुणी उचलून घेत असेल तर त्याला आम्ही काही मना करु शकत नाही. दुसरे आपण जे टाकीच्या गळतीबद्दल बोललात त्याबद्दल मी वाकोडेंना सांगितले आहे की ते ८ दिवसांमध्ये एक दिवस टाकीतले पाणी सगळे बंद करुन ते दुरुस्त करावे लागेल पण तोपर्यंत पाण्याची व्यवस्था काय करणार? वाकोडे बायपासने पाणी सोडायची व्यवस्था आहे का तुमच्याकडे? कारण दुरुस्ती करायची म्हटल तर त्याला २-४ दिवस सिव्हरींगसाठी वेळ लागेल की नाही.

दिपिका अरोरा :-

कमिशनर सर आपण सेग्रीगेशन ऑफ वेस्ट अशी सुरुवात आपण आपल्या मिरा भाईंदरमध्ये करत आहे. ५ एम.एल.डी. वॉटर हम लोग वेस्टेज से निकाल सकते है तो जो प्लान्ट आप लोग डिसिजन मेकिंग में ले वो डिसाईड ऐसा करे की हम लोग ५ से ६ एम.एल.डी. वॉटर सेग्रीगेशन ऑफ वेस्ट में से निकाल सके। इसमें अगर ५ प्रतिशत हम लोगो को बढौती होती है तो उसमें कुछ खराबी नही है मुझे लगता है।

प्रेमनाथ पाटील :-

आयुक्त साहेब माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही मिळाले. जे कर्मचारी फोन बाजुला ठेवनू काम करतात त्यांचे काय करायचे ते उत्तर अजूनपर्यंत मला मिळाले नाही.

मा. आयुक्त :-

वाकोडेंनी आपल्याला सांगितले आहे की, त्या ठिकाणी पाण्याचा असा प्रश्न झाल्यामुळे पाण्याची टाकी वेळेवर भरली जात नाही भरली नाही तर लोक विचारतात पाणी कधी सुटणार आहे. टाकीच भरली नाही तर तो कसं सांगणार पाणी कधी सुटणार त्याच्यामुळे त्याने फोन काढून ठेवला असेल. पण तो फोन काढून ठेवण्यासाठी नाही. याच्याबद्दल आम्ही संबंधित कर्मचायांची वॉटर सप्लायची बैठक घेवून त्यांना आम्ही सूचना देऊ याच्यानंतर अस होणार नाही. सभागृहात झालेल्या चर्चेची त्यांना जाणीव देवू आणि असा प्रकार जर पुढे घडला तर संबंधित कर्मचायांना निलंबित करण्यात येईल एवढे मी आपल्याला सांगतो.

मॉरस रॉड्रीक्स :-

कमिशनर सर आता किती तासात पाणी येईल ते सांगा.

मा. आयुक्त :-

अनिल भोसले साहेबांनी सांगितले की बयाच विहिरी बद्दलचे बोललो मी पण काही एरियामध्ये आपल्याकडे नॅचरल लेक्स आहेत तेथील पाणी धुण्या भांड्यांसाठी वापरले जाते. ज्या ठिकाणी गाळ काढणे शक्य आहे तेथील गाळ काढून घेऊया. स्किममध्ये आणि तेथील पाणी जास्तीत जास्त लोकांना धुण्यासाठी तरी वापरता येईल.

मॉरस रॉड्रीक्स :-

किती तासात पाणी येईल ते सांगायला सांगा.

सुरेश वाकोडे :-

सोमवार ते शुक्रवार पाणी ४८ तासांवर असणार. शनिवार ते रविवारचे पाणी साधारण ६५ ते ७० तासावर जाईल. साहेब एम.आय.डी.सी. चे पाणी बंद असते. बुधवार ते शुक्रवार त्यामुळे शनिवार, रविवार या वेळेला येणारे पाणी चार तास वाढतात. आता जी परिस्थिती होती जी ११५ तासांवर गेली होती तशी परिस्थिती राहणारनाही. ती कंट्रोलमध्ये राहणार. आता दोन्ही सप्लाय चालु आहे. एम.आय.डी.सी. चा जेव्हा सप्लाय बंद होतो ना त्यावेळेला तो पिरेड वाढणारच.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, आयुक्त महोदय विशेष सभा बोलवायचा अधिकार महापौरांचा असला तरी विशेष सभा कशासाठी बोलावली पाहिजे त्याचा स्पष्ट उल्लेख अधिनियमामध्ये आहे. आपल्या प्रकरण २ मध्ये त्यांनी स्पष्ट उल्लेख केलेला आहे. काय कारणाला आणि कशा परिस्थितीत विशेष सभा बोलावली पाहिजे. वाचून दाखवतो याच महत्वाचं कारण असं आहे तुम्ही सभा बोलावणार. तुम्ही या शहराचे महापौर आहात तुमच्या हातून कुठली चुक झाली ते आम्हालाही सहन होणार नाही. आम्हाला अभिमान आहे आमच्या महापौरांवर. महापौरास किंवा सांगितलेल्या प्रसंगी उपमहापौरांस त्यांना योग्य वाटेल प्रसंगी म्हणजे महापौरांची तब्येत बिघडली, मानसिक परिस्थिती, शारिरिक परिस्थिती चांगली नसेल तर तो अधिकार महापौरांना आहे.व्यतिरिक्त नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात भरविण्यात आली पाहिजे हा विषय आहे. म्हणजे विशेष काय. आता या विशेष सभेसाठी विशेष कारणे असणे गरजेचे आहे. एक विशेष कारणं देतांना विशेष विषय पाठवतांना विशेष सभेमध्ये प्रशासनाचा गोषवारा नाही. म्हणजे त्याचे कारण विशेष आहेत की, नाही काल आम्हाला एक शुध्दीपत्रक मिळालं.

मा. महापौर :-

हा ठिक आहे शुध्दीपत्रक मिळाल, बोला आता.

जुबेर इनामदार :-

शुध्दीपत्रक दिलं, त्याला गोषवारा नाही, नगरसचिवांनी शुध्दीपत्रक पाठवलेला त्याला गोषवारा नाही. सचिव महोदय तुम्हाला महापौरांना वेळोवेळी त्यांना सांगितले पाहिजे. नियमाचा अभ्यास करुन दिला पाहिजे. की, आपल्याला असे करता येईल असे करता येणार नाही. आणि त्यांनी तसं त्यांनी अमान्य केले तर तुम्ही तुमच्या स्तरावर असे कसे पाठवतात. तुम्ही नियमबाह्य कृती करता, तुम्ही चुकता कुठे तरी पण मग अशा परिस्थितीत सभा कशी चालेल. चालली पाहिजे, उत्तर लागेल ना आम्हाला आता आयुक्त उठुन गेले.

मा. महापौर :-

आहे ना उप-आयुक्त.

जुबेर इनामदार :-

उत्तर द्यावा आम्हाला अशा परिस्थितीत जेव्हा प्रशासनाचा गोषवारा नाही. तर तुमचा निवेदन करा आम्हाला फक्त ऐकुन येणे हा विषय नाही ना.

मा. महापौर :-

आता मला एक एवढे सगळे बोललं त्यात हे दाखवणार का महापौरांनी विषय घ्यायचा नाही असे कुठे तरी लिहिले आहे का.

जुबेर इनामदार :-

बिलकुल कुठे घ्यायचं ते दाखवा.

मा. महापौर :-

कुठे घ्यायचं नाही ते दाखवा.

जुबेर इनामदार :-

सांगतो ना महापौरांनी विषय, प्रशासनांनी दिलेले विषय महापौरांनी घ्यायचे असतात. अर्थ तोच झाला कारण त्यांच्यानंतर जेव्हा महापौरांना विषय फेटाळण्याचा अधिकार आहे. तुम्हाला प्रशासनांनी विषय दिला. तर विषय पत्रिकेवर घेतांना........

मा. महापौर :-

ते प्रशासनाने दिलेल्या विषयाच्या बाबतीत आहे. मला एखादा विषय घता येत नाही असे कुठे लिहिले असेल तर वाचा.

जुबेर इनमादार :-

तुम्हाला घेता येईल असे कुठे लिहिले आहे.

मा. महापौर :-

घेत नाहीत कुठे लिहिले आहे. मी जे विचारते त्याचे उत्तर द्याना.

जुबेर इनमादार :-

नियम परिपुर्ण आहे. पुर्ण ग्रंथ आहे आपल्यासमोर

मा. महापौर :-

हा त्यात लिहिला आहे का महापौरांनी विषय घ्यायचा नाही.

जुबेर इनामदार :-

असे लिहिलेला कुठं की घेता येईल.

मा. महापौर :-

कुठे नाही घेता येईल ते लिहीले आहे का?

जुबेर इनामदार :-

सचिवांनी अर्थ स्पष्ट करावा. आम्हाला विषय घ्यायचे असेल तर आम्हाला ''ज'' च्या माध्यमातुन घेता येतात अधिनियमांनी आपल्याला त्याचीही तरतुद करुन दिलेली आहे. महापौर मॅडम ऐकुन घ्या. तुम्हाला प्रशासनांनी विषय दिल्यानंतर तुम्हाला तुमचे काय विषय टाकायचं असेल तर तुम्हाला अधिकार आहे ना ''ज'' च्या माध्यमातुन घ्या. तुम्हाला असे कुठे अधिकार दिलेला आहे की, तुम्ही घेवु शकतात.

मा. महापौर :-

हा अधिकार कुठे दिले नाही ते कळवा ना इथे कुठे लिहिले आहे की, महापौरांनी विषय घेतला नाही. आणि मला जे वाटते ते योग्य केले आहे. तरी तुम्हाला वाटत नसेल तर तसे घ्या ना तुम्हाला जो निर्णय घ्यायचा असेल तो घ्याना.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे मुंबई महानगरपालिकेलगत असल्याने या शहरात विविध भाषिक मालिका व चित्रपट यांचे चित्रिकरण होत असते. सार्वजनिक जागांवर होणाऱ्या चित्रिकरणासाठी महानगरपालिकेने रु.१५०००/- प्रतिदिन हे दर निश्चित केले आहेत. शासनाने असा अध्यादेश पारित केला आहे की, मराठी मालिका व चित्रपट यांचे ५०ऽ कमी दरात चित्रीकरण करण्याची परवानगी देण्यात यावी त्या अनुषंगाने मराठी मालिका व चित्रपट यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना रु.५,०००/- प्रतिदिन या दरात दर आकारावेत.

सदरचे दर हे प्रति दिवस प्रती साईट (ठिकाण) प्रमाणे आकारण्यात यावेत तसेच सदर मालिका अथवा चित्रपट यांचे चित्रीकरण करताना कोणत्याही प्रकारे फसवणूक करुन सवलत मिळवून चित्रीकरण करताना आढळल्यास अथवा विना परवाना चित्रीकरण करताना आढळल्यास त्यावर १० पटीने दंड आकारण्यात यावा अथवा शुटींग सामुग्री गाड्या जप्त करुन पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे.

तसेच भाईंदर (प.) नगरभवन हॉलचे सध्या आकारण्यात येत असलेले रु.५०००/- प्रति दिन हे भाडे आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांसाठी जास्त असल्याने अशा घटकांना ५० टक्के सवलत म्हणजेच रु. २५००/- इतके भाडे आकारण्यात यावे असा ठराव मांडत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

सुहास रकवी :-

मॅडम, बाकीचे गोषवारे काशाला पाठवता. ते ही पाठवू नका ना. मग इतर गोषवारे पाठवू. बिना गोषवाऱ्याने चालवा ना. मॅडम गोषवारा सगळ्या विषयचं पाठवु नका ना.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुहास रकवी :-

मॅडम गोषवारा नाही का त्याला गोषवारा? आम्ही काय अभ्यास करणार.

आसिफ शेख :-

सचिव महाराज, आयुक्तांचे पत्र आहे. सचिव साहेब तुमची नेमणुक कोणी केली. तुमची नेमणुक आयुक्तांनी केली आहे.

सुहास रकवी :-

सचिव साहेब बिना गोषवाराने पाठवा ना विषय पत्रिकाच तुम्ही पाठवा.

(सभागृहामध्ये गोंधळ)

प्रकरण क्र. १६३ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चित्रिकरणासाठी मराठी मालिका व चित्रपट यांच्याकडून आकारण्यात येत असलेल्या भाड्यात व नगरभवन वापराच्या सवलत भाड्यात देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. १२७ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे मुंबई महानगरपालिकेलगत असल्याने या शहरात विविध भाषिक मालिका व चित्रपट यांचे चित्रिकरण होत असते. सार्वजनिक जागांवर होणाऱ्या चित्रिकरणासाठी महानगरपालिकेने रु.१५०००/- प्रतिदिन हे दर निश्चित केले आहेत. शासनाने असा अध्यादेश पारित केला आहे की, मराठी मालिका व चित्रपट यांचे ५०ऽ कमी दरात चित्रीकरण करण्याची परवानगी देण्यात यावी त्या अनुषंगाने मराठी मालिका व चित्रपट यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना रु.५,०००/- प्रतिदिन या दरात दर आकारावेत.

सदरचे दर हे प्रति दिवस प्रती साईट (ठिकाण) प्रमाणे आकारण्यात यावेत तसेच सदर मालिका अथवा चित्रपट यांचे चित्रीकरण करताना कोणत्याही प्रकारे फसवणूक करुन सवलत मिळवून चित्रीकरण करताना आढळल्यास अथवा विना परवाना चित्रीकरण करताना आढळल्यास त्यावर १० पटीने दंड आकारण्यात यावा अथवा शुटींग सामुग्री गाड्या जप्त करुन पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे.

तसेच भाईंदर (प.) नगरभवन हॉलचे सध्या आकारण्यात येत असलेले रु.५०००/- प्रति दिन हे भाडे आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांसाठी जास्त असल्याने अशा घटकांना ५० टक्के सवलत म्हणजेच रु. २५००/- इतके भाडे आकारण्यात यावे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- सौ. निलम ढवण अनुमोदक :- श्री. मोहन जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १६४, मा. महासभा दि. १३/०७/२०१५, ठराव क्र. ३२ राज्य शासनाने निलंबित केल्याबाबत त्यावर ३० दिवसांच्या आत अभिवेदन सादर करणेबाबत.

निलम ढवण :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी सर्व्हे क्र.१०७/१पै, १०८/१,२,३, १०९/२३,२४,२७,२८,११०/५ पै. या जागेच्या मंजुर रेखांकनातील ७७८१.०२ चौ.मी. क्षेत्राच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडापैकी ५०ऽ प्रमाणे जे ३८९०.५१ चौ.मी. क्षेत्राचा भुखंड विकासक मे. काऊटाऊन लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांना ३० वर्षाकरीता भाडेतत्वावर देणेबाबत दि.०१/०२/२०११ रोजी मा. महासभेने ठराव क्र.८५ अन्वये मंजुरी दिलेली असून त्याप्रमाणे विकासकाबरोबर महानगरपालिकेने करारनामा केलेला आहे.

सदरच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडाबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र. ४४४८/२०१३ दाखल असुन सदर याचिकेमध्ये अंतिम निर्णय पारित झालेला नाही. तसेच सदर भुखंडाबाबत कुठलीही निविदा प्रक्रिया न करता मा. महासभेच्या ठरावाच्या आधारे सदर भुखंड विकासकास भाडे तत्वावर दिलेला असल्यामुळे सदर भुखंडाबाबत झालेला करारनामा रद्द करुन ती जागा महापालिकेने ताब्यात घेवून विकसीत करणेबाबत दि.१३/०७/२०१५ रोजी मा. महासभेने ठराव क्र.३२ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर ठराव महानगरपालिकेच्या हिताचा नसल्याचे नमुद करुन विखंडीत करणेबाबत प्रशासनाने शासनाकडे विनंती केलेली आहे. त्याप्रमाणे शासनाने दि.१३/०७/२०१५ रोजीचा ठराव क्र.३२ निलंबित केलेला आहे व याबाबत अभिवेदन सादर करणेबाबत दि.२०/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

सदर बाबतीत शासनास अभिवेदन सादर करण्यात येते की, विकासकास सदरचा भुखंड भाडेतत्वावर देताना -

१) निविदा प्रक्रिया करणेत आलेली नाही.
२) भुखंडासाठी भाडे आकारताना खाजगी व्हॅल्युअर मार्फत भाड्याची निश्चिती केलेली असून शासनाकडून भाडे ठरवून घेतलेले नाही.

३) नागरी सुविधा क्षेत्राच्या ५०ऽ प्रमाणेचा ३८९०.५१ चौ.मी. क्षेत्राचा भुखंड भाडे तत्वावर देताना ७७८१.०२ चौ.मी. अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात आलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या ताब्यातील उर्वरीत ५०ऽ प्रमाणेचा जागेमध्ये चटई क्षेत्र निर्देशांक शिल्लक राहिलेले नाही.

४) मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात शाळेची आरक्षणे प्रस्तावित असून बहुतांश प्रमाणात शाळा विकसीत झालेल्या आहेत. त्यामुळे या जागेमध्ये शाळेऐवजी इतर सार्वजनिक स्वरुपाची जनतेला आवश्यक असणारी सुविधा उपलब्ध करुन देता येवू शकेल.

यास्तव दि.१३/०७/२०१५ रोजीचा ठराव क्र.३२ विखंडीत करण्यात येवू नये म्हणून व या जागेमध्ये पारदर्शकरित्या निविदा प्रक्रियेसह महापालिकेच्या हीताचा निर्णय घेवून भुखंड विकसीत करणेबाबत नव्याने प्रक्रिया करणे महापालिकेला शक्य होईल व त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याप्रमाणे शासनास अभिवेदन सादर करणेसाठी ही महासभा मंजुरी देत आहे.

नरेंद्र मेहता :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजुर आहे.

आसिफ शेख :-

मी उभा राहिलेलो आहे असे अन्याय करुन चालेल का?

भगवती शर्मा :-

नही-नही मॅडम हा ठराव मंजुर कैसे हो गया. अभी हमने कुछ बोला ही नही. आप पहिले ही बोल देते है।

मा. महापौर :-

आपने बोला ही नही.

भगवती शर्मा :-

आप बोलने का मौका ही नही देती है। आप बोलने का मौका कहा दे रही है।

मा. महापौर :-

आपको बोलना है, बोलीए.

भगवती शर्मा :-

हा रुकीए ना हा ठराव मंजुर मत करिए, अभी हमको ही बोलना है। ठराव भी करना है।

मा. महापौर :-

ठीक है, इन्होने पहिले से लिया हुआ है।

आसिफ शेख :-

क्या लिया हुआ है।

मा. महापौर :-

मंजुरी।

आसिफ शेख :-

ऐसा बोलो, हम खडे है पहिले।

मा. महापौर :-

आप बोलीए।

आसिफ शेख :-

सन्माननीय महापौर मॅडम, जेव्हा पासुन आपण महापौर पदाचा चार्ज घेतलेला आहे तेव्हा पासुन ते आतापर्यंत आपण कितीही मनात आणलं की, आपण चांगलं काम शहरासाठी करु आणि चांगले प्रस्ताव महासभेत आणु तरी शेवटी आता महापौर ची खुर्ची म्हटल तर शहराचा प्रथम नागरीक म्हणुन लोक आपल्याकडे बघतात. आणि कधी-कधी काय ठिक आहे. कोणाच्या सांगण्यावरुन आपल्याला करावं लागतं आपलच त्यांनी मान सन्मान दिलेला असतो. महापौर बनवल असते. मग कधी-कधी रिमोट कंन्ट्रोलचा वापर होत असतो.

मा. महापौर :-

आपण मुद्द्यावर बोलणार तर बरे होणार.

आसिफ शेख :-

आहो आम्हाला बोलु द्या मग रिमोट कंन्ट्रोलवर चालत असतांना असे आपल्याला आपले मनात काही विषय चांगले असतांना सुध्दा आपल्याला ते घेता येत नाही. आता विशेष महासभा घ्यायला पाहिजे त्याच्यामध्ये विशेष..........

मा. महापौर :-

आसिफ भाई मुद्दे पे बोलीए। सचिव साहेब पुढचे विषय घ्या. अगर इन्हको मुद्दे पे बोलना है, तोही बोलीए।

(सभागृहात गोंधळ)

सुमन कोठारी :-

महापौर मॅडम को बोला उन्होने, आप सन्मानीत सदस्य को बोल सकते है। अपनी बात रख सकते है लेकिन ऐसा नही बोल सकते आप माफी मांगीए उन्हसे ऐसा क्युं बोलते है। आप उनसे ये ओय-ओय क्या होता है।

भगवती शर्मा :-

मैने कुछ नही बोला, मैने सिधा बोला है उनको।

(सभागृहात गोंधळ)

भगवती शर्मा :-

ऐसे ही बोलना पडता है, आप जैसे बोल रहे हो ना वैसे ही बोलना पडता है। बीच के अंदर में जब बोलने नही दते हो तो, बात करना पडेगा ऐसे आवाज दबायेगा क्या कोई हमेशा आग लगाते हो आप विषय के उपर भी बोलने के लिए भी आज्ञा नही देंगे क्या।

निलम ढवण :-

महापौर मॅडम सभागृहाचा वेळ जातो. एक एकाला प्रत्येक का बोलु द्या मधे-मधे कोणाला बोलु देऊ नका. वेळेचा घोळ होत आहे.

मा. महापौर :-

असिफजी मैं आपसे कह रही हुँ की, पहिले मेरी बात सुनिए।

आसिफ शेख :-

अब मैं चुप बैठा हुं ना.

मा. महापौर :-

मैं आपको तभी बोलने दुँगी जब आप मुद्दे पे बोलेंगे नही तो मै इनको मौका दुँगी। बोलिए, आप मुद्दे पे बोलीए।

आसिफ शेख :-

हा मुद्यावरच बोलतो हे, ऐका ना जरा ऐकायची मनस्थिती ठेवा आम्हाला बोलु देणार की नाही.

मा.महापौर :-

बोला.

आसिफ शेख :-

सन्माननीय महापौर साहेब मी, यापुर्वीच तुम्हाला सांगितलं आताच सांगितले आहे की, आपण चार्ज घेतला चांगला हेतुने चार्ज घेतलेला आहे. महापौर झालेले आहेत. आणि आपण जेव्हा-जेव्हा याठिकाणी महासभेत जेवढे ठराव झाले आहेत त्या ठरावात शासनाकडे ज्या तक्रारी झाल्या आहेत ठरावांच्या आणि त्यामधल्या दोन-तीन ठराव तर विखंडीत शासनाने केलेले आहेत. मग हे अशोभणीय काम दिसतय कारण शेवटी आपला ठराव एखादा प्रशासनाच्या मार्फत गोषवारा नसतांना आपण प्रस्ताव आणतात. त्याच्यानंतर प्रशासनाची भुमिका आहे. याठिकाणी स्वंयस्पष्ट असा प्रशासनाने शासनाला कळवले आहे की, सदरचा ठराव पारित केल्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक नुकसान होत आहे. आणि आर्थिक नुकसान झाल्याचा शासनाने मान्य केलेले आहे की, महापालिकेचा आर्थिक नुकसान आणि एखाद्या बाबतीत जर महापालिकेचा आर्थिक नुकसान होत असेल आणि शासनाने जो ठराव निलंबीत केलेला आहे आणि तरी देखील आपण पुन्हा तो याठिकाणी सांगता आहेत की शासनाचा नुकसान हे शासनाच्या निर्देशाच्या शासनाच्या आदेशाच्या विरुध्द आहेत असे शासनाच्या नियमाला उल्लंघन आपण या ठिकाणी करत आहेत. आणि शासनाचा उल्लंघन केल्यानंतर सन्माननीय जे सदस्य याला समर्थन करतील अपात्रतेची कारवाई आहेच आपल्या त्या अधिनियमाच्या अनुषंगाने की शासनाच्या निर्णयाच्या विरुध्द महापालिकेच्या हिताच्या विरुध्द, आर्थिक नुकसानीच्या विरोध सन्माननीय सदस्यांनी सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी बहुमताच्या जोरावर महापालिकेचा आर्थिक नुकसान केलेले आहे. ते अपात्र होणारच पुढे मागे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ अवधी आहेत. शासनाची भुमिका क्लियर कट आहे की आणि शासनाने मान्य केलेले आहे की महापालिकेचा आर्थिक नुकसान झालेले आहे. अशा परिस्थिती पुन्हा शासनाने आपल्याला सांगितले की, पुन्हा आपण विचार करा काय विचार करा की, पुन्हा तुमच्यावर निलंबनाची कारवाई होऊ नये कोणावर जे ठराव करतील त्याच्यावर मग सारासार बुध्दीने पुन्हा विचार करा. आणि ही पहिलीच स्टेज आहे. अधिनियमा मधली ही एक पहिलीच स्टेज आहे की आम्ही निलंबीत केले आहे. पुढचा निर्णय काय घ्यायचा शासन घेणार आहे शेवटी शासनाचा याठिकाणी प्रमुख शासनाचा प्रमुख म्हणुन आयुक्तांची नेमणुक केली असते. आयुक्तांची नेमणुक यासाठी केली असते की, आयुक्तांनी बघायला पाहिजे.

मा. महापौर :-

साहेब आपल्याला या विषयावर काय बोलायचं आहे ते बोला ना तुम्हाला हा ठराव मांडायचा आहे का?

आसिफ शेख :-

महापौर मॅडम आपण मला संधी दिली पुर्ण बोलु द्या ना याविषयावर बोलतो मी.

मा. महापौर :-

बर्नट साहेब माझा अधिकार आहे तुम्ही मला सांगु नका मला काय करायचं आहे माझा अधिकार आहे मला कुठे थांबवायच आहे ते तुम्ही मध्ये बोलु नका. तुम्हाला विषयावर बोलायचं असेल तर बोला.

आसिफ शेख :-

हमेशा सत्य की जय होती है, सत्य परेशान होता है। पराजीत नही हो सकता बहुमताच्या जोरावर वाटेल ते आपण जरी केले. आपण जरी बहुमताने ठराव महापालिकेच्या हिताच्या विरुध्द केला तरी शासनाचा प्रमुख म्हणुन याठिकाणी सन्माननीय आयुक्तांना शासनाने पाठविलेला आहे. आणि ते म्हणतात त्यांची भुमिका क्लियर कट आहे. आयुक्तांची की तुम्ही गोषवारा मी दिल्यानंतर तो प्रस्ताव होणार नाही दिला तर तो प्रस्ताव होणार नाही. आणि आयुक्तांच्या त्या परिपत्रकावरती तुम्ही समजा मानत नसाल जुमानत नसाल आमचं जुमानत नाही. कोणाचं जुमानत नसेल तरी शासनाने त्याच्यावर निर्णय घ्यायचा आहे तो शासनाने निश्चित पणे घेणार आहे. शासन कोणत्या पक्षाचे नसते शासन चालते ते अधिनियमाप्रमाणे चालत असते तुम्ही बहुमताने वाटेल ते केले तुमच्या मर्जी प्रमाणे तुम्ही करा. आणि अपात्रची काय कारवाई शासन करायची तुमच्यावरती निश्चितपणे अधिनियमाच्या आधिन राहुन ते करणारच आहे. मला एवढेच येथे येऊन सांगायचं आहे की, शासनाकडे जो प्रस्ताव आपण पाठवला होता बहुमताच्या जोरावर तो शासनाने मान्य केलेला आहे की निलंबीत केलेला आहे आणि यासंदर्भात पुन्हा आपल्याला पुनःश्च विचार करा म्हणुन सांगितले आहे. तरी आपण पहिल्या आपल्या भुमिकेशी ठाम असाल तरी तो आपण जो निर्णय बहुमताच्या जोरावर घ्यायचा आहे तो घ्या. आमचा या संपुर्ण गोष्टीला विरोध राहिल शासनाने घेतलेला निर्णय निलंबीत केलेला अत्यंत योग्य आहे. आणि त्याप्रमाणे आयुक्त महोदयांनी पुढील कारवाई केली पाहिजे. अशी याठिकाणी आपल्याला विनंती करतो.

नरेंद्र मेहता :-

धन्यवाद मला थोडा आसिफ शेख साहेबांकडुन थोडी माहिती घ्यायची होती मी तर अनुमोदन दिले नक्की म्हणजे आमदार मधुन निलंबीत होणार की नगरसेवक पदासाठी थोडी माहिती नाही.

आसिफ शेख :-

तुम्ही आता इथे या संदनामध्ये सन्माननीय सदस्य आहात नगरसेवक म्हणुन.

नरेंद्र मेहता :-

परंतु त्याची ते तथ्य बोलतात याच्यात काही दुमत नाही की, महापालिकाचं आर्थिक नुकसानीच्या बाजुने आपण ठराव केलं ते निलंबीत होतात आता आसिफ शेख साहेबांनी ज्या बोटीत बसले त्याच बोटी त्यांना डुबवायच्या आहेत ते मला माहित नाही. कारण ठराव त्यांनी केला होता. हे ह्यांना देऊन टाका आम्ही ठराव केला नाही आम्ही तर बोलतो हे चुकीचा झाला आहे. म्हणजे निलंबीत होतात कायदात तेच होणार आहे. आम्ही होणार नाही आम्ही खात्रीने सांगतो आणि आसिफ शेखजी आम्ही निलंबीत झालो तर पुन्हा २५ वर्ष इलेक्शन लढणार म्हणजे आपल्याला लिहुन देतो या विषयावर आहेका खात्री करु आपण विषय मॅडम असा आहे. शासनाने आपल्याला विखंडीत केलेले ठराव निलंबीत केलेले आणि त्यांनी आपल्याला विचारले की का आपण ठरावाला विखंडीत करुन त्याबद्दल आणि त्या आपण विषय पटलावर तो विषय आणला आहे. सभागृहाने निलम ताईने त्यामध्ये सभागृहाची भूमिका मांडली आहे. आयुक्त साहेब मला हे विचारायचं आहे आसिफ शेख सरचा आपण समजुन घ्या त्या आरक्षण मध्ये पहिल्यापासुन बोलतो हा एकमेव असा आहे मी सत्ताधारीना विचारतो आता मला सांगितलं विरोधी पक्षांना विचारतो आम्ही असा उद्या विषय आणला की, आमका रिर्झव्हेशन आमका बिल्डर्सला एवढा पैसा देऊन टाका त्यावेळी तुमची भुमिका हीच असणार की, जे तुम्ही पहिलं केलं मला सांगावं आम्ही आज ही तयार आहोत त्याला निविदा नाही. ट्रान्सफरन्सी नाही काही नाही कुठला नाही डायरेक्ट विषय आला की, अमुक रिर्झव्हेशन ह्यांनी मागितला आहे. या रकमेमध्ये देऊन टाका. या प्रकारचा विषय आणलं तर जुबेर इनामदारजी परत कुठलं तरी पुस्तक काढून आम्हाला काहीतरी कायदा झालं आणि आम्ही द्यावे.

भगवती शर्मा :-

नाही-नाही कुठलं तरी नाही कायद्याचे आहे ते.

नरेंद्र मेहता :-

मी बोलतो ना ते आरक्षणच आहे ते मी काय बोलतो ते ॲमेनिटी स्पेस म्हणजे आरक्षण झालं तुम्ही ठराव करुन दिलं होतं की हे आमका रिर्झव्हेशन.............

जुबेर इनामदार :-

आम्ही त्यावेळेला चुकलो होतो शासनाने आम्हाला सुधारलं ते पाठवलं होतं ना विखंडीत करुन.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, म्हणजे ह्या प्रकारची प्रथा त्यांच्यात आसिफ शेखजी मला माहित नाही बाकी सन्माननीय मला नक्की खात्री आहे. पटत असेल की अशा प्रकारचा आज आपण सत्तेत आहोत आम्ही त्याचा गैरवापर करु शकतो की, एक काम करा हा आरक्षण ह्या कंपनीला देऊन टाका ह्या आरक्षण ठराव म्हणजे बहुमताच्या जोरावर होतो ना आणि त्यावेळेला बहुमतांने चालायचा त्यावेळेला विरोधक तर सर्व मताने झालेला नाही हे साहेब बहुमताने तो ठराव झाला. आज ही आम्ही तसे करु शकतो बहुमत इकडे आहे. आम्हाला किती तरी आरक्षण आहेत हे ह्याला दे, ते त्याला दे, सगळे करु शकतो आणि ते चुकीचा पायंडा पडेल आणि त्यासाठी आम्ही भांडतोय. त्या काऊनटाऊन बिल्डर्स साठी आम्ही भांडत नाही दुसरं साहेब

त्यामध्ये आपण ठराव काय केलं आहे ७,००० मीटर मधून ३,८०० मीटर त्याला द्यावं आसिफजी एफ.एस.आय. काय केले त्यामध्ये मधल्या काळात याच सभागृहाने ठराव केले. उरलेली जागेमध्ये तरणतलाव आणि हे बांधावं आर्ट गॅलरी त्यावेळी पालिकेने काय सांगितलं की, आपली जी जागा उरलेली आहे. त्याच्या एफ.एस.आय. त्यांनी वापरलं म्हणजे आम्हाला खाली मैदान देऊन टाकलं जागा दिली ३००० हजार आणि एफ.एस.आय. दिला ७ हजाराचा मग आमची जागा महापालिका त्याच्यावर काय करायचं मैदान त्या जागेवर आपल्याला काही करता येत नाही. दुसरं आपण माहिती ह्या टाऊन प्लानिंगकडून त्यांनी आपल्या जागा पेक्षा जास्त जागेवर कुंपन भिंत बांधली आहे. घेतली ३,८०० कुंपन भिंत मारुन तिकडे प्लिंथ बांधुन ४५०० जागेवर मोकळा झाला आणि प्लिंथ पण विदाऊट पर्मिशन अॅज पर प्लॅन ती बांधलेली नाही. अॅज पर प्लॅन बांधलेली नाही हे ह्या सगळ्या बाबी काय बघायचं नाही हे आयुक्त साहेब मला सांगा आपण जे विखंडीतला ठराव पाठवला तो तुमचा अधिकार आहे. तुम्हाला पटल नाही तुम्ही पाठवलं पण ते ३००० उरलेली जागा आमच्या ताब्यात आहे का? त्याचे एफ.एस.आय. आपल्याकडे शिल्लक आहेत का? ते तुम्ही शासनाला नमुद केलं का नाही केलं आमच्य जागेवर आम्हाला तरण तलाव आर्ट गॅलरी बांधायची आहे. त्याला परवानगी का नाही मिळणार ती जागा उरलेली आमची आहे ना. त्यांची समजा आपण दिली तरी पण आपली जागेचे आपण काय करायचं आर.जी. म्हणुन गार्डन बांधायचं त्याचा एफ.एस.आय. तुम्ही कसा दिला आम्ही तर ३८०० समजा सभागृहाने तो निर्णय दिला शासनाने तो निर्णय दिला कोर्टाने तो निर्णय दिला तर तो मालक तो ३८०० च आहे तुम्ही एफ.एस.आय. ७,९०० चा दिला आहे त्याला जबाबदार कोण. याचा पहिले खुलासा करा. आपण एफ.एस.आय. दिले की नाही दिलं.

आसिफ शेख :-

आहे शासन तो निर्णय घेईल ना. आणि तुम्ही तुमचा असा फिरवाफिरवी केली. आणि आयुक्तांवर दबाव आणला तर आयुक्त आपले मत फिरवणार नाही.

नरेंद्र मेहता :-

मी विचारतो काय ३८०० दिली आहे त्याला सात हजारचा एफ.एस.आय. धरा. आपली बाकीची उरलेली जागा.

आसिफ शेख :-

दबाव तंत्राचा आपण वापर केला तरी आयुक्त घाबरणार नाही.

नरेंद्र मेहता :-

शासनाचा जो निर्णय असेल तो अंतिम असेल. आम्ही गृहित धरतो कदाचित शासन जो पहिला ठराव झाला त्या बाजूने राहतील तर आपली जी उरलेली जागा आहे. त्याचा एफ.एस.आय. त्यांना द्यायचा हा कुठे निर्णय झाला हा कधी तुम्ही ठराव केला आणि आजही आसिफ शेख करत नाही ठराव. ते एफ.एस.आय. त्याला द्यायचे कारण काय तुम्ही जेवढे दिले त्याच्यात तुम्ही करा ना. उरल्याच कारण काय. आणि तुमच्या ताब्यात आहे का उरलेली जागा तरी कुंपण भिंत बांधून जास्त जागा घेतलेली आहे. मला सांगा आपण.

आसिफ शेख :-

कस आहे महापौर मॅडम...............

नरेंद्र मेहता :-

जुबेरजी हमारा यह खाली आप विषय को ठिक है की रिझर्व्हेशन उनको मिले नही मिले लेकीन अपना जो चार हजार मीटर बचा है। वो खाली जगा छोड दिया उसका एफ.एस.आय. है दिया चार्जेस वहाँ पर एफ.एस.आय. आठ हजार का और अपनी जो परमिशन के लिए गए तो बोलता है टाऊन प्लानिंग बोलता इसमें एफ.एस.आय. शिल्लक नही है। बॅलेन्स नही है तो आठ हजार मीटर का पैसा लो भाडा भी आप ले रहे चार हजार मीटर का यह अपनी जगह पे थोडा है ठीक है तीन हजार चारसो मीटर की।

जुबेर इनामदार :-

नही तुम्ही आमच्या निर्देशनात आणून दिलेले आहे. पालिकेचे नुकसान होत आहे कुठेतरी म्हणून तुमच्या विरोधात कुठलाही ठराव मांडत नाही. हा शासनाकडे जाऊ द्या.

आसिफ शेख :-

त्यांनी केलेला ठरावच शासनाने विषय परत रद्द केला.

जुबेर इनामदार :-

तुमची सत्ता आहे.

नरेंद्र मेहता :-

आमचा एफ.एस.आय. द्यायचा कारण काय शासनाचा निर्णय झाला फक्त ३८९० पूर्वचा द्यायचं की नाही द्यायचं मी विचारतो.............

आसिफ शेख :-

एकतर दिशाभूल करण्यामध्ये माहिर आहेत.

नरेंद्र मेहता :-

सांगा मला साहेब.

दिलीप घेवारे :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, त्याच्यामध्ये ७९०० स्क्वेअर मीटर एरिया आपल्या पालिकेची आणि तीन हजार नऊशे स्क्वेअर मीटरने आपण त्यांना फ्लॅट दिला अर्धा बांधायचं आणि अर्धा रिकामा सोडायचा आहे. ॲम्युनिटी स्पेस नियमाप्रमाणे त्यांना आपण ३९०० मीटर दिला आहे. तेवढी एफ.एस.आय ची परवानगी दिली आहे.

नरेंद्र मेहता :-

घेवारे साहेब, कमीत कमी मला तरी गोल गोल आपण करु नये. आपल्याला विनंती आहे माझा सिंपल प्रश्न आहे. आम्ही तुमच्याकडे पांगल साहेब आपलेए.टी.पी. त्यांना आम्ही सांगितलं महापालिकेच आर्ट गॅलरी सभागृहाचा निर्णय प्लान ते बोलतात एफ.एस.आय. शिल्लक नाही. आमचं जागा ४००० मीटर एफ.एस.आय. कुठे गेले ते सांगा ना आम्हाला. त्यांच काय केल ते जाऊ द्या. आपली जी उरलेली ............

दिलीप घेवारे :-

त्याच्यामध्ये असे होत ॲम्युनिटी स्पेस मध्ये अर्धी बांधायची अर्धी रिकामी ठेवायची.

नरेंद्र मेहता :-

आम्हाला जास्त समजत नाही.

दिलीप घेवारे :-

ज्यावेळेस आपण ठराव केला २०१० साली नकाशे मंजूर केले. बांधण्याचा जो भाग आहे. ४००० हजार मीटर आपण त्यांना देऊन टाकला आणि रिकामा ठेवण्याचा भाग आपल्याकडे ठेवला.

नरेंद्र मेहता :-

साहेब असे आहे ॲम्युनिटी स्पेसमध्ये त्या कायद्याप्रमाणे ५० टक्के तुम्ही कन्स्ट्रक्शन करु शकतात. ५० टक्के ओपन, ४००० मीटर त्यांना दिली तरी चार हजार मीटरचा ५० टक्के ओपन ५० टक्के कन्स्ट्रक्शन त्यांनी करायला पाहिजे. आपली ४००० मीटर जागा आहे. आपण ५० टक्के कन्स्ट्रक्शन ५० टक्के ओपन या आपल्या ५० टक्के कन्स्ट्रक्शन पण त्याचा प्लानवर लोड करुन देऊन टाकले. प्लान काढा, मी प्लान बघितला आहे. मला एक सांगा टोटल ८००० मीटरचा एफ.एस.आय. परमिशन किती होईल.

दिलीप घेवारे :-

४०००.

नरेंद्र मेहता :-

४००० मीटर जोडायला दिला त्याचा एफ.एस.आय. परमिशन किती.

दिलीप घेवारे :-

तुम्हाला चार हजार पूर्ण द्यायचा तुम्ही पूर्ण देऊन टाका त्याला.

नरेंद्र मेहता :-

कोणाला देऊन टाकलं.

दिलीप घेवारे :-

त्या लोढ्याला आम्ही ३८९० दिले. बरोबर आहे ना. बघा साहेब ॲम्युनिटी बांधायची आहे. आता लोढा साहेबांना आपण बाजुला ठेवू. पहिल्यांदा विषय आहे.

नरेंद्र मेहता :-

लोढा साहेब कसे काय आले याच्यात.

दिलीप घेवारे :-

काऊन टाऊन डेव्हलपरसाठी तुम्ही म्हटले लोढा साहेब म्हणून मी म्हणालो.

नरेंद्र मेहता :-

लोढा पार्क बोललो, लोढा साहेब नाही बोललो. म्हणून मी म्हणालो.

आसिफ शेख :-

कसं आहे सगळे बिल्डर्सचे नाव त्यांना माहिती आहे.

दिलीप घेवारे :-

त्याच्यामध्ये ८००० मीटर आपल्याला प्लॉट आला ॲम्युनिटीमध्ये. ४००० मीटर शाळा बांधणार होतो. आपण म्हणजे समजा महापालिका आणि आर.जी. रिकामी ठेवणार होतो. शाळेचा भाग आपण त्यांना देऊन टाकला भाड्यावर की तुम्ही बांधा शाळा आणि चालवा. त्याचा एफ.एस.आय. कोणी वापरला असे कुठे आहे.

नरेंद्र मेहता :-

आता तुमचे असे म्हणणे आहे शाळा तो ठेवेल आणि उरलेली ओपन स्पेस आपण ठेवणार आहेत त्या ओपन स्पेसमध्ये आपण काय करायचे.

दिलीप घेवारे :-

आपल्याला ॲम्युनिटी ओपन पाहिजे ना.

नरेंद्र मेहता :-

हे पहिले सांगा. शाळेला ओपन स्पेस कुठे आहे. मग ते आपण आपली जागा त्यांनी प्लानमध्ये दर्शविल्याशिवाय ओपन स्पेस तुम्ही ते स्कुलला देणार नाही. मग मुलांनी खेळायला कुठे जायचं. ओपन स्पेस आपली दाखवायची बिल्डींग तिकडे द्यायची खरं म्हणजे ४००० मीटर तुम्हालाही समजतं मी काय बोलतो ३८९० मीटर तुम्ही त्याला जागा दिलेली आहे. हा ठराव आहे. आणि २३ लाख, २४ लाख भाडे त्या ३८९० जो काही एफ.एस.आय असेल तो त्याला द्यावं आमचे काही म्हणणे नाही. उरलेली जागा जी बाकी आपल्याकडे जी ठेवलेली त्याचा एफ.एस.आय. आम्हाला मिळाला पाहिजे. आपण ज्या रितीने आर.जी. परवानगी देतो ते बोलतात एफ.एस.आय. शिल्लक नाही. हे तथ्य आहे ना. एफ.एस.आय. ८००० आणि भाडे ३८९० असं नाही. प्लान आहे आम्ही सेक्शन प्लान बघितला महापालिकेत आणि त्यासाठी आम्ही भांडतोय. तरीही तुम्हाला करायचे असेल तर मी एखादा बोलतो भाडा ५० टक्के जमा करा. मग १०० टक्के चा भाडा घ्या. तो ५० टक्के तुम्ही दिले त्याचं काय होईल तो शासन निर्णय घेईल पण उरलेल्या ५० टक्के महापालिकेने ठराव केला आर्थिक, प्रशासकीय मान्यता दिली. तरणतलाव बांधला, आर्ट गॅलरी बांधली, सगळ झाल नकाशा मंजुर आपलीच महापालिका आपल्याला सांगते प्लानमध्ये एफ.एस.आय. शिल्लक नाही. दुसयाचे समजू शकतो. एखाद्या बिल्डर्सने फसवल असेल. महापालिकेचे महापालिकेला फसवते.

आसिफ शेख :-

तुमच कस आहे, तुम्हाला उत्तर तुमच्याप्रमाणे पाहिजे. नरेंद्र मेहता बोले महानगरपालिका डोले. पैसा आपको चाहिए ऐसा नही हो सकता। ऐसा बिलकुल होगा नही।

नरेंद्र मेहता :-

मला सन्मा. सदस्य ऐकतात मी त्यामध्ये कुठलही याच्यात व्यक्तीगत हिताचा बोललेले नाही. आणि आम्ही कस अंगावर घेतोय. आपल्यालाही माहित आहे. तरी आम्ही ती भूमिका घेतलेली आहे. आणि आम्हाला ते चार वेळा परत मी बोलतो. चार हजार मीटरच जो होईल तो चार हजार मीटर आपले आहे. त्याच तरी प्लान पास करुन द्या. महापालिकेला आपण अधिक ते तुम्ही का करत नाही. तुम्ही बोलतात ते एफ.एस.आय. तरणतलाव लोढा कॉम्पलेक्स टॅरेसवर बांधायच किंवा तुम्ही सांगा ही चार हजार मीटर काय करता येईल. चार कशाला ठेवायची ठरावामध्ये हे अमाऊंटमध्ये करायचं. आठ हजारच देऊन टाका ना मग चारच करणार काय.

भगवती शर्मा :-

विषय काय? आप हमेशा विषय स्ट्रीस्ट करते हो. यहाँ करके कहाँ पटक देते हो। प्रशासन बोलते उसका भी जवाब मान रहे हो। अभी हमको तो महापौर मॅडम इतने जवाब के बाद दुसरा विषय लेने का अभी कोई बोल नही रहे।

आसिफ शेख :-

दबाव दबाव कितना दबाव डालेंगे। कानून के यहाँ कोई चाहे दबाव चलता नही नो बडी दबाव लॉ लॉ-इज सुप्रिम. आयुक्त महोदय तुम्ही अजिबात कोणाच्या प्रेशराईजमध्ये येऊ नका. पण ते तुमच लोकच करत आहेत. आमचे काहीच करित नाही. बोला ना हिंमत आहे का तुमच्यात चला आताच ठेवा निलंबीताचा ठराव. अनुमोदन मी देतो.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, आम्हाला निलंबीत मी परत सभागृहाला आसिफ शेखजीचे विषय क्लिअर करतो. आम्हाला ज्या शासनाने निलंबित केलेले आहे. त्याआधी आमचं निलम ताईने ठरावाच्या निवेदनाच्या माध्यमातून आपल्याला दिलेले आहे. ते आपण शासनाला आमची माहिती पोहोचवावी हा झाला एक भाग परंतु हाच विषय कन्टीन्यु अर्धी जी आपली आहे एफ.एस.आय. आम्हाला परवानगी का देत नाही महापालिकेला आपण आपली त्या ४००० सोडा संपला तो विषय जो होईल तो होईल आता उरलेली ४००० तुम्ही म्हणतात एफ.एस.आय. गेला कुठे.

दिलीप घेवारे :-

त्याच्यामध्ये ४००० मीटर एफ.एस.आय. त्याला आठ द्यायचं नाही.

नरेंद्र मेहता :-

त्यांना ४००० दिले ना. मग एफ.एस.आय. किती द्यायचे होते २००० की नाही.

दिलीप घेवारे :-

नाही साहेब असे आहे ही घटना २०१० ची आहे. माझ ऐका ना साहेब याच्यामध्ये दहा वेळेस शासनाकडे अहवाल गेलेला आहे. शासनाने याची पूर्णपणे तपासणी केलेली आहे. लक्षवेधी झालेली आहे. आता सध्या उच्च न्यायालयात प्रकरण चालू आहे. त्याच्यामुळे हा विषय काल झालेला नाही ते बोलतोय.

नरेंद्र मेहता :-

आता मी परत सांगतो. त्या ४००० मीटर बाबतची आम्ही भूमिका मांडली तो विषय संपला. उरलेली जी ४००० मीटर जागा महापालिकेची आहे ना मग त्यामध्ये आमचं प्लान पास का नाही करत ते तरण तलाव आणि आर्ट गॅलरीचं आपण मला ते सांगा बाकी जाऊ द्या.

आसिफ शेख :-

ते केबीनमध्ये येऊन चर्चा करा, ही महासभेची वेळ आहे.

नरेंद्र मेहता :-

आमच्या जागेत का परवानगी दिली आपल्या स्वतःला आपण विखंडीत पाठवला असेल की असेच पाठवले ती जागा आपण कोणाला दिली तो भाडे देणार आपल्याला. आपण सभागृह बांधायचं ४००० मीटरमध्ये...........

सुरेश खंडेलवाल :-

विषय बहुत बराबर है, लेकिन क्या है की ठराव जो हुआ ५० टक्के का वो जैसे भी आपने कहाँ ना की महापौर को राईट है या नही है गीलास मैं आधा पानी भरा है की नही भरा है। जो ठराव हुआ उसको प्रशासनने समझा ५० टक्के देना है और ४००० फुट देना था उसका पुरा दे दिया। जब की ॲम्युनिटी के अंदर ५० टक्का प्लॉट देके उसको दो हजार फुट देना चाहिए था। ऐसा आपका कहना है और उसका पुरा दे दिया। ठराव ऐसा हुआ था की ५० टक्का देना है और ५० टक्का देके पुरा.............

दिलीप घेवारे :-

ठराव जो हुआ था ॲग्रीमेंट जो हुआ है ना ॲग्रीमेंट झाला की त्याला शाळेची जागा पूर्ण द्यायची आहे. आणि रिकामी जागा आपल्याकडे ठेवायची आहे अस ॲग्रीमेंट आहे.

नरेंद्र मेहता :-

आम्ही एफ.एस.आय. दिलेला नाही त्याला आम्ही जागा दिलेली आहे. ४००० मीटर एफ.एस.आय. दिलेले नाही आणि त्या जागांमध्ये १० लाख फुट असेल तर १० लाख फुट बांधाव आमचा काही संबंध नाही आहे. शाळेसाठी दिलेली आहे फक्त ४००० मीटर दिलेली आहे. एफ.एस.आय. दिला आहे का? काय कारवाई करणार. संबंधीतावर ज्यांनी हे महापालिकेचा आर्थिक नुकसान केला आहे. काय त्याला उद्या कोर्टात काय घडेल त्याला जबाबदार कोण?

आसिफ शेख :-

कर्ताकरविता तुम्हीच आहात. ऐका जरा आमचं.

सुहास रकवी :-

घेवारे साहेब त्याच म्हणणे असे आहे मग द्याची तर पूर्णच जागा द्यायची होती ना. ३८९० मीटर दिल तुम्ही ४००० मीटर इथे दिले आणि ४००० पेंडींग ठेवली ती बीनकामाची ठेवली आपल्याला त्याच काहीच होत नाही ना.

मा. आयुक्त :-

हा ठराव २०१० मध्ये झाला आणि संबंधीत अधिकारी रिटायर्ड झाले.

सुहास रकवी :-

साहेब पण झाल्यात त्यावेळेला मान्यता कोणी दिली तात्कालीन तरी मग रद्द करा त्याची.

नरेंद्र मेहता :-

तुमची भुमिका मांडायला नको का. असं त्यावेळेला चूक झालेली आहे दुरुस्ती करायला पाहिजे. तुम्हाला कार्यालयात भूमिका मांडायला नको.

आसिफ शेख :-

अहो प्रशासनाने काय भूमिका मांडायची. तुम्ही............

नरेंद्र मेहता :-

आसिफजी भगवतीजी मी विषयावरच विचारतो आमचं काही फरक पडत नाही तुम्ही काहीही बोला.

आसिफ शेख :-

आम्हाला काय विचारता, आयुक्तांच्या दालनात जाऊन विचारा ना. घेवारे साहेबांच्या केबीनला जाऊन विचारा. हे सभागृहाचा टाईम कशाला वेस्ट करत आहेत तुम्ही. शासनाने जो ठराव रद्द केला आहे. तुमचा ठराव रद्द केला. एकतर चूकीची माहिती देत आहेत. सन्मा. सदस्य चुकीची माहिती देत आहेत. शासनाने स्पष्ट म्हटले आहे शासन निर्णयामध्ये की उपरोक्त पार्श्वभूमी आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांच्या संदर्भाप्रमाणे करतील. येथील पत्राद्वारे प्रस्तावित केला नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५१ मधील तरतुदीनुसार शासनास असलेल्या अधिकायाचा वापर करुन मिरा भाईंदर महापालिकेचं महासभेने दि. १३ जूलै २०१५ रोजी पारित केलेला ठराव क्र. ३२ प्रथमतः निलंबीत करण्यात येत आहे. मग हा ठराव तुम्ही केलेला आहे. तुमचा ठराव शासनाने निलंबित केलेला आहे. महापालिकेचा आर्थिक हिताच्या विरोध असल्यामुळे आता ठिक आहे. बहुमताच्या जोरावर तुम्ही पुन्हा ठराव करत आहेत. बरोबर मग तुम्ही करा. आणि आयुक्तांना काय निर्णय घ्यायचा आहे तो तुम्ही दबाव टाकून आणि आणखीन एक तास भाषण करुन किंवा इकडचं तिकडे करुन काय होणार नाही ना. शेवटी शासनाच्या प्रतिनिधी आहेत ते या ठिकाणी शासनाने निर्णय घेतलेला आहे. शासन कोणतेही निर्णय घेण्यापूर्वी सर्व प्रकरणांची तपासणी करते तिथे एक्सपर्ट बसले आहेत. त्याठिकाणी आयुक्त महोदय यापूर्वी असे किती बरेच सर्व ठराव आले आहेत ना आणि पर्टीक्युलर एखाद्या ठरावाचं मागे लागणे योग्य नाही ना. त्याच्यातइनट्रेस आहे का.

मा. आयुक्त :-

साहेब ८००० स्क्वेअर फुटाची जागा आहे टोटल. त्यापैकी ४००० त्यांना आपण शाळेसाठी करुन दिली चार हजार रिकामी ठेवायची.

नरेंद्र मेहता :-

४००० कोणासाठी रिकामी.

मा. आयुक्त :-

तर आपले मत असे आहे की जी ४००० आपली आहे त्याच्यात त्याला दिली तरी २००० बांधकाम करायचं आणि २००० रिकामी ठेवायची. आपली जी ४००० आहे त्याच्यात आपण २००० आपण बांधकाम करायच. दोन हजार रिकामी ठेवायची. पण ती शाळेसाठी जागा दिली तर त्यामुळे त्या चार हजारचा चार हजारला अलाऊड एफ.एस.आय. आहे. तो टोटल त्याला दिला आहे. आता आपले म्हणणे आहे की आपल्याला आता ही रिकामी जागा ती कोणासाठी ठेवायच आपली रिकामी राहील ना आपण तिथे गार्डन करु.

नरेंद्र मेहता :-

मी परत उत्तर देतो. या सभागृहाने ठराव केला होता. विरोधी पक्ष सत्तेत होते त्यांनीच सांगावे. त्यांनी स्पष्ट, चार हजार मीटर जागा आम्ही त्याला देतो. त्यामुळे त्यांनी एक लाख फुट बांधावं. दोन लाख फुट त्यांचा विषय होता. चार हजार मीटर वरती स्कूल बांधावे यासाठी जेवढा एफ.एस.आय. प्रॅमिस्टेबल असेल उरलेली चार हजार जे ते आपल्याकडे असायला पाहिजे त्यामध्ये जे आपल्याला परवानगी असेल ते आपण बांधणार त्याच्या चार हजारमध्ये तो बांधणार. तुम्ही तर काय केल हे एफ.एस.आय. त्याला दिले. त्या जागेचे आम्ही काय करणार.

सुहास रकवी :-

आणि दुसरी गोष्ट साहेब त्याच्यामध्ये भाडे किती लावतात तुम्ही. भाडे तुम्ही त्याला दोन हजार लावतात भाडे पण कमी लावतात. त्यांचे तेवढे लावतात म्हणजे आर्थिक नुकसान दोन्हीकडून आहे ना.

नरेंद्र मेहता :-

भाड्याचे रेट कॅलक्युलेट केले तर चार हजार मीटरचं केल.

मा. उपमहापौर :-

आयुक्त साहेब याच्यामध्ये तुम्ही सांगतात ना दोन हजारमध्ये शाळा बांधली. प्रत्यक्ष जागेवर बघा ते दोन हजारमध्ये नाही. अतिक्रमण केले आहे आपल्या याच्यामध्ये पण जात आहे. अतिक्रमण केले आहे तिथे जाऊन बघा. आपल्या जागेत शाळा बांधली आहे.

नरेंद्र मेहता :-

आपल्याकडे चार हजार पण उपलब्ध नाही आपली ओपन जागा घेतली. त्याचा प्लींथ त्याच्यावरती.

मा. उपमहापौर :-

आपल्या याच्यात येते प्लींथ त्याची.

आसिफ शेख :-

आधी अधुरी बात नही करने का।

नरेंद्र मेहता :-

दिलेली परवानगी, परत सांगतो साहेब चार हजार मीटरचं शासन जो निर्णय घेईल तो सर्वांना मान्य करावा लागेल हा झाला एक भाग. परंतु समजा योगायोगाने त्याचा बाजूने निर्णय आला तर ही ओनली एलीजेबल फॉर द फोर थाऊजन्ड मीटरला जी काही परवानगी असेल तर ती चाळीस हजार असू द्या की एक लाख असू द्या. स्कूलला दोन लाख डबल एफ.एस.आय डबल घ्या. आमच काही नाही. पण त्या चार हजार मीटर मध्ये आणि उरलेली चार हजार मीटरजी आहे ते आपल्याला जे काही वास्तू बांधायचं असेल त्या पध्दतीने करा. पण ती शाळा आपण दुरुस्ती करणार का.

मा. आयुक्त :-

शासन निर्णय आल्यानंतर करावच लागेल ना.

नरेंद्र मेहता :-

शासनाचा काय संबंध याच्यात शासनाला तुम्ही सांगितल का आम्ही चार हजार मीटर जागा दिली. आणि आठ हजार मीटरचा एफ.एस.आय. दिला आहे. हे शासनाला तुम्ही सांगितलेले नाही.

आसिफ शेख :-

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांना हे व्यासपीठ आहे. विधानसभेचा व्यासपीठ आहे. तिकडे बोला ना. काइकडे टाईम पास करता आहेत. कळतच नाही आम्हाला.

मा. आयुक्त :-

करारनामा काय झालेला आहे तो बघून रिपोर्ट करु.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही पक्षाला उत्तर दिलं जाव की एफ.एस.आय. त्यांना द्याव ते बोलतात की जागा आमची आहे आणि हे इन्क्लुडींगली तुम्हाला कोणाला माहित नाही होतं ज्यावेळी महापालिका स्वतःचा प्लॅन पास करायला गेली. व्यापारी इथला आम्हाला कुठे ४ हजार एफ.एस.आय तुमचा आहे आणि तुम्ही कधी शासनाला पाठवलं नाही की, आम्ही ४००० दिलं आणि ८००० दिलं ते पाठवलं कधी आणि तरी करत नसेल तर आम्हाला आठ मीटरचे भाडे तरी पूर्ण घ्या ना.

मा. आयुक्त :-

करारनामा काय झालेला आहे ती फाईल तपासून बघून सांगतो.

सुहास रकवी :-

नाही तीथपर्यंत साहेब बांधकाम स्थगिती द्या ना.

मा. उपमहापौर :-

साहेब कोर्टात प्रकरण असेल मग आपण काय निर्णय घेऊ शकतो मग.

सुहास रकवी :-

मग विषय कसा आला.

मा. उपमहापौर :-

प्रशांत पालांडे आमच्या कोर्टात गेलेले आहे. त्याच्याविषयी मग आजच्या तारखेला काय निर्णय घेऊ शकतो त्याच्यावरती.

नरेंद्र मेहता :-

प्रविणजी कोर्टात किंवा शासनाकडे जो मॅटर आहे तो फक्त चार हजार मीटर पुरता आहे. मी जे विचारतो आपली उरलेली चार हजार मीटर जागा जरा समजून घ्या. चार हजारच काय कोर्ट निर्णय घेतील ते शासन निर्णय ते आम्हाला मान्य आहे ना.

दिलीप घेवारे :-

साहेब त्याच्यामध्ये करारनामा तपासावा लागेल. आणि त्याला चार हजार मीटर जागा दिली का एफ.एस.आय. दिला हे तपासून सांगतो.

सुहास रकवी :-

साहेब ते म्हणतात ते बरोबर आहे. तीथपर्यंत तुम्ही त्या कामाला स्थगिती देऊन टाका.

प्रभात पाटील :-

त्याला एफ.एस.आय. देताना करारनामा आता तपासणार आहेत का.

दिलीप घेवारे :-

काम स्थगितच आहे.

प्रभात पाटील :-

त्यांच काय ते देऊन टाकलं. आता करारनामा तपासणार का.

नरेंद्र मेहता :-

करारनामा केला असेल तर ती तुमची चूक आहे. आमची नाही. सभागृहाची चूक नाही तुम्ही केली. सभागृहाचा ठराव मी सकाळी तपासल चार हजार मीटर जागा द्यावी इन टू ४५ असे काही तरी केल आणि २,७५,००० भाड घ्यावे.

जुबेर इनामदार :-

ठराव आहे २,७५,००० चा चार हजार क्षेत्रफळ दिलेले आहे याच्यामध्ये क्षेत्र दिलेले आहे.

भगवती शर्मा :-

सभागृह के अंदर में कोई भी निर्णय अगर गलत भी लिया जाता है समझ लिजिए की मैंने निर्णय लिया..... की उसके अंदर में चार हजार में कन्स्ट्रक्शन होगा चार हजार रिकामी रहेगी उसमें कोई कन्स्ट्रक्शन नही होगा। अगर ऐसा ठराव उन्हें गलत भी किया है, तो प्रशासन थोडी मानेगा तो प्रशासन नियम के अनुसार चलेगा ना। आपने इस चीज का विधानसभा में लक्षवेधी तक गया था। उसके बावजूद भी उसका निर्णय यही रहा था जो हमने निर्णय लिया था। लक्षवेधी भी विधानभवन में आपने लाया था ना क्या निर्णय हुआ उसपे इसी विषय केउपर आप याद करो थोडी याददाश कमजोर होगी। बादाम खाया करो आप। आप उसके साथ मनुका भी खाओ।

मा. आयुक्त :-

जो ठराव केला आहे शाळेसाठी जागा दिली.

नरेंद्र मेहता :-

दोन एफ.एस.आय. असेल तर दोन द्या ना.

मा. आयुक्त :-

मग सर आम्ही म्हटल आपल्याला की तो करारनामा तपासून बघू त्याच्यामध्ये तस असेल तर दुरुस्ती करण्यांत येईल.

दिलीप घेवारे :-

ठराव आहे ना आपल्याकडे.

नरेंद्र मेहता :-

ठराव आमच्याकडे आहे. ठराव केला आहे. करारनाम्यात तुम्ही चूक केली असेल तर ते तुम्ही बघा. आमची जबाबदारी नाही.

मा. आयुक्त :-

ते बघितल्यानंतर बोलू शकतो, पण आता बोलू शकत नाही.

आसिफ शेख :-

त्यांना आताच्या आता पाहिजे.

मा. आयुक्त :-

ही आमची चूक नाही.

आसिफ शेख :-

हम आपके साथ है। निलंबित तुम्हीच होणार तुमचा ठराव शासनाने निलंबीत केलेला आहे.

भगवती शर्मा :-

ठराव तुमचा निलंबीत केला आहे. आमचा ठराव नाही.

प्रमोद सामंत :-

३८९० मीटर जागेसाठी आपण करार केलेला आहे. जे काही त्याची व्हॅल्यु असेल ते नियमानुसार ३८९० मीटरमध्ये जो काही एफ.एस.आय. देऊ शकतात तेवढे द्या. बाकीचा तुम्ही द्यायचा नाही.

जुबेर इनामदार :-

शाळेसाठी दोन हजार द्या. पण त्याला खाण्यासाठी तितकी जागा सोडावी लागेल.

दिलीप घेवारे :-

सामंत साहेब असे नाही हे तुमच्याकडे ज्यावेळी विषय आला त्यावेळी आठ हजार मीटरमध्ये अर्ध्या जागेत शाळा बांधायची आणि अर्धी जागा रिकामी ठेवायची. तुम्ही ठराव करतात की शाळा बांधायची मग देऊन टाकायची.

प्रमोद सामंत :-

नाही आम्ही ठराव केलेला आहे. आमदार साहेब ठराव वाचतो. मिरा भाईंदर महापालिकेचे महासभेने यापूर्वी सदर येथील शाळागृह इमारतीचे भाडे निश्चित करण्याच्या अनुषंगाने नागरी सुविधा केंद्र क्षेत्रापैकी ५० टक्के म्हणजे ३८९०.९१ चौ.मी. एवढ्या क्षेत्रासाठी मे. काऊनटाऊन लॅन्ड डेव्हलपर्स प्रा. लिमिटेड यांना शाळा गृहाकरिता दरमहा दोन लाख पंच्याहत्तर इतके भाडे आकारण्यात यावे. यापुढील प्रत्येक पाच वर्षांनी, दहा टक्केनी वाढविण्यात यावी.

नरेंद्र मेहता :-

आपण मानायलाच तयार नाही.

प्रमोद सामंत :-

तुम्ही जेवढी जागा दिली आहे ना.

मा. आयुक्त :-

सर शाळेसाठी जागा दिली म्हटल्यानंतर कमाल आहे. तुम्ही म्हणतात जागा दिली, जागा दिली शाळा बांधायला जागा दिली म्हटल्यानंतर काय आम्ही जागा खाली काय तुम्ही ठराव केला त्यावेळेस असं...............

(सभागृहात गोंधळ)

नरेंद्र मेहता :-

आम्हाला असे उत्तर चालणार नाही.

भगवती शर्मा :-

तुम्ही दमदाटी करु नका.

सुहास रकवी :-

भाडे का कमी आकारतात.

सुरेश खंडेलवाल :-

साहेब ठरावाप्रमाणे आपण जे केले ते बरोबर आहे.

नरेंद्र मेहता :-

आम्ही जागेवर गठीत करायची का.

भवगती शर्मा :-

हो तुम्ही गठित केलात.

सुहास रकवी :-

त्या जागेचा आम्हाला काही उपयोगच नाही ना.

सुरेश खंडेलवाल :-

रकवी साहेब ठरावाप्रमाणे जे केले आहे ते बरोबर आहे. शाळेसाठी तुम्ही जागा दिली आहे. आता हा विषय प्रशासनाकडे तिकडून पण निलंबित होऊन आलेला आहे. कोर्टामध्ये पण मॅटर चालू आहे. आपण इकडे काय बहेस करुन त्याचा काही फायदा होणार आहे का ऑलरेडी ते प्रशासनाकडे .............

भगवती शर्मा :-

विषय घ्या ना तुम्ही.

(सभागृहात गोंधळ)

आसिफ शेख :-

ठराव झालेला आहे सन्मा. सदस्यांनी............

दिलीप घेवारे :-

तुम्ही पैसे सुध्दा चार हजार मीटरचे घेतलेले आहेत.

नरेंद्र मेहता :-

मग चार हजार मीटर दिली ना. आमची चार हजार मीटर त्यांचा एफ.एस.आय. आम्हाला द्या.

प्रमोद सामंत :-

आम्ही चार हजार मीटर जागा दिली ना. तेवढ्या वरती जी परमिसिबल तुमची एफ.एस.आय. असेल तेवढे द्या. त्याच्या पेक्षा जास्त द्यायचे नाही.

सुरेश खंडेलवाल :-

पण ठरावामध्ये तसे मेंशन करायच होत आपल्याला तस केल नाही म्हणून या लोकांनी...........

नरेंद्र मेहता :-

गोषवारा दिला त्याठिकाणी आर्ट गॅलरी बांधा आणि तरणतलाव बांधा. तुम्हाला लक्षात कसे काय एफ.एस.आय. घेतला ज्यांनी प्लान उघडलं त्यावेळी तुम्हीच दिला आम्हाला गोषवारा.

भगवती शर्मा :-

विषय घ्या ना तुम्ही रितसर. आपला विषय काय आहे.

सुरेश खंडेलवाल :-

साहेब आता जो विषय आहे तो फक्त अभिवेदन आहे.

भगवती शर्मा :-

आयुक्त साहेब, आता विषय काय आहे अभिवेदन आहे संपला विषय.

आसिफ शेख :-

हा पुढचा विषय घ्या.

मा. आयुक्त :-

करारनामा जो काही असेल साहेब आपल्याला काय ठराव पारित करायचा आहे ते करा. तुम्ही ठराव पारित करा काय करायचं आम्ही काही मना करतो का तुम्हाला आपलं शासनाकडे.

नरेंद्र मेहता :-

मी तुम्हाला विचारतोय की आपण गोषवारा दिलेला आहे की त्याठिकाणी आर्ट गॅलरी बांधा मग आता तुम्ही का बांधत नाही.

मा. आयुक्त :-

साहेब करारनामा काय झाला होता ते चेक करुन आपल्याला सांगतो ना.

भगवती शर्मा :-

साहेब काय घाबरायची आवश्यकता नाही. हम तुम्हारे साथ है।

नगरसचिव :-

सभेचे कामकाज सुरु होत आहे.

मिरादेवी यादव :-

महापौर मॅडम, अभी तक साडे तीन घंटा हो गया है। हमको लिख के मिला नही।

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेबांनी त्या विषय चर्चेला होता. त्याचा आम्हाला खुलासा द्यावा.

मिरादेवी यादव :-

महापौर मॅडम, आपसे विनंती है जबाबदारी आपकी मैं नही बोलूंगी। आप मुझे अभी तो लिखित में दे की कौन से तारीख से शुरु करेंगे और कौनसे तारीख को पुरा करेंगे तभी महासभा चलने दुँगी नही तो चलने नही दूँगी। एक घंटा का हमको आश्वासन दिया है साडे तीन घंटा हो गया जब पिठासीन अधिकारी बैठे है महापौर, कमिशनर जैसे इनका नही सून रहे है। नगरसेवक का नही सून रहे है, तो आम आदमी का क्या यह सूनेंगें।क्या उसमें लिखा है पढके सूनाईए मैं खडी रहूँगी।

मा. आयुक्त :-

पत्र वाचून दाखवा नंतर आऊट वर्ड नंबर टाकायला द्या. मा. महापौर मॅडम आता आपण सभा तहकूब करण्यापूर्वी जे मा. आमदार साहेबांनी १३/७/१५ ठराव क्र. ३२ राज्यशासनाने निलंबीत केलेल्या त्याबाबत ३० दिवसाच्या आत निवेदन सादर करण्या बाबतचा विषय जो पटलावर आहे. त्या संदर्भामध्ये महानगरपालिकेने यापूर्वी जो निर्णय घेतलेला आहे. त्यानंतर महापालिकेने एक निर्णय घेतला होता आणि सुरुवातीला जो निर्णय घेतला त्याच्यामध्ये बांधकाम परवानगी दिलेली आणि त्याच्यामध्ये सगळ नमूद करण्यात आलेले आहे. ह्या सर्व बाबींची आम्ही तपासणी करुन जे ३८९० चौ.मी. क्षेत्रावरील दिलेल्या बांधकाम परवानगीबाबत. त्यांच्यातील चटई क्षेत्राबाबत संबंधीत म्हणजे चटई क्षेत्राची खातर जमा करण्यासाठी म्हणजे संबंधित जो बिल्डर आहे त्यांना आम्ही नोटिस देऊन त्याची खातर जमा करुन किंवा आम्ही दिलेली परवानगी आणि त्यांच्याकडे जो काही करारनामा झालेला आहे. त्यांना आम्ही नोटिस देऊन खातर जमा करु आणि त्याच्यानंतर पुढील उचित कारवाई करण्यांत येईल.

आसिफ शेख :-

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. आयुक्त साहेबांनी या ठिकाणी खातर जमा करण्याचं सभागृहामध्ये सांगितलेल आहे. या संदर्भात मी आपणाला सांगू इच्छितो की मा. महासभा दि. १/०२/२०११ आणि तहकुब

सभा १८/१/२०११ यामध्ये ठराव क्र. ८५ मध्ये म्हटलं आहे की मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ॲम्युनिटी ओपन स्पेसच्या तरतूदी अंतर्गत प्राप्त जागेत जावक क्रमांक मिरा भाईंदर महानगरपालिका नर/१७७६/२०१०-११ दि. ५/०८/२०१० अन्वये २९१२.२३ चौ.मीटर क्षेत्राचे शाळा इमारतीचे तळ अधिक ४ नकाशे मंजूर करुन बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. सदर बांधकाम परवानगीनुसार शाळा विकासक मे. काऊनटाऊन डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी विकसित केल्यानंतर त्यात महापालिकेसाठी १५ टक्के जागा एकूण महापालिका शिफारस करेल अशा विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवणे बंधनकारक राहील. अशी अट असून सदर शाळागृह इमारतीच्या जागेच्या भाडेपट्टीबाबत महानगरपालिका अंतिम निर्णय घेईल तो विकासकास बंधनकारक राहील असे नमूद करण्यात आले आहे. सदर शाळागृह इमारतीचे महापालिकेचे व्हॅल्यूअर मे. आर्कीझम यांच्याकडून भाडे ठरवून घेण्यात आलेले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १४४९ चे कलम ७९ (क) नुसार सदर भाडे रुपये ८४.१२ प्रती चौ.मी. प्रमाणे प्रती महिना एवढे राहील. सदर शाळेचे एकूण जागेचे क्षेत्रफळ ३८९०.५१ मी. एवढे असून त्यानुसार मासिक भाडे दोन लाख पंच्याहत्तर हजार इतके आकारण्यात यावे. त्यानंतर पुढील प्रत्येक पाच वर्षांनी दहा टक्के वाढ करण्यात यावी. असे तीस वर्षापर्यंत करण्यांत यावे. त्यानंतर नविन भाडे वाढीचा प्रस्ताव सादर करण्यांत यावा. ठराव झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत करारनामा आणि ठराव झाल्या दिवसापासून भाडे आकारणी करावी असा मी ठराव मांडत आहे. असा ठराव झाला होता. याप्रमाणे ठराव झाला महासभेने त्याला मान्यता दिली, करारनामा झाला. करारनामा नोंदणीकृत झाला आणि तिथे शाळा बांधण्यासाठी आपण नगररचना विभागाने परवानगी दिलेली आहे. आता प्रश्न असा उपस्थित राहतो की बहुमताच्या जोरावर जो ठराव केला होता तो शासनाने निलंबित केलेला आहे. शासनाने सर्व सारासार विचार करुन महापालिकेचा आर्थिक नुकसान झालेला आहे. असे शासनाच्या निदर्शनास आले त्यानंतर शासनाने महापालिकेने दि. १३ जुलै २०१५ रोजी पारित केलेला ठराव क्र. ३२ हा निलंबित केलेला आहे. आणि त्यानंतर ३० दिवसाच्या आत प्रतिवेदन सादर करण्यास संबंधितांना सांगितलेला आहे. आता काम राहील फक्त प्रतिवेदन सादर करायचं. काय करायचं ते सन्मा. त्याची प्रत दिले आयुक्तांना आणि महापौरांना ह्या दोघांनी प्रतिवेदन सादर करायचे आहे. महासभेमध्ये तशा प्रकारचा ठराव पहिली गोष्ट होऊ शकत नाही. महासभेच्या निदर्शनास आणून दिले आहे आपलं काम आपण केलं आहे, सचिवांमार्फत आणि आता प्रतिवेदन शासनाला सादर करायचे आहे. प्रतिवेदन सादर करताना एकतर आपल्याला काही गोष्टी त्यामध्ये आपल्याला निश्चित करुन नमूद करावे लागेल. एकतर महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे भाडे जे आपल्याला मिळणार आहे म्हणजे २ लाख ७५ हजार प्रति महिना आपण निश्चित केला आहे ते भाडे न मिळाल्यास त्याचा आर्थिक नुकसान होणार आहे. मग त्याला जबाबदार कोण राहणार आहे. आणि त्याप्रमाणे विकासकाला आपण जे सी.सी. दिली आहे शाळा बांधण्यासाठी तर त्यांनी प्लीन्थ बांधून त्याठिकाणी तयार आहे. जर त्यांनी विकासकाने महापालिकेकडे सांगितले की माझा आता ५-१० कोटीचे नुकसान झालेले आहे. मग ते कोण देणार. त्याची जबाबदारी कोणावर आहे. ती पण आपल्याला निश्चित करावी लागणार आणि अशाप्रकारे जनतेचा पैशाचा अपव्यय होणार आहे का या सगळ्या बाबींकडे पण आयुक्त महोदय आपण असा विचार करणे आपल्याला बंधनकारक आहे. शेवटी आपण काम करत असताना आपण या ठिकाणी शासनाचे प्रतिक म्हणून काम करतो.

मा. महापौर :-

मैं आपको बोल रही हूँ की यह निवेदन पहिले कर चूके है।

आसिफ शेख :-

आम्ही आपल्यावर ओरडत नाही. आमचा आवाज तसा आहे. आयुक्त साहेबांचा आवाज जसा मोठा आहे तसा आमचा मोठा आहे. आम्ही जोरात बोलतोय का?

मा. महापौर :-

नाही आतापर्यंत बोलता येत नव्हतं म्हणून आयुक्त साहेबांनी नॅचरली जरी सांगितले तरी त्यांचे मोठे आतापर्यंत मला तुमचा आवाज ऐकावा लागला होता. मी तुम्हाला सांगते आता तुम्ही ऐका जे निवेदन तुम्ही केले ते पहिले केलेलेच आहे. आता तुम्हाला काय ठराव मांडायचा आहे का?

आसिफ शेख :-

ठराव मांडायचा प्रश्न उद्भवत नाही. प्रतिवेदन करायला सांगितले शासनाने तुम्हाला आपण या ठिकाणी.

मा. महापौर :-

तुम्हाला ठराव नाही मांडायचा ना, जे झाले ते मंजूर आहे.

आसिफ शेख :-

आम्हाला मंजूर नाही ना.

मा. महापौर :-

तुम्ही फक्त ठराव मांडा. तुमच निवेदन आम्ही बघूनंतर.

आसिफ शेख :-

तुम्ही कसे बोलणार आहेत आम्ही आयुक्तांना उद्देशून केले आहे सभागृहात.

मा. महापौर :-

परत तेच निवेदन कसं करायचं.

आसिफ शेख :-

आम्ही निवेदन आता प्रथमच केलेला आहे.

मा. महापौर :-

आपल्याला ठराव मांडायचं आहे का? तुम्ही सभेचा वेळ वाया घालवू नका. काय ठराव मांडायचा असेल तर सांगा.

आसिफ शेख :-

आयुक्तांनी या संदर्भात शासनाच्या पत्राच्या अनुषंगाने प्रतिवेदन सादर करण्यात सांगितले आहे. त्याप्रमाणे आयुक्त महोदयांनी कायदयाच्या चौकटीत राहून योग्य ते निणर्य घ्यावं अशी आमची त्याच्याकडे अपेक्षा आहे आणि प्रतिवेदन सादर करावं असा प्रश्न यामध्ये उद्‌भवतच नाही.

मा. महापौर :-

नाही नाही ते योग्यच निर्णय घेणार.

आसिफ शेख :-

आम्ही आता जे मुद्दे नमुद केलेले आहेत, आमचा विरोध नाही, तुमचा ठराव केला त्या ठरावाला आमचा विरोध आहे.

प्रकरण क्र. १६४ :-

मा. महासभा दि. १३/०७/२०१५, ठराव क्र. ३२ राज्य शासनाने निलंबित केल्याबाबत त्यावर ३० दिवसांच्या आत अभिवेदन सादर करणेबाबत.

ठराव क्र. १२८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी सर्व्हे क्र.१०७/१पै, १०८/१,२,३, १०९/२३,२४,२७,२८,११०/५ पै. या जागेच्या मंजुर रेखांकनातील ७७८१.०२ चौ.मी. क्षेत्राच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडापैकी ५०ऽ प्रमाणे जे ३८९०.५१ चौ.मी. क्षेत्राचा भुखंड विकासक मे. काऊटाऊन लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांना ३० वर्षाकरीता भाडेतत्वावर देणेबाबत दि.०१/०२/२०११ रोजी मा. महासभेने ठराव क्र.८५ अन्वये मंजुरी दिलेली असून त्याप्रमाणे विकासकाबरोबर महानगरपालिकेने करारनामा केलेला आहे.

सदरच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडाबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र. ४४४८/२०१३ दाखल असुन सदर याचिकेमध्ये अंतिम निर्णय पारित झालेला नाही. तसेच सदर भुखंडाबाबत कुठलीही निविदा प्रक्रिया न करता मा. महासभेच्या ठरावाच्या आधारे सदर भुखंड विकासकास भाडे तत्वावर दिलेला असल्यामुळे सदर भुखंडाबाबत झालेला करारनामा रद्द करुन ती जागा महापालिकेने ताब्यात घेवून विकसीत करणेबाबत दि.१३/०७/२०१५ रोजी मा. महासभेने ठराव क्र.३२ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर ठराव महानगरपालिकेच्या हिताचा नसल्याचे नमुद करुन विखंडीत करणेबाबत प्रशासनाने शासनाकडे विनंती केलेली आहे. त्याप्रमाणे शासनाने दि.१३/०७/२०१५ रोजीचा ठराव क्र.३२ निलंबित केलेला आहे व याबाबत अभिवेदन सादर करणेबाबत दि.२०/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

सदर बाबतीत शासनास अभिवेदन सादर करण्यात येते की, विकासकास सदरचा भुखंड भाडेतत्वावर देताना -

१) निविदा प्रक्रिया करणेत आलेली नाही.
२) भुखंडासाठी भाडे आकारताना खाजगी व्हॅल्युअर मार्फत भाड्याची निश्चिती केलेली असून शासनाकडून भाडे ठरवून घेतलेले नाही.
३) नागरी सुविधा क्षेत्राच्या ५०ऽ प्रमाणेचा ३८९०.५१ चौ.मी. क्षेत्राचा भुखंड भाडे तत्वावर देताना ७७८१.०२ चौ.मी. अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात आलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या ताब्यातील उर्वरीत ५०ऽ प्रमाणेचा जागेमध्ये चटई क्षेत्र निर्देशांक शिल्लक राहिलेले नाही.
४) मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात शाळेची आरक्षणे प्रस्तावित असून बहुतांश प्रमाणात शाळा विकसीत झालेल्या आहेत. त्यामुळे या जागेमध्ये शाळेऐवजी इतर सार्वजनिक स्वरुपाची जनतेला आवश्यक असणारी सुविधा उपलब्ध करुन देता येवू शकेल.

यास्तव दि.१३/०७/२०१५ रोजीचा ठराव क्र.३२ विखंडीत करण्यात येवू नये म्हणून व या जागेमध्ये पारदर्शकरित्या निविदा प्रक्रियेसह महापालिकेच्या हीताचा निर्णय घेवून भुखंड विकसीत करणेबाबत नव्याने प्रक्रिया करणे महापालिकेला शक्य होईल व त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याप्रमाणे शासनास अभिवेदन सादर करणेसाठी ही महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- सौ. निलम ढवण अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता

ठराव बहुमताने मंजूर
ठराव वाचून कायम केला आहे

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १६५, महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीस मान्यता देणेबाबत.

शरद पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्रेणी-०२, प्रशासकीय सेवा संवर्गात प्रशासन अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, उपकर निर्धारक व संकलक, आस्थापना अधीक्षक, स्टोअर ऑफिसर, उप-नगरसचिव, अधीक्षक (मार्केट-परवाना), प्रभाग क्षेत्रीय अधिकारी, हेडक्लार्क ची १८ पदे मंजूर आहेत. सदर पदांची वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४०० आहे. मंजुर १८ पदांपैकी ०८ पदे रिक्त आहेत.

आस्थापनेवरील सदर रिक्त पदांवर पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि. १६/१२/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती.

शासनाने मंजूर केलेल्या सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मध्ये सदर पदांवरील पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता खालील प्रमाणे नमुद आहे.

<u>कोटा - १०० ऽ पदोन्नती</u>

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.

ब) महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे मुख्य लिपीक किंवा समकक्ष संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून किमान ०५ वर्षांचा अनुभव.

श्रेणी-०२ प्रशासकीय संवर्गातील रिक्त पदांपैकी बिंदु नियमावलीनुसार अ.जा.-१,भ.ज.-१ खुला-६ प्रवर्गातील आहेत.

वरील प्रमाणे अर्हता लक्षात घेता, मुख्यलिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे श्रेणी-०२ संवर्गातील प्रशासकीय सेवा संवर्गातील पदावर पदोन्नती देणेकरीता गठीत पदोन्नती निवड समितीने खालील प्रमाणे कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती करीता निवड केलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत पद | प्रवर्ग | धारण करीत असलेली अर्हता | |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. विजय सदानंद पाटील | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.ए. (पेरिअर युनिव्हर्सिटी)<br>एल.जी.एस.<br>एल.एस.जी.डी. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| २. | श्री. अशोक गायकवाड | मुख्यलिपीक | अनुसूचित जाती | १ | बी.कॉम. (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ)<br>एल.जी.एस.<br>जी.डी. अँण्ड सी.ए.<br>एल.एस.जी.डी. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| ३. | श्री. प्रकाश कुलकर्णी | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.ए. (अर्थशास्त्र) (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ)<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>डी.एल.जी.एफ.एम. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| ४. | श्री. जगदीश भोपतराव | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.कॉम (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ)<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>डी.एल.जी.एफ.एम. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| ५. | श्रीम. अन्नपूर्णा आवडेकर | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.कॉम (मुंबई युनिर्व्हसिटी)<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>डी.एल.जी.एफ.एम. |

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत पद | प्रवर्ग | धारण करीत असलेली अर्हता | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |

श्रेणी-०२ प्रशासकीय संवर्गातील पदे ही सहाय्यक आयुक्त पदाशी समतुल्य आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहीत आहे. त्यामुळे वरील प्रमाणे मुख्यलिपीक पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना श्रेणी-०२ प्रशासकीय सेवा संवर्गातील पदावर पदोन्नतीने नेमणूक करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजुर

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, उसके अंदर मे गोषवारा में जो दिया है। पेरियल युनिव्हर्सिटी को यु.जी.सी. की मान्यता हे क्या। आयुक्त साहब, गोषवारा में जो पेरियल युनिव्हर्सिटी दिया हूँवा है इसको यु.जी.सी. की मान्यता है क्या।

मा. उपायुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानंगीने बोलतो, संबंधीत ही मूळ अपाईंटमेन्ट नाही आहे, पदोन्नतीचा विषय आहे आणि संबंधीत कर्मचायांचे जे डॉक्यूमेंट आहेत ते विद्यापीठा बद्दल जसा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबद्दल ते आपण तपासणीसाठी पाठवू पण मेनली त्यांनी मुख्यलिपीक पदावरती पाच वर्षापेक्षा जास्त केल्याचा अनुभव आहे. आपल्या सर्व्हिसेस प्रमाणं ज्यापूर्वी ते जेंव्हा या पदावरती कार्यरत होते त्यावेळेस ते तपासलेले नव्हते पण आता मुद्दा केला तर तपासून घेवू.

भगवती शर्मा :-

देखीए पदोन्नती दिजीए मेरा कोई उस का ऑब्जेक्शन नही लेकिन आपने गोषवारा में लिखा है पेरियल युनिव्हर्सिटी तो ऐसा केस पहिले भी हूँवा था, इसके लिए में आपको पूछ रहा हूँ की यु.जी.सी. की इसको मान्यता है क्या। नही तो आप सभागृह के अंदर में विषय दे रहे है, ठराव हो रहे है, हम इसको अनुमती हे रहे है।

मा आयुक्त :-

मा.महापौर मॅडम, ह्या पाच कर्मचाऱ्यांना आपल्या महानगरपालिका सेवेमध्ये अनेक वर्षापासून हे लोकं कार्यरत आहेत. आणि मला वाटते मागे म्हणजे आपल्या महासभेने मान्यता दिल्यामुळेच ते आज कार्यरत आहेत. त्यांना आम्ही पदोन्नती देण्याचे काम केलेले आहे आणि पदोन्नती देतांना आपण जे बायलॉज मंजुर केलेले आहेत त्या बायलॉज मध्ये म्हटलेले आहे की, किमान पाच वर्षाचा अनुभव असला पाहिजे म्हणजे ज्याकाही कंडीशन टाकल्या त्या कंडीशनवरती त्यांना पदोन्नती दिली आहे. आता आपल्या प्रश्न आहे की. बी.ए. (पेरियल युनिव्हर्सिटी) आता हा कर्मचारी लागला त्यावेळेस ही डिग्री घेवून लागला का सेवेत लागल्यानंतर त्यांनी डिग्री केली हे तपासून घेण्यात येईल जर समजा याच्यात काही बोगसगिरी असेल तर त्याला प्रमोशन देणार नाही आदेश त्याला दिला जाणार नाही.

भगवती शर्मा :-

आयुक्त साहब, मेरा कहना है की, उन्हको पदोन्नती देने का हमारा भी है ही मन है की, उनको पदोन्नती मिलनी चाहिए। कही विजय पाटील को इसके अंदर में लिखा हुआ है। एकबार पहिले भी पदोन्नती दी गई थी । बाद के अंदर मे उसको वापीस उसको उसमें लाया गया था, कई उनके साथ में अभी रिटायरमेन्ट के और जा रहे है, इनके साथ में वापीस ओ खिलवाड नही हो। की एक बार पदोन्नती दो वापीस उनके साथ.....................

मा आयुक्त :-

कागदपत्र तपासणी करून आदेश देण्यात येईल.

प्रकरण क्र. १६५ :-

महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीस मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. १२९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्रेणी-०२, प्रशासकीय सेवा संवर्गात प्रशासन अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, उपकर निर्धारक व संकलक, आस्थापना अधीक्षक, स्टोअर ऑफिसर, उप-नगरसचिव, अधीक्षक (मार्केट-परवाना), प्रभाग क्षेत्रीय अधिकारी, हेडक्लार्क ची १८ पदे मंजूर आहेत. सदर पदांची वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४०० आहे. मंजुर १८ पदांपैकी ०८ पदे रिक्त आहेत.

आस्थापनेवरील सदर रिक्त पदांवर पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि. १६/१२/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती.

शासनाने मंजूर केलेल्या सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मध्ये सदर पदांवरील पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता खालील प्रमाणे नमुद आहे.

कोटा - १०० ऽ पदोन्नती

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.

ब) महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे मुख्य लिपीक किंवा समकक्ष संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून किमान ०५ वर्षांचा अनुभव.

श्रेणी-०२ प्रशासकीय संवर्गातील रिक्त पदांपैकी बिंदु नियमावलीनुसार अ.जा.-१,भ.ज.-१ खुला-६ प्रवर्गातील आहेत.

वरील प्रमाणे अर्हता लक्षात घेता, मुख्यलिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे श्रेणी-०२ संवर्गातील प्रशासकीय सेवा संवर्गातील पदावर पदोन्नती देणेकरीता गठीत पदोन्नती निवड समितीने खालील प्रमाणे कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती करीता निवड केलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत पद | प्रवर्ग | धारण करीत असलेली अर्हता | |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. विजय सदानंद पाटील | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.ए. (पेरिअर युनिव्हर्सिटी)<br>एल.जी.एस.<br>एल.एस.जी.डी. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| २. | श्री. अशोक गायकवाड | मुख्यलिपीक | अनुसूचित जाती | १ | बी.कॉम. (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ)<br>एल.जी.एस.<br>जी.डी. अँण्ड सी.ए.<br>एल.एस.जी.डी. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| ३. | श्री. प्रकाश कुलकर्णी | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.ए. (अर्थशास्त्र) (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ)<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>डी.एल.जी.एफ.एम. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| ४. | श्री. जगदीश भोपतराव | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.कॉम (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ)<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>डी.एल.जी.एफ.एम. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| ५. | श्रीम. अन्नपूर्णा आवडेकर | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.कॉम (मुंबई युनिर्व्हसिटी)<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>डी.एल.जी.एफ.एम. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |

श्रेणी-०२ प्रशासकीय संवर्गातील पदे ही सहाय्यक आयुक्त पदाशी समतुल्य आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहीत आहे. त्यामुळे वरील प्रमाणे मुख्यलिपीक पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना श्रेणी-०२ प्रशासकीय सेवा संवर्गातील पदावर पदोन्नतीने नेमणूक करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम केला आहे

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १६६, विकास योजनेत भूसंपादनासाठी महानगरपालिका समुचित प्राधिकरण नसलेल्या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण महानगरपालिका करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार फेरबदल करणेबाबत.

प्रशांत केळुसकर :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.१५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/९४१/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

तसेच विकास नियंत्रण नियमावलीमध्ये शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/ नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झालेले आहेत.

सदर विकास योजनेमध्ये सार्वजनिक वापराची विविध आरक्षणे ३८६ असून महानगरपालिका क्षेत्रामधील डोंगरी, तारोडी, उत्तन, पाली, चौक या महसूली गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून ग.ग.ङ.क़.ऋयांची नेमणूक शासनाने केलेली आहे. तसेच या गावासह स्वतंत्र विकास योजना मंजूर झालेली आहे. त्याप्रमाणे सदर क्षेत्रामधील आरक्षणे वगळता महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असलेल्या उर्वरीत क्षेत्रामध्ये एकूण ३३४ आरक्षणे शिल्लक राहत आहेत.

सदर ३३४ आरक्षणामध्ये आ.क्र. १८५ (बस स्टॅन्ड) हे मिरारोड स्टेशन जवळ दर्शविलेले असून या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण ग.च.ङ.द्र.क.आहे. तसेच आ.क्र. ३१६ (बस स्टॅन्ड) हे आरक्षण छत्रपती शिवाजी मार्गावर झंकार कंपनी येथे दर्शविलेले असून या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण ए.क.च.द्र.आहे.

महानगरपालिकेच्या परिवहन सेवेसाठी अद्यावत (बस स्टॅन्ड) सह बस डेपो असणे आवश्यक असून यासाठीची जागा सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. तसेच मिरा भाईंदर शहराची विकास योजना मंजूर होवून जवळपास १८ वर्षे पुर्ण झालेली असून संबंधित समुचित प्राधिकरणांनी वरिलप्रमाणेच्या आरक्षणाच्या जागा हस्तांतरित करुन घेतलेल्या नसून त्यासाठी महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर केलेला नाही.

यास्तव सदरच्या आ.क्र. १८५ (बस स्टॅन्ड) समुचित प्राधिकरण ग.च.ङ.द्र.क.व ३१६ (बस स्टॅन्ड) समुचित प्राधिकरण ए.क.च.द्र.या समुचित प्राधिकरणाऐवजी आरक्षणाचे समुचित प्राधिकरण म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिका करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेस व त्याअनुषंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

अश्विन कसोदरिया :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, प्रशासनाने हा विषय आणलेला आहे. समुचित प्राधिकरण बद्दलण्याचं थोडक्यात म्हणजे असं आहे. त्यामध्ये दोन आरक्षण आहेत. त्यामध्ये एक जो आरक्षण आहे १८५ खरं तर तो आजच्या तारखेचं पूर्णपणे त्या आरक्षणामध्ये बरेच काही घरं संकुल, जुनी झोपडपट्टी मार्केटमध्ये हा आपला विकास आराखडा तयार होण्याच्या आधीपासून असलेले सगळे बांधकाम आरक्षण पडला तेंव्हा या विषयावर कदाचीत दुर्लक्ष केले गेले असावं म्हणून आज एम.एस.आर.टी.सी. कडे तो बस स्टॅंड एस.टी. चा असला तरी ते भूसंपादन ते करू शकणार नाही किंवा मिरा भाईंदर सुध्दा याची परिस्थिती तशीच आहे जागा शिल्लक राहिलेली नाही. आरक्षण बदलल आणि मिरा भाईंदरचं झालं तरी ते आरक्षण बसस्टॉप ते होवूच शकणार नाही कारण ते आरक्षण पूर्णपणे आधीपासून त्याला मी अतिक्रमण नाही बोलणार कारण ते १९९० साली सगळं काही बांधकाम झालेले आहे. त्या धरतीवर तुम्ही ठराव करून तुमच्याकडे प्रशासनाकडे देत आहोत त्यांनी जे त्या ठरावाच्या अनुषंगाने योग्य कारवाई करावी विकास योजना प्रकरण क्र. १६६ विकास योजना भूसंपादनसाठी महानगर पालिका समुचित प्राधिकरण नसलेल्या आरक्षणाच्या समुचित प्राधिकरण महानगर पालिका करण्यासाठी महाराष्ट्र प्राधिकरण नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ (१) नुसार फेरबद्दल करणेबाबत मिरा भाईंदर शहर विकास योजना वगळलेले भाग सोडून शासनाची सूचना टी.पी.एस. हा गोषवाराचा मजकूर सोडतो, खालचा वाचतो. मुद्दयाचा सदर ३३४ आरक्षणामध्ये आरक्षण क्र. १२५ बस स्टॅंड सह बस डेपो आवश्यक असून यासाठी जागा सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या ताब्यात नाही, तसेच मिरा भाईंदर शहराचे विकास योजना मंजुर होऊन जवळपास १८ वर्ष पूर्ण झाले आहेत याच्या संबंधीत सहमुचीत प्राधिकरणनामी व वर्णीकरणाप्रमाणे आरक्षणाची जागा हस्तांतर करून घेतलेली नसून त्यासाठी महापालिकाककडे प्रस्ताव सादर केलेले नाही परंतु सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठवितांना खालील उल्लेखलेल्या बाबींची पुर्तता करावी. आरक्षण क्र. १४५ बस डेपोचे क्षेत्र ३९०० चौ.मी. अपूर्ण क्षेत्र मंजुरी विकास आराखडा हा निश्चित आरक्षण अंमलात येण्याच्या पूर्वीपासून ह्या जागी मोठमोठे घर संकुल,

गावोगावी, नगर, झोपडपट्टी मिरारोड मधील एकमेव भाजीमंडी, मासवीमंडी, मटन विक्री मंडी दीर्घ काळापासून अस्तित्वात आहे. सदरच्या आरक्षण समुचित प्राधिकरण एम.एस.आर.टी.सी. असलेले असले तरी ही जागा भुसंपादन करण्यासाठी शिल्लक राहिलेली नाही. तसेच सदरच्या परिसरामध्ये मंडई विकसित झालेली नाही. सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून मंडई असणे आवश्यक आहे. तरी सदरचे आरक्षण बस स्टॅन्ड ऐवजी नाव बदलून शाकाहारी मांसाहारी मंडई प्रस्तावीत करून आरक्षीत फेरबदलासाठी महाराष्ट्र प्राधिकरण नगररचना अधिनियम ११६ चे कमल ३७(१) नुसार शासनाकडे प्रस्ताव पाठवा. तसेच आरक्षण क्र.१६६ बस स्टँड या आरक्षण समुचित आरक्षण बी.एस.टी.आय. या आरक्षण सहमुचीत प्राधिकरण ऐवजी समुचित प्राधिकरण म्हणून मिरा भाईंदर महानगर पालिका करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ (१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास व निर्णय होण्यासाठी मी ठराव मांडत आहे.

सुहास रकवी :-

माझे अनुमोदन आहे.

प्रशांत केळुसकर :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, सन्माननीय सदस्य जुबेर इनामदारने जो ठराव मांडला आहे. त्याच्या खुलासा करावा आयुक्त साहेबांनी.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, ठराव मांडा आपल्याला काय मांडायचा तो पण गोषवारा दिला आहे ना. प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे याचा, याच्याबद्दल थोड बोलू इच्छितो. विकास योजना भूसंपादनासाठी महापालिका समुचित प्राधिकरण नसलेल्या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण महापालिका करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना नियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदल करणेबाबत मिरा भाईंदर महानगर पालिकेची विकास योजना १९९७ म्हणजे यापूर्वी १९९७ मध्ये मंजुर झाली आणि काही पार्ट २००० च्या नंतर मंजुर झालेला आहे तर त्यामध्ये, त्यावेळी जे प्राधिकरण होतं ते बेस्ट आणि एम.एस.आर.टी.सी. असं त्याठिकाणी नमूद केले आहे. पण आजच्या तारखेला महानगर पालिकेची स्थापना २००२ मध्ये झाली आणि त्यानंतर परिवहन सेवा आपल्याकडे चालू झाली आता परिवहन सेवा चालू झाल्यानंतर बस स्टॉपसाठी आपल्याकडे जागा नसल्यामुळे आपण आजपर्यंत मला वाटते चार ठिकाणी याच महासभेने मंजुरी दिलेली आहे. टेम्परररी परमिशन दिलेली आहे की बाकीच्या आरक्षणाच्या ठिकाणी टेम्पररली उभे केले आहे. आणि माझ्या माहिती नुसार या ठिकाणी जे बेस्टसाठी आपण त्यावेळेला त्याला बेस्ट असं संबोधले जायचे आणि आज आपल्याला महानगर पालिकेमध्ये ते समुचित प्राधिकरण महानगर पालिका असल्या कारणाने आता आपण महासभेमध्ये ३७(१) साठी प्रस्ताव दिला आहे की त्याचा बेस्टचे नाव कमी करुन त्याच्यावरती आपल्या महानगर पालिकेचे परिवहन सेवासाठीचे आरक्षण असं नमूद करण्याबद्दल दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या ठिकाणी आरक्षण नमूद असतांना आत्ता आपण सांगितले की, तिथे बरेच अतिक्रमण झाले वगैरे कुणी अनधिकृत बांधकाम केले त्या अनधिकृत बांधकाम बद्दल ते तोडण्या बद्दलचा आदेश देखील मा. उच्च न्यायालयामध्ये झालेला आहे आणि आदेश झाल्यानंतर त्याच्यामध्ये परत कुणी अपिल केले असेल किंवा दुसरे काही प्रीटीशन झाले असेल आणि दुसरी गोष्ट की शासनाकडे याच्यामध्ये आपण आत्ता जसा ठराव मांडला तसा म्हणजे आरक्षणामध्ये फेरबद्दल करण्यासाठी आपण प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता आणि शासनाने तो नामंजूर केलेला आहे त्याच्यामुळे आजच्या तारखेला आपल्याला तेथील अतिक्रमण जमीनदोस्त करून ती जागा आपल्या ताब्यामध्ये घेणे हे बंधनकारक आहे. आत्ता काही माझ्याकडे लोक आली होती की तिथे मासळीचा व्यापार चालतो वगैरे काही लेडिज आल्या होत्या त्यांना मी शब्द दिलेला आहे की जोपर्यंत महानगर पालिका ताब्यामध्ये घेणार आहे तर ती ताब्यात घेतलेली जागा मासळीसाठी आम्ही वेगळी तुमच्यासाठी ती सध्या तरी ठेवू आणि पर्यायी व्यवस्था झाल्यानंतर तुम्हाला कुठे शिफ्ट करायचे ते आम्ही डिसाईड करू पण तूर्त आम्ही त्यांना धक्का लावणार नाही मात्र बाकी जे काही अनधिकृत बांधकाम आहेत किंवा इलिगल कन्ट्रकशन आहेत ते हायकोर्टच्या आदेश प्रमाणे तोडण्याची कारवाई करण्यात येईल.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, हे जे आरक्षण आहे हे मिरारोड मध्ये स्टेशनकडे प्रभाग क्र.३८ मध्ये मोडते. महापौर मॅडम हे क्लियर व्हावे की या ठिकाणी जे काही अनधिकृत गाळे हे सगळे बांधलेले आहेत ते कोणी बांधले आहेत आणि हायकोर्टची ऑर्डर आहे तिथे डिमोल्यूशन व्हावे म्हणून पण आजपर्यंत झालेले नाही आणि मुख्यतः आयुक्त महोदयांनी क्लियर करावे कि, हे कोणी बांधले आहे, कोणाच्या मालकीच आहे. मच्छीमार महिला आल्या त्यांना आपण सांगितल परंतु हे जे गाळे बांधले इथे आपपण आरक्षण आहे ना. म्हणजे बांधल कुणी मग आपण त्यावर कारवाई कधी करणार आहोत किंवा कसं.

मा. आयुक्त :-

तिथे बयाच प्रकारची बांधकाम आहे नेमके कुणाच्या नावावर आहे त्याचं नाव मी फाईल बघितल्या शिवाय डिक्लियर नाही करू शकत.

प्रशांत दळवी :-

आयुक्त महोदय, त्या जागेवर जे आरक्षण आहे त्याच्या विरोधात आपण हायकोर्टत आहोत पालिका हायकोर्टात आहे आणि त्याच नाव आपल्याला कळत नाही, माहित पडत नाही अस कस होऊ शकेल.

मा. आयुक्त :-

मी आता नविन असल्यामुळे आणि पहिल्यादांच प्रकरण माझ्या समोर आल्यामुळे कुणाच्या नावाने बांधकाम झाले हे मी...

प्रशांत दळवी :-

नगर रचनाकार ला कल्पना असेल ना. नगर रचनाकार आहेत आपल्याकडे.

मा. आयुक्त :-

बांधकाम परवानगी दिली असेल तर ना.

प्रशांत दळवी :-

परवानगी नाही दिली पण त्याच्या विरोधात जर पालिका हायकोर्टात आहे तर मग समोरची पार्टी कोण हे आपल्याला माहित नाही का?

मा. आयुक्त :-

आरक्षण ताब्यामध्ये घेण्यासाठी विरोधात आहोत आणि महानगरपालिका त्याच्यामध्ये पार्टी महानगर पालिकेला केले आहे कुणीतरी प्रिटीशन दाखल केले आहे.

प्रशांत केळुसकर :-

सर आपण विषय दिलेला आहे. २००२ साली त्याच्यामध्ये कोणते ठराव झाले सर्व माहिती आहे तुम्हाला हे पण पाहित असायला पाहिजे साहेब.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, आपल्या निदर्शनास आणु इच्छितो अशाच प्रकारचे आयुक्तांनी आदेश दिलेला असतानाही प्रभाग अधिकारी स्वप्निल सावंत कार्यालयीन आदेश आहेत ३/१२/२०१५ चे शॉपिंग सेंटरचे अशा प्रभाग अधिकायांना का निलंबित करत नाही का त्यांच्यावर ५६ अन्वये कार्यवाही होत नाही. आयुक्तांचे आदेश देऊनही कारवाई झाली नाही ना. म्हणजे आम्ही सभागृहात यायचे बोंबाबोब करायची आयुक्तांनी त्यांना कार्यालयीन आदेश काढायचे ३/१२/२०१५ चे आदेश आहे आयुक्त महोदय, आपल्या सहीचे स्वप्निल सावंतला १० वेळा आम्ही पत्र व्यवहार करतो एकाही नगरसेवकाच्या पत्रांना उत्तर देत नाही आम्हाला परत सालाभर प्रमाणे किंवा महिनाभर प्रमाणे आम्हाला परत त्या फेरीवाल्यांवर आणू नका परंतु आम्ही कुठच्याही बाबतीत हे अतिक्रमण तोडा ते अतिक्रमण तोडा आज एक पत्र या प्रशांत दळवीचे दाखवून द्यावे साडे तीन वर्षातले परंतु जे नियमात बसत असेल जी आर.जी. असेल महानगर पालिकेची जिकडे आपल्याला काही सुधारणा करायची असतील आज आम्ही सांगून बोंबा मारतो तिकडे दोन वर्ष झाले सुलभ शौचालय आम्हाला हवं आहे त्या मिरा रोड परिसरामध्ये ते शौचालय बांधता येत नाही आम्हाला, अनधिकृत गाळे तिकडे बांधले जातात त्याला जबाबदार कोण? आज त्या जागेवर त्या शांती शॉपिंग सेंटरवाल्याने तिकडे आयुक्त महोदय, स्टे आणलेला तिकडे आहे. आपण त्यांच्या स्टे ला एवढे घाबरतो आयुक्त महोदय, तो स्टे वॅकेन्ट होत नाही ते गाळे आपण तोडत नाहीय उलटपक्षी त्याने आपल्याच डी.पी. रोडमध्ये पार्किंग सुरू केलेली आहे. अवाढव्य असे ५०० ते १००० मोटर सायकल पार्क करतात. पे ॲन्ड पार्क सुरू केलेला आहे. म्हणजे आपल्या जागेवरती तो धंदा चालू केला, बिझनेस चालू केलेला आहे आणि त्यांचं पुर्णपणे ते शांती शॉपिंग सेंटर अनधिकृत त्याला पण साहेब आपण काही करत नाही, आपलाच पत्र आहे, आपण दिलेलं प्रभाग अधिका-यांना.

सई वडके :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, बस डेपोच्या आरक्षणा वरती जे अतिक्रमण झालेला आहे ते मिरारोड वेल्फेअर असोसियशन या संस्थेमार्फत दावा दाखल झाला होता न्यायालयामध्ये.

प्रशांत दळवी :-

मिरा रोड असोसियशनचे कोणीतरी असेल की नाही, कोणीतरी आहे की नाही कोण आहे अध्यक्ष सेकरेटरी, चेअरमन असतील की नसतील.

जुबेर इनामदार :-

विधी मॅडम, आरक्षणामध्ये किती टक्के जागेवर ते बांधकाम आहे मार्केटचं पुर्ण आरक्षण बोलता आहेत तुम्ही, पुर्ण आरक्षणमध्ये बरेच काही मोठ-मोठ संकुल आहेत त्याला पालिकेने परमिशन दिलेली आहे बांधकामाची कारण १९९७ च्या आधीचे आहेत बरोबर की नाही.

सई वडके :-

दावामिरारोड वेल्फेअर असोसिएशन या नावाने दाखल झालेला आहे.

जुबेर इनामदार :-

पुर्ण आरखणाचा विषय चालला, पुर्ण आरक्षणामध्ये जितका काही अनधिकृत बांधकाम आहे.

प्रशांत दळवी :-

विधी मॅडम. आपण जो दावा दाखल केला होता, बस स्टॅंडची आरक्षीत जागा त्या जागेवरती जे काही बांधकाम झालेला आहे आणि हायकोर्टचे निर्णय आहेत ते बांधकाम जमिनदोस्त करावं विधी मॅडम, तुम्ही आता जे म्हणतात, त्या संस्थेने केलेले त्या त्या संस्थेवर काही कारवाई झाली आहे का. एम.आर.टी.पी. केलं आहे का. कधी, गरज वाटली नाही का?

सई वडके :-

फाईल बघून सांगता येईल मला.

प्रशांत दळवी :-

आयुक्त महोदय, काय प्रकार आहे हा?

मा. आयुक्त :-

मी आपल्याला स्पष्ट खुलासा केलेला आहे. आता या ठरावाच्या अनुषंगाने पण ती संस्था कोणाची आहे काय आहे, ते पण आता डिक्लेर केलेले आहे त्यांनी आता त्याचा मालक कोण आहे. चालक कोण आहे हे एवढ्या बारीक सारीक गोष्टीचं लगेच ताबडतोब इथे सांगता येणार नाही आणि आम्ही काय कारवाई करणार आहोत त्याचा देखील आम्ही इथे उल्लेख केलेला आहे. आपण जे आता म्हटलात की ते कोणाचा शॉपिंग सेंटर आहे काय मी याच्या अगोदर आपल्याला खुलासा केलेला आहे.

प्रशांत दळवी :-

| ४ | स्व. क्विंटन कोरीया व्यायामशाळा डोंगरी, डोंगरी गाव, उत्तन रोड, भाईंदर (प.) | ६०००/- वार्षिक | दि. ०१/१०/२०१३ ते दि.३०/०९/२०१८ (५ वर्षे) |
| ५ | योग ध्यान शेड जेसल पार्क चौपाटी, भाईंदर (पू.). | १८००/- वार्षिक | दि. १८/१०/२०१३ ते दि.१७/१०/२०१८ (५ वर्षे) |
| ६ | गोकुळ व्हिलेज, व्यायामशाळा, शांती पार्क, मिरा रोड पू. | ६०००/- वार्षिक | दि. ०१/०३/२०१४ ते दि.२८/०२/२०१९ (५ वर्षे) |
| ७ | डॉ. बाबासाहेब आबेंडकर नगर, समाजमंदिर (व्यायामशाळा), उत्तन रोड, भाईंदर (प.) | १८००/- वार्षिक | दि. १३/०१/२०१३ ते दि.१२/०१/२०१८ (५ वर्षे) |
| ८ | साईबाबा नगर समाजमंदिर, मिरा रोड पू. | १८००/- वार्षिक | दि. ०१/०३/२०१४ ते दि.२८/०२/२०१९ (५ वर्षे) |
| ९ | शिव मंदिराजवळील समाज मंदिर, पेणकर पाडा, मिरा रोड (पू.) | १८००/- वार्षिक | करारनामा झालेला नाही. |
| १० | आदर्श इंदिरानगर येथील शाळा, नवघर, भाईंदर पू. | १८००/- वार्षिक | दि. ०१/१०/२०१३ ते दि.३०/०९/२०१८ (५ वर्षे) |
| ११ | बेकरी गल्ली, समाजमंदिर, भाईंदर (प.) | १८००/- वार्षिक | दि. २९/१२/२०१३ ते दि.२८/१२/२०१८ (५ वर्षे) |
| १२ | मिरागाव, हनुमान मंदिर रंगमंच, मिरा रोड पू. | २१९२/- वार्षिक | करारनामा झालेला नाही. |
| १३ | धारावी देवी समाजमंदिर, तारोडी, भाईंदर (प.) | १८००/- वार्षिक | दि.१६/०३/२०१३ ते दि. १५/०३/२०१८ (५ वर्षे) |

वरील मालमत्तेचा संबंधित संस्थेमार्फत सामाजिक व सार्वजनिक कामासाठी वापर करण्यात येत असल्याने व वाणीज्य वापर नसल्याने व चालू बाजार भावापेक्षा कमी भाडे आकारण्याबाबत मा. महासभेचा निर्णय झाल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ (ग) नुसार शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तसेच खालील मालमत्ता शासकीय दराने भाड्याने देण्यात आलेल्या आहेत.

| अनु. क्र | मालमत्तेचे वर्णन | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.), उड्डाणपुलाखालील शिधावाटप कार्यालय | आजपर्यंत भाडे जमा केलेले नाही. |
| २ | भाईदर (प.), रेल्वेस्थानकाजवळील इमारती मधील राज्य परिवहन महामंडळ (एस.टी. डेपो जागा) | आजपर्यंत भाडे जमा केलेले नाही. |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, (नगरभवन) पहिला मजला, तलाठी कार्यालय | आजपर्यंत भाडे जमा केलेले नाही. |
| ४ | मिरा रोड (पू.), रामनगर येथील राष्ट्रसंत आचार्य पदमसागर सुरीश्वरजी भवनमधील सह.दुय्यम निबंधक कार्यालय | दि. ०१/०१/२०१३ ते दि. ३१/१२/२०१७ पर्यंत भाडेतत्त्वावर देण्यात आलेला आहे. |
| ५ | मिरा रोड (पू.), रामनगर येथील राष्ट्रसंत आचार्य पदमसागर सुरीश्वरजी भवनमधील उप-निबंधक सहकारी संस्था, ठाणे कार्यालय | भाड्याने देण्याची कार्यवाही सुरु आहे. |

त्याचप्रमाणे भाईंदर (प.), मिरा-भाईंदर शॉपिंग सेंटरमधील खालील गाळे भाड्याने देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | गाळा क्र. | भाडेकरुचे नाव | वार्षिक भाडे | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री. गोपाळ कावणकर | रु.१३,९४४/- | शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. करारनामा झालेला नाही. |
| २ | २ | श्री. हेमंत जगन्नाथ घरत | रु.१३,९४४/- | |
| ३ | ३ | श्री. मोहन शंकर चव्हाण | रु.१३,९४४/- | |
| ४ | ४ | श्री. नंदलाल चिमण माळी | रु.१३,९४४/- | |
| ५ | ५ | श्री. विष्णू शिरवळकर | रु.१३,९४४/- | |
| ६ | ६ | श्री. शिवराम गुंडप्पा वेज्रंत्री | रु.१३,९४४/- | |
| ७ | ७ | श्री. परमजीत सिंग हुंजन | रु.१३,९४४/- | |
| ८ | ८ | श्री. सुरेश कावणकर | रु.१३,९४४/- | |
| ९ | ९ | श्री. आलम खान | रु.१४,७००/- | |
| १० | १० | श्रीम. अजिमा ईस्माईल कुरेशी | रु.१४,२८०/- | |
| ११ | ११ | श्री. रमेश हरगोविंद जोशी | रु.१६,८३९/- | |
| १२ | १२ | श्री. मिश्रीलाल वैंष्णव | रु.१४,१७२/- | |
| १३ | १३ | श्री. उमाशंकर बाबुराव गुप्ता | रु.१४,१७२/- | |
| १४ | १६ | श्री.निलेश अनंतराव मोहिते | रु.२७,१२०/- | |
| १५ | १४ | हिंदु वैंकुंठ धाम, सामग्री भंडार | रु.१/- | दि.१८/०४/२०१२ ते दि.१७/०४/२०१७ पर्यंत भाडे तत्त्वावर देण्यात आलेला आहे. |

तदनंतर मा. महासभा दि. १३/०५/२०१५ ठराव क्र. ०१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. महानगरपालिकेने चालुबाजार भावाप्रमाणे (ड्ढड्ढड्ढड्ड ड्ढड्डड्ढत्त्दद्दृद्ध) दर निश्चित करण्यासाठी नियुक्त केलेल्या व्दिस्तरीय समितीत बांधकाम व नगररचना विभागाचे अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेल्या चालु बाजार भावाप्रमाणे (ड्ढड्ढड्ढड्ड ड्ढड्डड्ढत्त्दद्दृद्ध) प्रमाणे मुल्य ठरवावे.
२. सदर मालमत्तेचे बाजार भावाप्रमाणे मूल्य ठरल्यानंतर जाहिर निविदा प्रसिद्ध करावी.
३. निविदा व्दारे प्राप्त देकार मंजुरीसाठी मा. स्थायी समितीची मंजुरी घ्यावी.

महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देण्यासाठी खालील प्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१. मालमत्ता ही नोंदणीकृत संस्थानाच देण्यात यावी.
२. संस्थेने भाड्याच्या कालावधीत दरवर्षी त्यांचा लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिकेकडे सादर करणे बंधनकारक राहील.
३. सदर मालमत्तेचा वाणिज्य वापर करण्यात येणार नाही.
४. सदर मालमत्ता संस्थेने कोणत्या कार्यासाठी वापरली त्याचा तपशिल व केलेले कार्यक्रम यांची माहिती दरवर्षी महानगरपालिकेस सादर करावा लागेल.
५. विद्युत बिल, पाणी बिल व किरकोळ दुरुस्ती संस्थेस करावी लागेल.
६. सदर मालमत्तेचा वापर संस्था कोणत्या कामासाठी करणार आहे त्याचा फलक मालमत्तेच्या बाहेर संस्थेस लावणे बंधनकारक राहील.

वरील अटींचा भंग केल्यास करारनामा रद्द करुन सदर मालमत्ता ताब्यात घेण्यात यावी.

वरील वस्तुस्थिती पाहता महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देणेकामी चालू बाजारभावानुसार तीन वेळा निविदा मागवून देखील भाड्याने मालमत्ता घेण्यासाठी संस्थांचा प्रतिसाद न आल्यास सवलतीच्या दराने मागणी करण्याऱ्या संस्थेस मालमत्ता भाड्याने देणेसाठी शासनास प्रस्ताव पाठवावा व मालमत्ता सवलतीच्या दराने ५ वर्ष मुदतीसाठी भाड्याने देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर          अनुमोदक :- श्री. सुहास रकवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७३, पंडित भिमसेन जोशी व इंदिरा गांधी रुग्णालयासाठी मानद तत्वावर वैद्यकिय तज्ञ नेमणूक करणेबाबत.

राजेंद्र जैन :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील पंडित भिमसेन जोशी रुग्णालय सुरु झाले असुन त्याठिकाणी महानगरपालिकेचे डॉक्टर असुन ते संख्येने कमी आहेत. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या बहुतांश रुग्णांना सेवा अपुऱ्या पडत आहे. ही बाब विचारात घेता महानगरपालिका हद्दीत फार मोठया प्रमाणावर खाजगी हॉस्पीटल कन्सलटींग करणारे तज्ञ डॉक्टर आहेत. त्यातील बरेचशे डॉक्टर आपली सेवा महानगरपालिका रुग्णालयात देण्यासाठी तयार आहेत. त्यामध्ये फिजीशियन सर्जन, गायनेक, ऑर्थोपेडिशियन, डर्मटोलॉजिस्ट, पिडीयाटीशन, पॅथोलॉजिस्ट, रेडीओलॉजिस्ट, अॅनेस्थेशिया (दोन तास बंधनकारक नाही, गरजेप्रमाणे) इत्यादी तज्ञ डॉक्टर आहेत त्यांची सेवा घेणे आवश्यक आहे. त्यांची सेवा घेतल्यास महानगरपालिका रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना फार मोठ्या प्रमाणात फायदा होईल. त्याकरीता वरील तज्ञ डॉक्टरांमधील आठवड्याला दोन वेळाप्रत्येकीदोन तास व अंतरनिहित निश्चित केलेल्या वेळेत ठोक रु.१००००/-इतक्या मानधनावर घेणेकरीता प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी. सदरचे तज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णालयात येणाऱ्या पेशंटची जबाबदारी त्याच्यावर देता येईल. तसेच ज्या रुग्णांना ऑपरेशन किंवा इतर आवश्यक उपचाराची गरज असेल ती सेवा या मानद डॉक्टरांकडून घेता येईल. सदर डॉक्टरांवर महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकिय अधिकारी यांचे नियंत्रण राहील. सदर डॉक्टरांना व इतर डॉक्टरांना प्रोत्साहित करण्याकरिता महानगरपालिकेने विशिष्ट असे मानचिन्ह देऊन सन्मान करावा. जेणेकरुन त्यांच्यात उत्साह येईल व महानगरपालिकेच्या रुग्णांची अधिकाधिक सेवा करण्याची भावना त्या तज्ञ डॉक्टरांवर राहील व महानगरपालिकेच्या रुग्णांना जास्त सेवा मिळेल याकरीता प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

रमेश जैन :-

अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

साहेब आपल्याकडे अशी वाईट परिस्थिती आहे त्या हॉस्पिटलमध्ये आपले पालिकेचे डॉक्टर आहेत ना ते बाहेर पाठवतात पेशंट ना प्राईव्हेट चेकअप साठी आणि प्राईव्हेट इन्वेस्टीगेशन साठी आता आपण अजुन दुसऱ्या लोकांना त्याच्यामध्ये समावेश करायचा हे शक्य आहे का? आणि त्यांनी आपली स्वतःची दुकाने सुरु करायची गोरगरीब आपल्या पालिकेकडे येणार.

राजेंद्र जैन :-

आयुक्त महोदय अपने पास में सिर्फ ३ कन्सलटन्स है फिजीशियन सर्जन, गायनॅक आणि ऑर्थोपिडीशियन उसमेंसे १ आया नही है। १ कन्सलटन्स ओ.पी.डी. करेगा, इन डोअर करेगा, प्रोसिजर करेगा, ऑपरेशन करेगा, क्या-क्या कर लेगा. आपको और डॉक्टर चाहिए।

जुबेर इनामदार :-

साहेब उद्या कमी जास्त झाले तर त्याची जबाबदारी ही लोक घेणार आहेत का?

(सभागृहात गोंधळ)

राजेंद्र जैन :-

आयुक्त महोदय विषय ऐसा है की, आपके पास में ४ कन्सलटन्स है एकने जॉईंट किया है १ कन्सलटन्स को ८०,००० पगार मिलती है गव्हर्नमेंट के उपर. साल का २० लाख हम सिर्फ ३ कन्सलटन्स पे खर्च करते है। जो डॉक्टर यहाँके पब्लीक को इतने साल से अॅक्सेप्टेड है उसे १०,००० पर मन्थ अव्हेलेबल कराने की रिक्वेस्ट की है वो सफल होगी नही होगी वो आगे देखने का है। आपको उनको प्रोत्साहित करने का है। जब २ डॉक्टर लगातार मिलेंगे तो हमें सप्ताह के छह रोज २ घंटे ओ.पी.डी. मिलेंगी हर ब्रांच की, अगर ऑपरेशन करना है तो जो अपने रेग्युलर बेसिस पे है वो भी अपॉईंट कर पाएगे और दुसरे भी कर पाएगे। सेवा बहोत बढ जाएगी चिफ रेट पड जाएंगे। अभी हम क्या कर रहे है परमनन्ट ४ कन्सल्टंन्ट के अलावा एन.एच.एम. के नॅशनल हेल्थ मिशन के २८ डॉक्टर को पैसे दे रहे है। पर कॉल के, पर प्रोसीजर के तो उनका पेमेंट रुकेगा याने हम साल का कम से कम १ करोड बचा पाऐंगे। प्लस उन्होंने यह भी बोला है की अगर कोई डॉक्टर गलत कार्य करता है अपने प्रायव्हेट हॉस्पीटल की बढोतरी करता है। तो उसपे विभाग का नियंत्रण रहेगा ना सर पुरा नियंत्रण हमने विभाग को दिया है की वो विभाग को जितना जरुरत हो उतने कन्सल्टन्ट अपने हिसाब से लेने का। सारा अधिकार विभाग को दिया है हमने प्रस्ताव के अंदर।

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय आम्ही तुम्हाला विचारतो तुमची काय भुमिका असणार याच्यामध्ये. हे तुम्हाला पटत का? प्रशासन एवढ कमकुवत झाल आहे का की आमच्या माध्यमातून असं आरोग्य विभागासाठी सुध्दा डॉक्टरची मागणी आम्ही अशाप्रकारे करावी.

निलम ढवण :-

हे किती महिन्यांसाठी आपण डॉक्टरची अपॉईंटमेंट करतोय कारण आपलं हे हॉस्पीटल चालु होताना आपल्या हॉस्पीटलला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळावा आणि ते पूर्ण शासनामार्फत चालावे अशापध्दतीने आदरणीय आमदार प्रतापजी सरनाईक यांनी मागणी केली होती. आणि त्यानुसार उद्घाटनाच्या दिवशी आदरणीय आरोग्य मंत्री दिपकजी सावंत साहेब यांनी देखील घोषणा केलेली होती की शासनामार्फत हे पूर्णतः चालवणार आहोत. त्यामुळे याची सगळी भरती किंवा या हॉस्पीटलसाठी लागणारा स्टाफ आणि सर्वच मिरा भाईंदर महानगरपालिकेला हा खर्च परवडणारा नसल्यामुळे ते शासनामार्फत चालवणार आहे अशी

घोषणा आरोग्य मंत्र्यांनी केली होती. त्या संदर्भात त्यांचा देखील पाठपुरावा करुन लवकरात लवकर ते शासनामार्फत पूर्ण त्याची पुढची कारवाई स्टाफ भरणे किंवा इतर आवश्यक तरतूदी आहेत ते ताबडतोब करुन घेण्यात यावी अशी मी आपणाला विनंती करते. आणि आता जे भरणार आहात तज्ञ म्हणून ते किती महिन्यांसाठी भरणार आहात किंवा शासन जोपर्यंत भरत नाही तोपर्यंत हे ठेवणार आहात याची माहिती आपण सभागृहाला द्यावी.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, यापूर्वीच महासभेने ठराव पास केला तो शासनाला पाठविलेला आहे. आपण तोपर्यंत मध्यंतरी काही काळापुरते मानद तत्वावर डॉक्टर घेणार आहोत. एक प्रयोग करुन बघणार आहोत. जर चांगला रिस्पॉन्स असेल तेवढीच सेवा डॉक्टरांची वापरायला मिळेल.

जुबेर इनामदार :-

गोषवारा का नाही दिला. तुम्ही त्या ठरावाच्या बाजूने बोलतात म्हणून विचारतो गोषवारा का नाही दिला.

मा. महापौर :-

जुबेरजी ऐसा था की इन बिटवीन कुछ डॉक्टरने ऐसे कहाँ मेरे पास आए थे, बोले हम हमारी मानद सेवा देने को तयार है। लेकिन हम बिना कोई ऑथोरिटी के हम आने नही दे सकते इसलिए हम हमारे नागरिको को सुविधा देने के लिए कुछ डॉक्टर अगर मानद सेवा देने के लिए रेडी है तो हमने उनको बुलाया है और जब तक राज्य शासन नही लेगा तब तक हमे उन डॉक्टर की सेवा लेनी है। उसके बाद उनको ना बोल देंगे।

जुबेर इनामदार :-

मॅडम कोई बात नही बहुत अच्छा विषय है।

मा. महापौर :-

और हमने यह प्रयोग इंदिरा गांधी में किया है।

जुबेर इनामदार :-

लेकिन इसकी क्रायटेरिया आज नक्की होनी चाहिए। इनके क्वॉलिफिकेशन क्या होंगे? कौनसे डिपार्टमेंटस के होंगे? उनके साथ हमारा क्या तालमेल होगा? इसकी जानकारी कौन देगा सभागृह को बी.एम.एस और बी.एम.एस. डॉक्टर को लाके बिठाऐंगे आप या कल किसी डॉक्टरने ऐसी हरकत कर दी इसकी जबाबदारी पालिका की होगी। पब्लिक और पालिका होगी पर वो डॉक्टर चला जाएगा अपने डिस्पेन्सरी में।

मा. महापौर :-

ठिक है आपका यह सब डायरेक्शन अगली महासभा मे रितसर लेंगे गोषवारे के साथ।

जुबेर इनामदार :-

गोषवारे के साथ ठिक है, थँक्यू।

(सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरले.)

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७४, आरक्षण क्र. २२८, २२९, २३० (सर्व्हे नं. ४८/२, ५३/२ व ५४/२) मौजे पेणकरपाडा आरजी विकसित करणेबाबत.

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम सर्व्हे नं. ४८/२, ५३/२, ५४/२ कोणत्या गृहसंकुलात येतात. कोणाची आर.जी. आहे कोणी सोडली, कोण आहे विकासक?

रवि व्यास :-

मौजे पेणकरपाडा स.क्र. ४८(२१६)/२, ५३(२२१)/२ व ५४(२२२)/२ या जागेत तत्कालीन नगरपरिषदेने यापूर्वी जागामालक तथा विकासक मे. कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) यांस जा.क्र. नपा/नर/२३४०/९९-२०००, दि. २८/०२/२००० अन्वये नकाशे मंजुरीसह बांधकाम प्रारंभपत्र दिलेले आहे.

सदर जागेतील अनुज्ञेय क्षेत्र ३१६६३.७५ चौ.मी. पैकी उर्वरीत १६८११.१२ अनुज्ञेय क्षेत्रावर म्हाडा गृहसंकुलाच्या जागेत महानगरपालिकेने मे. श्रीकृष्ण को.ऑ.हौ. सोसायटी व म्हाडाचे वतीने विकासक मे. युनिक शांती नमिनाथ डेव्हलपर्स व वास्तुविशारद मे. अविनाश म्हात्रे ॲण्ड असो., यांस पत्र क्र. मनपा/नर/३४५१/२०१३-१४ दि. १३/१२/२०१३ अन्वये नकाशे मंजुरीसह इमारत प्रकार ए, बी, व बी-१ करीता बांधकाम परवानगी दिलेली आहे.

सदर परवानगीमध्ये यापुर्वीच्या दि.२८/०२/२००० रोजीच्या मंजूरीतील रेखांकनात दर्शविलेली आर.जी. व अंतर्गत रस्ते यांचे आर.जी. व अंतर्गत रस्त्यातील क्षेत्राचा वापर मंजूर रेखांकनात केल्याबाबत मे. श्रीकृष्ण को.ऑ.हौ.सो. यांनी महानगरपालिकेकडे हरकत सादर केली आहे. म्हाडाने याबाबत सदर आर.जी. क्षेत्र व अंतर्गत रस्त्याखालील क्षेत्राच्या रेखांकनात वापर करणेबाबत नाहरकत दाखला महानगरपालिकेकडे दिलेला नाही. रेखांकनातील आर.जी. व अंतर्गत रस्त्याचे क्षेत्राचे म्हाडाकडून संबंधीत सोसायटीस नोंदणीकृत करारनाम्याद्वारे हस्तांतरीत होऊन सदर अंतर्गत रस्ता व आर.जी. बाबत

म्हाडाकडून नाहरकत दाखला घेण्यात यावा. तसेच मंजूर रेखांकनातील पोडियम आर.जी. भविष्यात तेथिल सदनिकाधारकांकडून व्यवस्थापन, दुरुस्ती व वापर होणे शक्य नाही. सबब सदर प्रमाणेची पुर्तता करुन सदर रेखांकनातील इमारतीस महानगरपालिकेने बांधकाम परवानगी देण्यात यावी.

वरिलप्रमाणे प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत रेखांकनास स्थगिती देण्यात यावी.

मौजे पेणकरपाडा, स.क्र. २२६पै., २२७पै., २२८पै., २२९पै., २३०पै. व मौजे मिरा, स.क्र. १५०पै., १५१पै. या मे. कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांचे जागेस यापुर्वी महानगरपालिकेने दि.२१/११/२००६ च्या मंजूर रेखांकनात आर.जी. क्षेत्र जमिन पातळीवर दर्शविण्यात आले होते तथापि यानंतर सदर रेखांकनास वेळोवेळी सुधारणा करुन शेवटची परवानगी दि.१८/१०/२०१३ अन्वये दिलेली आहे.

सदर मंजूरीत आर.जी. क्षेत्र क्लस्टर क्ष, क्षक्ष व क्षक्षक्ष मध्ये पोडियम वर दर्शविण्यात आले आहे. सदरचे क्षेत्र पोडियम वर दर्शविल्यास उपरोक्त जागेतील जुन्या सदनिकाधारकांस सदर आर.जी. क्षेत्राचे व्यवस्थापन व दुरुस्ती भविष्यात करता येणार नाही. या व्यतिरिक्त सदर जागेतील पोडियम आर.जी. बाबत तेथिल स्थानिक रहिवाश्यांनी वेळोवेळी तक्रार सादर केली आहे. सबब सद्यस्थितीत क्लस्टर क्षक्ष व क्षक्षक्ष चे काम प्रगतीपथावर असल्याने सदर क्लस्टर मधील पोडियम व आर.जी. चे नकाशे रद्द करुन सदर जागेतील आर.जी. जमिन पावळीवर दर्शवून त्यावर सुधारीत नकाशे महानगरपालिकेने संबंधीत विकासक / प्राधिकरणास मंजूर करुन घ्यावेत व सदर गृहसंकुलामधील आर.जी. महानगरपालिकेमार्फत विकसीत करणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

राजू भोईर :-

माझे अनुमोदन आहे.

प्रमोद सामंत :-

पोडियमवर वगैरे आर.जी. होते का? बोलो ना एवढा मोठा ठराव आहे. एवढा अभ्यास झाला. आर.जी. पोडियमवर दाखवता येते का? प्लान जे पास केले ते बरोबर आहे नाहीत ते पण कळेल आम्हाला. विकासकाने आर.जी असेल पोडियमवर आहे खाली आहे माहित नाही. आर.जी. विकासकाने मी डेव्हलप करणार नाही असं सांगितल आहे का? त्याने डेव्हलप करुन दिली पाहिजे. जर तो डेव्हलप करत नसेल तर ती आपण ताब्यात घ्यायची आहे. अगोदरच आपण ताब्यात घ्यायची.

मा. उपमहापौर :-

या विषयाचा गोषवारा पण दिलेला नाही. काय विषय आहे तो आम्हालाही समजू द्या.

प्रमोद सामंत :-

एकतर विषय यायला नव्हता पाहिजे. विषय आला आहे तर त्या बाबतची माहिती.

मा. उपमहापौर :-

गोषवारा नाही तर मलाही नाही माहिती घ्या विषयावर आम्हालाही सविस्तर डिपार्टमेंटकडून समजू द्या.

प्रमोद सामंत :-

आर.जी. पोडियमवर दाखवता येते का? जस त्यांनी आता काहीतरी बोलले ते.

दिलीप घेवारे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आर.जी. पोडियमवर दाखवता येते. परंतु काही महिन्यांपूर्वी सुप्रिम कोर्टात एक मुंबईची केस गेली होती त्यांनी सांगितले की आर.जी. जमिनिवर दाखवा त्याच्यानंतर आपण सगळ्या जमिनिवर दाखवायला सुरुवात केली. परंतु पूर्वी काही केस ठाण्यामध्ये, नवी मुंबई सगळीकडेच आर.जी. दाखवता येते आपल्या पेज नं. १११ वर अपेन्डीक्स ५ मध्ये आपण ही रेग्युलेशन मध्ये आहे.

प्रमोद सामंत :-

आर.जी. पोडियमवरती दाखवता येते म्हणजे जे प्लान तुम्ही पास केले ते तुम्ही रद्द करणार का?

दिलीप घेवारे :-

आम्हाला काही माहिती नाही.

प्रमोद सामंत :-

ठिक आहे माहिती नाही. त्याच्या पुढचा आमचा प्रश्न आर.जी. बिल्डरने विकसित केली आहे नाही केली आहे.

दिलीप घेवारे :-

विकसित केलेली नाही.

प्रमोद सामंत :-

तो नाही म्हणाला आहे का?

दिलीप घेवारे :-

नाही त्याच्याकडून विकसित करुन घेणार आम्ही.

प्रमोद सामंत :-

मॅडम जर विकासकाने ती आर.जी. विकसित करणार नाही अस सांगितल्यावरती आपण ताब्यात घेऊन विकसित करणार ना. अगोदरच कशाला आपण ताब्यात घेऊन विकसित करण्याचा विषय. तो आला पाहिजे ना. भेटला पाहिजे.

रवि व्यास :-

महापौर मॅडम आपकी परमिशनसे बोलता हूँ, अभी जो सर्व्हे नंबर ४८/५३ और ५४ जहाँ पे अभी काम अंडर कन्स्ट्रक्शन मैं है म्हाडा के लॅन्ड पे वहाँ पे बिल्डरने ३ इमारत अभी फिलाल अंडर कन्स्ट्रक्शन में है। जिसमे से उनके पास में टायटल और म्हाडा की एन.ओ.सी. जो की कार्पोरेशन को दि है उसमें ४००० स्क्वेअर मिटर के प्लॉट नही है। बाकी के जो प्लॉट है उसके अभी तक ना म्हाडाने सोसायटी को कन्वीनीयन्स की राईट दि है ना म्हाडाने कार्पोरेशन का एन.ओ.सी. दि है विदाऊट म्हाडा के एन.ओ.सी. के कार्पोरेशन ने ९००० स्क्वेअर मीटर का जो अप्रॉक्सीमेट प्लॉट है उसके उपर प्लान सॅक्शन कर दिया है और हालाकी उसके अंदर एफ.एस.आय. १६००० समथिंग कुछ एफ.एस.आय. उसको दि है बट कन्झ्यूम करने के लिए जो प्लॉट होने चाहिए वो प्लॉट एरिया अभी तक बिल्डर के पास नही है। विदाऊट राईट, विदाऊट टायटल, विदाऊट म्हाडा के एन.ओ.सी. के उन्होंने यह प्लान पास कर दिया है जो की पुरी तरीकेसे गलत है। मुझे पता है की, जब यह सॅक्शन हुआ तब आप उस पोस्ट पे नही थे।

दिलीप घेवारे :-

रविजी वो बात मेरे सॅक्शन की नही है। जिसने भी किया है उसके लिए मैं पुरा उत्तरदायित्व मेरा है। मैं उसके लिए जिम्मेदार हूँ। यह जो सब्जेक्ट है वो डी.सी. रुल का है वो पुरा कमिशनर साहब के पावर का विषय है। आपने इस बारे में बहुत सारे कम्पलेन्ट किए थे। हमने आपको जवाब दिया। म्हाडा में भी हमने आपकी शिफारस में लेटर भेजा था। म्हाडाने भी जवाब दिया है। फिर उसके लिए हम २६ को हेअरींग रखा है। बिल्डर, आर्किटेक्चर और आपको सबको बुलाया है। उस हेअरींग मैं लेंगे यहाँ महासभा में विषय.........

प्रमोद सामंत :-

नाही पण हा महासभेसमोर आलेला विषय आहे म्हाडामध्ये आपण जे प्लान पास केले आहेत तिथे अशाच प्रकारची सगळी आर.जी. आहेत. आर.जी. कॉमन असते. आर.जी. पोडियमवर केली म्हणजे त्या बिल्डींगची झाली ती.

रवि व्यास :-

महापौर मॅडम, विषय ऐसा है की वहाँ पे जो पुराने म्हाडा के टॅनेन्ट थे जो की लोअर मिडल क्लास के लोग थे। उनके लिए मॅडम जब बिल्डर एक नयी रि-डेव्हलपमेंट करके नई इमारत बना के दे रहे है लेकिन पुराना जो लेआऊट का आर.जी. था उसको पोडियम को शिफ्ट कर रहे है। बाकी के जो लोअर मिडल क्लास के लोग है, नई जो कमर्शिअल बिल्डींग बन रही है, जिसमें जो लोग आएँगे वो लोग सब बडे लोग है। १-१ फ्लॅट की किंमत देड करोड, दो करोड है और यह जो लोग है वो छोटे वर्क के लोग है। फ्युचर के अंदर एक वाद निर्माण होनेवाला है की, पोडियम के अंदर हमारे यहाँ पे गार्डन तुम लोग युज कैसे कर रहे है। उसका मेन्टेनन्स इतना दो उतना दो। इसमें १०० टक्के यहाँ पे वाद निर्माण होगा। वो पोडियम पे जो आर.जी. है उसका यूज आम पब्लिक के लिए और आम नागरिक के लिए नही हो पाएगा और अभी जो की वो आर.जी. पुरी तरह डेव्हलप हुआ नही अंडर कन्स्ट्रक्शन है तो अभी अगर हम लोगउसको रोकेंगे तो रुक सकता है। और भविष्य में लोगो को आर.जी. सही तरीके से यूज करने मिल सकती है। तो मैं आपसे मॅडम विनंती करता हूँ की कृपया आप कमिशनर साहब को बोलिए और संबंधित जो-जो अधिकारी है उनको बोलिए की, प्लान को रिव्हाईज करे और आम आदमी को आर.जी. यूज करने को मिले। और हायकोर्ट ने भी मॅडम ऑर्डर दिया है की, आर.जी. पोडियम पे अलाऊड नही है। और २०१५ मैं अभी फिलाल ही कार्पोरेशनने रिव्हाईज किया है। हायकोर्ट की ऑर्डर आने के बाद में पोडियम पे।

राजू भोईर :-

महापौर मॅडम आयुक्त साहेब काल वृक्षप्राधिकरण सभेमध्ये याच गार्डन बद्दल मी आपल्याला सूचविलेले आपण सांगितले सोमवारी मिटींग घेऊ या. तर ते माझ्या प्रभागात आहे तर तुम्ही त्या आधी राहिलेल्या लोकांसाठी गार्डन बनवावे अशी माझी विनंती आहे.

प्रमोद सामंत :-

आपण विकासकाकडून त्यांनी ना बिल्डींग बनवून रेडी केली त्या बिल्डींगची ओ.सी. दिली अगोदरच आर.जी. ची जागा सोडली ती आपण ताब्यात घेऊ शकतो का? आणि आपण डेव्हलप करु शकतो का? प्रशासनाने उत्तर द्यावे आपण अस करु शकतो का? जर असं करु शकतो तर आतापर्यंत जेवढे प्लान पास झालेले आहेत ते सगळेच आर.जी. पास करुन घेऊ. अगोदरच ताब्यात घेऊ ना. कशाला ठेवावे पेंडींग म्हणजे पुढे होणारच नाही कोण ती आर.जी. बदलणार नाही. त्या आर.जी. तिथल्या तिथे राहतील लोकांना हव्या त्या मिळतील नविन एफ.एस.आय. होऊ दे किंवा आणखी काही होऊ दे. असं होऊ शकेल का? मला एवढच सांगायच आपण ठराव केला त्यांचा प्रश्न बरोबर आहे. रवि व्यासने जो विषय आणला आहे किंवा

त्याचा अभ्यास केला आहे तो विषय बरोबर आहे ती पोडियमवर आहे वगैरे वगैरे पण अशाप्रकारे आपण करु शकतो का? शांतीनगरची आर.जी. २५ वर्षांनी आपण ताब्यात घेतल्या, २० वर्षांनी ताब्यात घेऊन बनवल्या अस सगळच आर.जी. जो बिल्डर प्लानमध्ये दाखवेल ही माझी आर.जी. ती लगेच आपण बिल्डींग बनायच्या अगोदर ताब्यात घेऊ शकतो का?

दिनेश जैन :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो माझे २-३ प्रश्न आहेत. आयुक्त साहेब कुठलही एखाद विकासक सी.आर.झेड बाधित जागा आर.जी. बोलून महानगरपालिकेला हस्तांतर करु शकतो का? यह आर.जी. का विषय चल रहा है उसके लिए मेरी सूचना है। मला या ठरावामध्ये एक सूचना द्यायची आहे की जर कोणी एखादा विकासक सी.आर.झेड जागेला आर.जी. म्हणून महानगरपालिकेच्या ताब्यात देत असेल तर ती जागा कॅन्सल करुन मोकळी जागा महानगरपालिकेला ताब्यात घेण्यात यावी आणि त्या विकासकावर आणि ज्या अधिकायांनी काम केले असेल त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. अशी सूचना या ठरावामध्ये देत आहे.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब विषय सिंपल आहे. प्रमोदजी आपण जे सांगितले आता आरक्षण ताब्यात घेता येईल का? त्या जागेची संकुलन ९५ म्हणजे म्हाडा हा ९५ पासून वसाहत आहे त्यामध्ये अनेकदा म्हाडाने खर्च केले. मी महापौर असताना त्यामध्येइतर सामग्री पण महानगरपालिकेने लावली. ती आर.जी. अस्तित्वात ९५ पासून आहे. आता त्या आर.जी.चे त्या बिल्डींगचे कुठलेही कन्सन न घेता त्यामध्ये परस्पर चेंजेस घेतला पोडियमवरती चालल जस प्रमोद सामंत साहेबांनी सांगितल की ते एका बिल्डींगची होऊन जाईल. आता त्या जमिनिवर सामान्य तिकडे कुटुंब ज्या लोकांना घरे नाहीत या महाराष्ट्रामध्ये त्या लोकांना लॉटरीच्या माध्यमातून सरकार ते सामान्य कुटुंब त्या ठिकाणी राहतात आणि हे म्हाडाचे सामान्य नागरिक त्या ठिकाणी बिल्डींगवर गेल्यानंतर त्याचा मेन्टेनन्स कॉस्ट या सगळ्या गोष्टी वाढणार आहेत आता जागेवर आर.जी. आहे. आणि जे मिरा भाईंदरमध्ये राहतात ती आर.जी. मॅडम अशा तीन रस्त्यावर आहेत त्याचा वापर सगळेच लोक करतात म्हणजे इतर आजुबाजुचा परिसर त्या सृष्टीभागामध्ये एकही गार्डन नाही काही नाही आणि त्याचा वापर इतर लोक पण करत असतात आणि ती आर.जी. तिकडनं त्या बिल्डींगवर गेली तर ज्या लोकांची ती खरोखर ओरिजनल आर.जी. होती ते सगळ या गार्डन पासुन वंचित राहणार आहे. ओपन स्पेसपासून वंचित राहणार आहे. म्हणून जे एक्झीस्टींग आर.जी. आहे त्या महानगरपालिकेने जेवढी जुनी सोसायटी आहे आपल्याला अनेकदा पत्रव्यवहार केले आहेत की आम्ही ते ताब्यात देतो तुम्ही ते विकसित करुन द्यावे. त्या अनुषंगाने तो विषय आहे. कुठलेही आपण पोडियम किंवा बिल्डरकडून मागत नाही. तो बिल्डरचा यात संबंध नाही कारण ती आर.जी. दुसयांची आहे पण लेआऊट रिव्हाईज केला तर ते उलट सुलट................

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम, रवि व्यासने मांडलेल्या ठरावात माझी एक सूचना समाविष्ठ करुन घ्यायची आहे. जे आर.जी. च्या जागेचे प्लॉट आहेत बयाच ठिकाणी मिरा भाईंदर शहरामध्ये आपल्याला माहित आहे. आयुक्त महोदयाना माहित आहे. काल वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक झाली त्या बैठकीत पण मी सांगितल ती आपल्या ताब्यात घ्याव्यात हीच माझी सुचना आहे. त्याच्यावर बरेच जणांची हडप केलेले आहे. बऱ्याच जणांनी पत्रे लावले आहेत, बयाच जणांनी त्याच्यावर ताबा घेतलेला आहे. तर ते त्यांच्याकडून काढून घ्यावे ही माझी विनंती आहे आणि सूचना समाविष्ट करुन घ्यावे ही विनंती आहे.

आसिफ शेख :-

सदरचा विषय पुढच्या महासभेत घ्यावा. गोषवारा नाही काही नाही. रितसर विषय घ्यावा.

प्रमोद सामंत :-

नाहीतर आमच्या क्वेरीज आहे आम्ही विचारतो.

रवि व्यास :-

मॅडम ठराव हो गया है इसपे अभी आप रुलिंग दिजीए।

प्रमोद सामंत :-

अजुन एक क्वेरी आहे एक्झिस्टिंग रेसिडन्सच्या नागरिकांच्या कन्सेन शिवाय आर.जी. बदल करता येतो का घेवारे साहेबांनी उत्तर द्यावे.

दिलीप घेवारे :-

प्रोजेक्ट जर पूर्ण झाले असेल, ओ.सी. झाली असेल, सोसायटीला इश्यू झाले असेल तर करता येणार नाही. त्याच्यापूर्वी करता येतो कारण तुम्ही जे ॲग्रीमेंट करता त्यात बिल्डरने क्लॉज दिलेला असतो की तुम्हाला टी.डी.आर मिळाला, एफ.एस.आय वाढला किंवा माझं काही झाल तर प्लान रिव्हाईज करायचे माझे अधिकार राखून ठेवले आहेत. त्या ॲग्रीमेंटवर दोघांनी सह्या केलेल्या असतात.

प्रमोद सामंत :-

ॲग्रीमेंट झालेले असले पाहिजे ना.

दिलीप घेवारे :-

हो.

प्रमोद सामंत :-

मग या विषयामध्ये आपल्याला आर.जी. त्याची शिफ्ट करता येणार नाही. म्हाडाच्या विषयामध्ये आर.जी. शिफ्ट करता येणार नाही. मग आर.जी. शिफ्ट करता येणार नसताना आपण त्याला पोडियमवर परवानगी दिली ही चुकीची दिली आहे की बरोबर दिली आहे.

दिलीप घेवारे :-

आर.जी. कनसेन्ट कुणी दिली. पहिलं जे अप्रुव्हल आहे तशीच आर.जी. आहे.

प्रमोद सामंत :-

म्हाडाच्या ज्या बिल्डींग झाल्या ९५ ला त्यावेळी त्यांना जी आर.जी. दाखवण्यात आलेली त्याच्यात बदल करुनआता ती आर.जी. पुन्हा प्लान रिव्हाइज शिफ्ट झालेली आहे.

दिलीप घेवारे :-

ती जागा आहे ना म्हाडा सोसायटीलाच दिली आहे आणि सोसायटीच्या कन्सल्टनेच हे प्लान मंजूर झाले आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम प्रशासनाचा विषयाला गोषवारा नाही. म्हणून आमचा विरोध आहे. त्या अनुषंगाने मी त्यावर ठराव मांडतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ तील परिशिष्ट ''ड'' प्रकरण २ मधील तरतुदीनुसार मा. सभेचे कामकाज सभागृहात चालते. प्रशासनाकडून धोरणात्मक व प्रशासकीय मंजुरीचे प्रस्ताव मंजुरीसाठी मा. सभेपुढे सादर केले जातात. मनपा नगरसचिव कार्यालयाने दि. १७/०२/२०१६ रोजी मा. विशेष महासभेबाबत सुचना क्र. १० काढलेली आहे. त्यामध्ये प्रकरण क्र. १७४ बाबत प्रशासनाची गोषवारा देण्यात आलेली नाही. आम्ही मा. आयुक्त, भिभामनपा यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र. मनपा/आयुक्त/१९१/२०१५ दि. ०१/०९/२०१५ बाबत सभागृहातील सर्व पालिका सदस्यांचे लक्ष वेधू इच्छितो की, उपरोक्त परिपत्रक सुस्पष्ट असतानाही नगरसचिव कार्यालयाने आयुक्तांचे स्वाक्षरीचे गोषवारा विषयपत्रिकेबरोबर दिलेला नाही ही बाब अत्यंत गंभीर आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २(ड) अन्वये महासभा विशेष कारणासाठी विशेष सभा बोलावली असावी परंतु मा. आयुक्तांच्या परिपत्रकाची तंतोतंत व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांची व्यक्तीशः राहिल असे निर्देश लेखी स्वरुपात असातानाही त्याचे पालन करण्यात आलेले नाही. तरी परिपत्रक, सभाशास्त्र नियम इ. अन्वये आपण सविस्तर गोषवारासह विषय/प्रकरण पुढील मा. महासभेत योग्य निर्णयाकरीता सादर करावे ही नम्र विनंती असे आम्ही ठराव मांडत आहे.

अशरफ शेख :-

माझे अनुमोदन आहे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७४ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक श्री. रवि व्यास, अनुमोदनश्री. राजू भोईर, दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. अशरफ शेख. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. सूचक श्री. जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. रवि व्यास यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सुचक श्री. रवि व्यास यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३७, विरोधात २१ तटस्थ १. श्री. रवि व्यास यांनी मांडलेला ठराव सूचनेसह मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. १७४ :-

आरक्षण क्र. २२८, २२९, २३० (सर्व्हे नं. ४८/२, ५३/२ व ५४/२) मौजे पेणकरपाडा आरजी विकसित करणेबाबत.

ठराव क्र. १३६ :-

मौजे पेणकरपाडा स.क्र. ४८(२१६)/२, ५३(२२१)/२ व ५४(२२२)/२ या जागेत तत्कालीन नगरपरिषदेने यापूर्वी जागामालक तथा विकासक मे. कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) यांस जा.क्र. नपा/नर/२३४०/९९-२०००, दि. २८/०२/२००० अन्वये नकाशे मंजुरीसह बांधकाम प्रारंभपत्र दिलेले आहे.

सदर जागेतील अनुज्ञेय क्षेत्र ३१६६३.७५ चौ.मी. पैकी उर्वरीत १६८११.१२ अनुज्ञेय क्षेत्रावर म्हाडा गृहसंकुलाच्या जागेत महानगरपालिकेने मे. श्रीकृष्ण को.ऑ.हौ. सोसायटी व म्हाडाचे वतीने विकासक मे. युनिक शांती नमिनाथ डेव्हलपर्स व वास्तुविशारद मे. अविनाश म्हात्रे ॲण्ड असो., यांस पत्र क्र. मनपा/नर/३४५१/२०१३-१४ दि. १३/१२/२०१३ अन्वये नकाशे मंजुरीसह इमारत प्रकार अे, बी, व बी-१ करीता बांधकाम परवानगी दिलेली आहे.

सदर परवानगीमध्ये यापुर्वीच्या दि.२८/०२/२००० रोजीच्या मंजूरीतील रेखांकनात दर्शविलेली आर.जी. व अंतर्गत रस्ते यांचे आर.जी. व अंतर्गत रस्त्यातील क्षेत्राचा वापर मंजूर रेखांकनात केल्याबाबत

मे. श्रीकृष्ण को.ऑ.हौ.सो. यांनी महानगरपालिकेकडे हरकत सादर केली आहे. म्हाडाने याबाबत सदर आर.जी. क्षेत्र व अंतर्गत रस्त्याखालील क्षेत्राच्या रेखांकनात वापर करणेबाबत नाहरकत दाखला महानगरपालिकेकडे दिलेला नाही. रेखांकनातील आर.जी. व अंतर्गत रस्त्याचे क्षेत्राचे म्हाडाकडून संबंधीत सोसायटीस नोंदणीकृत करारनाम्याद्वारे हस्तांतरीत होऊन सदर अंतर्गत रस्ता व आर.जी. बाबत म्हाडाकडून नाहरकत दाखला घेण्यात यावा. तसेच मंजूर रेखांकनातील पोडियम आर.जी. भविष्यात तेथिल सदनिकाधारकांकडून व्यवस्थापन, दुरुस्ती व वापर होणे शक्य नाही. सबब सदर प्रमाणेची पुर्तता करुन सदर रेखांकनातील इमारतीस महानगरपालिकेने बांधकाम परवानगी देण्यात यावी.

वरिलप्रमाणे प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत रेखांकनास स्थगिती देण्यात यावी.

मौजे पेणकरपाडा, स.क्र. २२६पै., २२७पै., २२८पै., २२९पै., २३०पै. व मौजे मिरा, स.क्र. १५०पै., १५१पै. या मे. कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांचे जागेस यापुर्वी महानगरपालिकेने दि.२१/११/२००६ च्या मंजूर रेखांकनात आर.जी. क्षेत्र जमिन पातळीवर दर्शविण्यात आले होते तथापि यानंतर सदर रेखांकनास वेळोवेळी सुधारणा करुन शेवटची परवानगी दि.१८/१०/2013 अन्वये दिलेली आहे.

सदर मंजूरीत आर.जी. क्षेत्र क्लस्टर क्ष, क्षक्ष व क्षक्षक्ष मध्ये पोडियम वर दर्शविण्यात आले आहे. सदरचे क्षेत्र पोडियम वर दर्शविल्यास उपरोक्त जागेतील जुन्या सदनिकाधारकांस सदर आर.जी. क्षेत्राचे व्यवस्थापन व दुरुस्ती भविष्यात करता येणार नाही. या व्यतिरिक्त सदर जागेतील पोडियम आर.जी. बाबत तेथिल स्थानिक रहिवाश्यांनी वेळोवेळी तक्रार सादर केली आहे. सबब सद्यस्थितीत क्लस्टर क्षक्ष व क्षक्षक्ष चे काम प्रगतीपथावर असल्याने सदर क्लस्टर मधील पोडियम व आर.जी. चे नकाशे रद्द करुन सदर जागेतील आर.जी. जमिन पावळीवर दर्शवून त्यावर सुधारीत नकाशे महानगरपालिकेने संबंधीत विकासक / प्राधिकरणास मंजूर करुन घ्यावेत व सदर गृहसंकुलामधील आर.जी. महानगरपालिकेमार्फत विकसीत करणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. रवि व्यास          अनुमोदन :- श्री. राजु भोईर

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

मिरा भाईंदर क्षेत्रातील कोणत्याही विकासकाद्वारा सी.आर.झेड. बाधित जागा आर.जी. मध्ये दाखविण्याची तरतुद नाही. तरी मौजे पेणकरपाडा सर्व्हे क्र. २०६, २०८, २१० या जागा सी.आर.झेड. ने बाधित असूनही सदर विकासकाने दि. २५/०३/२०१४ रोजी सी.आर.झेड. बाधित आर.जी. जागेचा करारनामा करुन एकूण २३,८९२,७३ चौ.मी. जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेली आहे.

तरी सदर विकासकाकडून सी.आर.झेड. बाधित जागेचे क्षेत्रफळ सोडून तितक्याच चौ.मी. मापाची आर झोनची मोकळी जागा महानगरपालिकेस करारनामा करुन देण्यात यावी व तोपर्यंत सदर विकासकाची सर्व परवानगी थांबविण्यात यावी आणि सदर विकासक व दोषी अधिकारी यांचेवर कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसैन | |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टीफन फॅरो | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ५ | मिरादेवी रामलाल यादव | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | पाटील सुनिता कैलास | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | विराणी रेखा अनिल | |
| १० | अरोरा दिपीका पंकज | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | वंदना रामदास चक्रे | प्रविण मोरेश्वर पाटील |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | इनामदार जुबेर | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | शेख अशरफ मोहम्मद | |
| १६ | सुजाता रविकांत शिंदे | १६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | सामंत प्रमोद जयराम | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | रकवी सुहास माधवराव | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २१ | कासोदरीया अश्विन | २१ | डॉ. आसिफ शेख | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | तारा विनायक घरत | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटीयन | | | |
| २८ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| २९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३० | हरिश्चंद्र आमगावकर | | | |
| ३१ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३२ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३३ | भोईर राजु यशवंत | | | |
| ३४ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३५ | मुन्ना सिंग | | | |
| ३६ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३७ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | | |

ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७५, मुर्धा, राई व मोर्वा येथील खाड्यांमधील पाण्याचा प्रवाह सुरळीत करणेकरीता खाडीतील प्रवाहामधील तिवरांची व इतर झाडे काढणेबाबत शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

नरेंद्र मेहता :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुर्धा, राई, मोर्वा, कनकिया, घोडबंदर या भागात खाडया आहेत तसेच मिरारोड (पूर्व) येथे जाफरी खाडी देखील आहे. त्याचप्रमाणे उत्तन येथील देव तलाव व उत्तन पाली ते नवीखाडी पर्यंत येथे जो नाला आहे त्या नाल्याचा पाण्याच्या प्रवाहाचा निचरा देखील उत्तन येथील खाडी तसेच शहरात सर्व नाले मार्फतच होत आहे. सदर वर नमुद खाडयांमध्ये तिवरांची व इतर झाडे असल्याने पाण्याच्या प्रवाहास व पाणी वाहून जाण्यास व खाडया सफाई करण्यास अडथळा निर्माण होत आहे. सदर झाडांमुळे खाड्या अरुंद होत चाललेल्या आहेत.

तरी सदर खाडयामधील पाण्याचा प्रवाह सुरळीत होणेसाठी प्रवाहामध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या तिवरांची व इतर झाडे काढण्यासाठी शासनाची मान्यता घेवून झाडे काढण्याची कामे करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम एक सूचना आहे. १७५ विषयामध्ये फक्त मुर्धा, राई आणि मोर्वा या खाड्यांमध्ये जे तिवरांचे आहे त्याच्यामध्ये जैसलपार्क खाडीकडून जो पुढे पूर्ण प्रवाह आहे त्या साईडची देखील तिवरांचे विचार करण्यात यावे.

आसिफ शेख :-

महापौर मॅडम, तिवरांची झाडे काढायची म्हणजे रस्त्यात जे बाधित होतात जुनी झाडं तसा प्रकार आहे का तो. सुप्रिम कोर्टाचे पुन्हा हायकोर्टाचे शासनाचे निर्देश आहेत.

(सभागृहात गोंधळ)

नरेंद्र मेहता :-

तिवरांची ज्या रस्त्यामध्ये नाले ज्या ठिकाणी आहेत ज्या ठिकाणी नाल्यांची रुंदी कमी होत चालली आहे. तेथे तिवरांच्या झाडांची वाढ होत चालली आहे. आणि जे जे नाले पहिल्यापासून पूर्वीपासून आहेत त्या नाल्यांचा आम्ही उल्लेख केला आहे. शहराची आम्ही फक्त नाले सांगितले तिवरांची झाडे................

भगवती शर्मा :-

फक्त नालेच करणार आहेत तुम्ही.

नरेंद्र मेहता :-

नालेच म्हटलं. दुसरे मॅडम सरकारने किंवा कोर्टाने ज्या वेळोवेळी गरजा बघून परवानग्या दिल्या आहेत मग एखादा आपला जो नायगावपासून रस्ता असू द्या, फ्लाय ओव्हर बांधायचा विषय असू द्या किंवा

मुर्धा राईचे ब्रीज बांधायचे विषय असू द्या किंवा इतर असू द्या शासनाने वेळोवेळी गरजेप्रमाणे किंवा इतर हायकोर्टाने पण अनेकदा मग नवी मुंबईचे हायकोर्ट काय असू दे तिवरांची झाडे काढण्याला परवानगी मागण्यासाठी आपण पाठवतो दिली तर शहराचे भलेच होईल नाही दिली तर काय करु शकतो.

भगवती शर्मा :-

नही नही वो भी नाले के अंदर में जो भी नाले के अंदर बाकी आप रस्ता वगैरे कही पे बोलेंगे वो नही होना चाहिए।

निलम ढवण :-

भगवतीजी नाल्यामधूनच त्या तिवरांच्या बिया पास होतात आणि पूर्ण आरक्षणाचे असु दे कुठे ........

जुबेर इनामदार :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ तील परिशिष्ट ''ड'' प्रकरण २ मधील तरतुदीनुसार मा. सभेचे कामकाज सभागृहात चालते. प्रशासनाकडून धोरणात्मक व प्रशासकीय मंजुरीचे प्रस्ताव मंजुरीसाठी मा. सभेपुढे सादर केले जातात. मनपा नगरसचिव कार्यालयाने दि. १७/०२/२०१६ रोजी मा. विशेष महासभेबाबत सुचना क्र. १० काढलेली आहे. त्यामध्ये प्रकरण क्र. १७५ बाबत प्रशासनाची गोषवारा देण्यात आलेली नाही. आम्ही मा. आयुक्त, मिभामनपा यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र. मनपा/आयुक्त/१९१/२०१५ दि. ०१/०९/२०१५ बाबत सभागृहातील सर्व पालिका सदस्यांचे लक्ष वेधू इच्छितो की, उपरोक्त परिपत्रक सुस्पष्ट असतानाही नगरसचिव कार्यालयाने आयुक्तांचे स्वाक्षरीचे गोषवारा विषयपत्रिकेबरोबर दिलेला नाही ही बाब अत्यंत गंभीर आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २(ड) अन्वये महासभा विशेष कारणासाठी विशेष सभा बोलावली असावी परंतु मा. आयुक्तांच्या परिपत्रकाची तंतोतंत व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांची व्यक्तीशः राहिल असे निर्देश लेखी स्वरुपात असातानाही त्याचे पालन करण्यात आलेले नाही. तरी परिपत्रक, सभाशास्त्र नियम इ. अन्वये आपण सविस्तर गोषवारासह विषय/प्रकरण पुढील मा. महासभेत योग्य निर्णयाकरीता सादर करावे ही नम्र विनंती असे आम्ही ठराव मांडत आहे.

सुहास रकवी :-

माझे अनुमोदन आहे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७५ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक श्री. नरेंद्र मेहता, अनुमोदन श्री. प्रशांत केळुसकर, दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. सुहास रकवी. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. सूचक श्री. जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. नरेंद्र मेहता यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

निलम ढवण :-

महापौर मॅडम आयुक्त साहेब खरोखर पुढच्या वेळी कटाक्षाने कृपया काळजी घ्या की प्रत्येक वेळी जेव्हा विषयपत्रिकेवर विषय असतात त्यावेळी काही विषयांची माहिती आम्हाला देखील नसते. त्याच्यामुळे प्रत्येक सदस्यांना माहिती कळण्यासाठी प्रत्येक विषयाचा गोषवारा जर दिला तर असे वाद आणि अशी प्रदर्शने होणार नाही. याची काळजी आपण घ्यावी अशी मी आपणा सर्वांना विनंती करते.

मा. महापौर :-

सुचक श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३८, विरोधात २० इतकी मते पडली आहेत. श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. १७५ :-

मुर्धा, राई व मोर्वा येथील खाड्यांमधील पाण्याचा प्रवाह सुरळीत करणेकरीता खाडीतील प्रवाहामधील तिवरांची व इतर झाडे काढणेबाबत शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. १३७ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुर्धा, राई, मोर्वा, कनकिया, घोडबंदर या भागात खाडया आहेत तसेच मिरारोड (पूर्व) येथे जाफरी खाडी देखील आहे. त्याचप्रमाणे उत्तन येथील देव तलाव व उत्तन पाली ते नवीखाडी पर्यंत येथे जो नाला आहे त्या नाल्याचा पाण्याच्या प्रवाहाचा निचरा देखील उत्तन येथील खाडी तसेच शहरात सर्व नाले मार्फतच होत आहे. सदर वर नमुद खाडयांमध्ये तिवरांची व इतर झाडे असल्याने पाण्याच्या प्रवाहास व पाणी वाहून जाण्यास व खाडया सफाई करण्यास अडथळा निर्माण होत आहे. सदर झाडांमुळे खाड्या अरुंद होत चाललेल्या आहेत.

तरी सदर खाडयामधील पाण्याचा प्रवाह सुरळीत होणेसाठी प्रवाहामध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या तिवरांची व इतर झाडे काढण्यासाठी शासनाची मान्यता घेवून झाडे काढण्याची कामे करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्री. प्रशांत केळूसकर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसैन | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टीफन फॅरो | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ५ | मिरादेवी रामलाल यादव | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | अरोरा दिपीका पंकज | १० | वंदना रामदास चक्रे | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | अनिता जयवंत पाटील | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | इनामदार जुबेर | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | शेख अशरफ मोहम्मद | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १६ | सुजाता रविकांत शिंदे | १६ | सामंत प्रमोद जयराम | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | रकवी सुहास माधवराव | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | डॉ. आसिफ शेख | |
| २१ | कासोदरीया अश्विन | | | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | | | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | तारा विनायक घरत | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटीयन | | | |
| २८ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| २९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३० | हरिश्चंद्र आमगावकर | | | |
| ३१ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३२ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३३ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३४ | भोईर राजु यशवंत | | | |
| ३५ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३६ | मुन्ना सिंग | | | |
| ३७ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३८ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | | |

ठराव बहुमताने मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७६, दि. २४ फेब्रुवारी २०१५ च्या महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार कंत्राटी सफाई कामगारांना पुन:निर्धारीत केलेले किमान वेतन लागु करणे व फरकाची रक्कम देणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम हा विषय गंभीर आहे आणि आर्थिकदृष्ट्या खूप मोठा विषय आहे. कर्मचारी, कामगार, सफाई कामगार, इतर कामगार यांना किमान वेतन मिळावे यासाठी शासनाचे निर्देश आणि निर्णय

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये साफसफाई करणारे कर्मचारी साधारण १३००-१४०० जे कर्मचारी आहेत १६०० त्यांनी मधल्या काळात संप पुकारला होता. हे संप या अगोदर पण ५-४ वर्षांपूर्वी व्हायचे त्यावेळी महापौर मॅडम मिरा भाईंदर महानगरपालिकेने निर्णय घेतला त्यावेळी आपण गाड्या भाड्याने घ्यायचे. कर्मचारी आपण कॉन्ट्रॅक्ट ठेका पध्दतीने घ्यायचे किती कर्मचारी पाहिजेत, किमान वेतन त्यानंतर तुमचे काही झाले तर स्ट्राईक करायचे, त्यानंतर महानगरपालिकेने निर्णय घेतले की सगळे एकदम पॅकेजच करायचे. १० गाड्या एवढी माणसे एवढ लमसम बोला काय आणि त्या अनुषंगाने हे टेंडर मागवले गेले. हे कर्मचारी ज्या लोकांनी संप केला होता हे महानगरपालिकेचे कर्मचारी नाही त्यांना किमान वेतन मिळावे यासाठी आम्ही ही सहमत आहोत. आमची मंजुरी आहे पण कोणी द्यावे आम्ही द्यावे की ज्या ठेकेदाराने काम करतात त्यांनी द्यावे. आपल्याकडे मागणी करायचा अधिकार कुणाचा आहे त्या ठेकेदाराचा. ठेकेदाराकडे जे काही अटीशर्ती ॲग्रीमेंटचे करारनामे असतील जे काही आपण निविदा मंजूर केल्या असतील त्या अनुषंगाने त्यांनी निगोशिएट केले पाहिजे. इकडे काय होते ठेकेदार घरी बसलेला असतो. कर्मचारी साफसफाई कामगार रस्त्यावर उतरतात. आंदोलन करतात आणि आपण निगोशिएट करतो आमच कामच नाही ना तो त्या ठेकेदाराचे काम आहे त्यांचे निगोशिएट करणे. तुमच्याकडे पुटअप करणे आणियोग्य वेळी योग्य निर्णय झाला पाहिजे. एकतर हे ब्लॅकमेलिंग करतात मग आम्हाला सांगा आम्हाला किमान वेतन ठेकेदाराला १० टक्के वाढ द्यायची. हे सगळ आम्ही का देतो १० टक्के त्याने कमवावे कारण त्याने या सगळ्या जबाबदाया घ्याव्या. सगळ त्यांनी बघावे परंतु इकडे तस नाहीच आहे. आता उदाहरण सांगतो. साधारण खर्च आपला वर्षाला ४० कोटी आहे. समजा तो ४४ झाला. ठेकेदार बोलेल की आता ४४ झाला माझे १० टक्के पण वाढले पाहिजे. त्या रेशिओने आम्ही ठेकेदारच यासाठी अपॉईंट केला होता की हे सगळ डोकेदुखी होते आम्हाला ४ वर्षांपूर्वी की कर्मचारी नेहमी संप करायचे. मधल्या काळात इलेक्शनच्या वेळीच त्यांनी आंदोलन पुकारले होते. आणि त्यांनाही माहित आहे नक्की सण असला किंवा एखादा सुट्टीचा दिवस असला ते आंदोलन करतात आणि नंतर शेवटी आपल्याला शहराला वेठीस धरुन कुठेतरी एक पाऊल पुढे घ्यायला निर्णय घ्यावे लागते. तुम्ही जे काही आश्वासन दिले असेल त्यांना की आम्ही सभागृहात चर्चा करुन देऊ पण ही जबाबदारी कुणाची यामध्ये गोषवायामध्ये काही उल्लेख नाही. की ठेकेदार कुठल्या कलमाखाली आपण द्यायच काय द्यायच किती खर्च पडणार आहे काय भार पडणार आहे. मग मला सांगा फक्त या सफाई कामगाराला लागू होईल का? मग इतर आपल्याकडे ठेका पध्दतीने काम करतात त्यांनाही हे लागू होईल का? नाही लागू होणार याच्यातली काही माहिती नाही ना हे १५ जे आहेत कामगार हे खाली रस्त्यावर झाडू मारतात. त्यांच्यामध्ये मुकादम असतील त्यांना मिनिमम वेजेस लागू नाही का त्यांचे सुपरव्हायजर असतील त्यांना मिनिमम वेजेस लागू नाही का ते पण त्या ठेकेदाराचे कर्मचारी हे पण त्या ठेकेदाराचे कर्मचारी आपण त्यांना देत आहोत ती जबाबदारी मग कोणाची उदा. आपण ड्रायव्हर भाड्याने घेतले, कन्डक्टर भाड्यावर घेतले, वृक्ष प्राधिकरणला मोठ्या प्रमाणावर आपल्याकडे संख्या आहेत मग यांना किमान वेतन कुणी द्यायचे. जे डायरेक्ट कर्मचारी आपण घेतले आहेत त्यामध्ये आपण जबाबदार आहोत. पण ज्या ठेकेदाराच्या माध्यमातून आहेत ते ठेकेदाराने त्यांना बघायचे आहे. आणि ठेकेदाराने तुमच्याबरोबर निगोशिएट केले पाहिजे ॲज पर द ॲग्रीमेंट किंवा क्लॉज किंवा आमची जी टेंडर प्रोसेस झाली असेल त्या टेंडरच्या कायदा कलमाप्रमाणे पण इकडे तस नाहीच आहे. डायरेक्टली शासनाने हा निर्णय पण हा निर्णय तुमच्यासाठी घेतला आहे. त्या महानगरपालिकेने थोडी काय घेतले जे महानगरपालिकेचे कर्मचारी असतील महानगरपालिका बघतील किंवा महानगरपालिकेने ठेका पध्दतीने घेतले. महानगरपालिका बघतील पण तुम्ही घेतलेले आम्ही का बघावे. मग याचा निर्णय काय? माझी सभागृहाला ही विनंती आहे ह्यामध्ये कुठेही स्पष्ट होत नाही त्यांना किमान वेतन मिळावे या मताशी आम्ही सहमत आहोत त्या ठेकेदाराने तरी दिले पाहिजे. पण नक्की काय वाढ होणार आहे किती वाढ होणार आहे. किती करोड आणि करोडोमध्ये फिगर जाणार आहे ही काय २-३ लाखाची बाब नाही.

सुहास रकवी :-

महापौर मॅडम या विषयावर मी बोलतो. आमदार साहेबांनी चांगली सूचना केली की हे कोणी द्यायचं हा फक्त वाद राहील त्याच्यामध्ये. आपल्याला तो करारनामा काय आहे. त्याच्या अटीशर्ती काय आहेत ते तपासून घ्यायला लागतील कारण केंद्र सरकारचे नविन धोरण आले किमान वेतन कायदा मिनिमम वेजेस आहेत. त्यानुसार मधल्या काळात त्यांनी ३ दिवस संप केला आहे. २ दिवस तर बंद होतो. या सगळ्या भानगडीत काय जर आपण भूमिका घेतली की द्यायचच नाही किंवा देणार नाही त्याच्यामध्ये त्यांनी स्ट्राईक केला तर नाहक तो त्रास या जनतेला होणार आहे. त्याची तुम्ही ॲग्रीमेंट कॉपी तपासा त्याच्यामध्ये काय आहे कॉन्ट्रॅक्टरने किती द्यायच पालिकेने किती द्यायचं आणि त्याचा लाभ तो कामगारांना निश्चितपणे झाला पाहिजे. या मताचे आम्ही सुध्दा आहोत. कारण मिनिमम वेजेस ॲक्ट केंद्र सरकारचे नविन धोरण आहे आता आलं. दर ६ महिन्यांनी मिनिमम वेजेस ॲक्टमध्ये वाढत असतो. पण केंद्राने नविन त्यांची जी वाढ झालेली आहे त्या वाढीनुसार त्यांना ते देयक देणे आपल्याला ते बंधनकारक आहे. फक्त द्यायचे कोणी हा जो प्रश्न आहे. तो त्या करारनाम्यातल्या अटीशर्ती आता पानपट्टे साहेबांकडून त्यांनी बघून त्याच्यावर चर्चा करुन आता त्याचा सुध्दा गोषवारा आमच्याकडे, माझ्याकडे तर आलाच नाही. त्यानुसार आपण त्यावर धोरण ठरवायचे आहे. कारण उद्या काय होईल आपण देणार नाही म्हटल्यानंतर हे कामगार लगेच संप करतात. ३-३ दिवस कचरा उचलला जात नाही आता ठिक आहे. पावसाळ्यात तर आणखीनच प्रॉब्लेम होतो

एकतर गाड्या खाली होत नसतात. सोसायटीवाले म्हणतात कचरे का डब्बा कौन उठानेवाला है। कामगारांना सांगितल तर ते श्रमजीविकावाले ते येतात स्ट्राईक करतात काहीच सांगत नाही. कोणाशी संपर्क साधायचा याच्यावर पानपट्टे साहेब तुम्ही त्या करारनामाच्या अटिशर्ती बघा अशी आमची सूचना आहे. आणि त्याप्रमाणे त्यावर कारवाई करा.

नरेंद्र मेहता :-

पानपट्टे साहेब ठणकुन सांगा आणि असच मोघम काही सांगू नका. करोडो रुपयेचा हा विषय आहे मॅडम. आणि परत आपण त्या करारनाम्यावर अटीशर्ती असेल बघा त्याचे प्लस मायनस. आताच सांगितले ३-३ दिवस कचरा उचलत नाही आपल्याला विचारलं त्या दिवशी संप होता किती तुम्ही त्यांच्या पैशाची कटौती केली. किती कर्मचायांची किती दिवस बंद होता आणि त्यानंतर तो कचरा अजून ४ दिवस उचलला गेला नाही त्यांच काय?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ज्या दिवशी बंद आहे त्या दिवशी फाईन लावतो ना साहेब.

नरेंद्र मेहता :-

मग मला सांगा दुसया दिवशी कचरा रस्त्यावर असतो. तुमच्या ॲग्रीमेंटवर तोही क्लॉज आहे. शहर स्वच्छ असलं पाहिजे ज्या ठिकाणी कचरा दिसेल त्या ठिकाणी त्याला दंडात्मक कारवाई केली पाहिजे. मग दुसया, चौथ्या, तिसया दिवशी अजून तो कचरा रस्त्यावर येतो मग ते तुम्ही दंडात्मक कारवाई केला का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

नाही आता त्याचं बिल द्यायचे आहे ना. दंडात्मक कारवाई करणार ना साहेब.

नरेंद्र मेहता :-

तुम्ही हा विषय आणला ना मिनिमम वेजेसचे मग मला सांगा ना किती दंड लावला तुम्ही. तुमच काय म्हणण आहे त्यांनी संप केला एक दिवसाचा फाईन लावला विषय संपला.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ज्या दिवशी काम नाही करणार त्याच दंड त्याला वसुल करणार ना.

नरेंद्र मेहता :-

आयुक्त साहेब हे तर कधीही आम्हाला वेठिस धरतील आणि हे ठेकेदाराला आम्ही यासाठी अपॉईंट केल आहे की त्याने सगळी जबाबदारी घ्यायची. तो जबाबदारी घ्यायला तयार नसेल तर तुम्ही तो ठेका रद्द करुन नविन मागवावा.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो मध्यंतरी उद्योग ऊर्जा कामगार विभाग यांनी आधी सूचना प्रसिध्द केली आहे. २४/२/१५ ला त्याच्यामध्ये किमान वेतन यापूर्वी २०१० ला ४६०० किमान वेतन होते. तर डायरेक्ट या आधीसूचनेनुसार ११५०० किमान वेतन केलेले आहे. आपल्या ॲग्रीमेन्टमध्ये काय होते त्यानुसार नगरविकासने पुन्हा परिपत्रक काढले त्याच्यामध्ये सुध्दा त्यांनी उल्लेख केला आहे.

नरेंद्र मेहता :-

ॲग्रीमेंटच्या कुठल्या क्लॉजमध्ये आम्ही द्यायचे का त्यांनी ते आम्हाला दाखवा.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ॲग्रीमेंटवर काय आहे साहेब किमान वेतन आपण महानगरपालिकेने त्याला अदा करायचे आहे. किमान वेतन त्यांनी दिलेले आपण पाळायचे ते ठेकेदाराने.

नरेंद्र मेहता :-

आपण पाळायचे, कंट्रोल आपलं असलं पाहिजे. पण ते द्यायचं कोणी.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आपण दिलं तरच तो..................

नरेंद्र मेहता :-

आमचा लमसम ठेका आहे ४० करोड, ५० करोड जे काही असेल ते.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

असा लमसम ठेका नाही साहेब आपल्याकडे.

नरेंद्र मेहता :-

ज्या-ज्यावेळी किमान वेतन मध्ये बदल होईल त्या-त्यावेळी महानगरपालिका फरकाची रक्कम देईल अस तुमच टेंडर क्लॉज ॲग्रीमेन्टमध्ये आहे का?

सुहास रकवी :-

त्याच्यात तुम्ही अस लिहिल आहे का किमान वेतन ज्याप्रमाणे पालिका देईल ते त्यांनी अदा करावी असं आहे का?

मा. उपमहापौर :-

साहेब एका वाक्यात सांगा ना ते वेतन ठेकेदाराने द्यायचे की पालिकेने द्यायचं.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

महानगरपालिकेने दिले तर ठेकेदार देईल ना त्याला पुढे.

नरेंद्र मेहता :-

मी पहिलेच आपल्याला सांगितले ठणकुन सांगा. महापौर मॅडम देखरेख करणे म्हणजे एखादा प्रिन्सीपल एम्प्लॉय आपण आहोत जो कर्मचारी काम करतो त्याला सरकारच्या नियमाप्रमाणे पैसे हे आपलं कंट्रोल असलं पाहिजे. द्यायच कुणी मी का त्यांनी माहित नाही. उदा. मी सांगतो एखादा आपण गाडी घेतली भाडे ३०,००० रु. त्या गाडीचं आणि ड्रायव्हरचे आहे त्या ड्रायव्हरला मिनिमम वेजेस भेटले पाहिजे. कंट्रोल करणे आलं काम आहे पण त्याने उद्या २० मागितल तर ते माझं काम नाही. तो देतो की नाही ते ही माझ काम नाही. त्याला ते बंधनकारक आहे म्हणजे आपलं ॲग्रीमेंटचे क्लॉज आहे. त्यावर नियंत्रण असले पाहिजे तेही क्लॉज आहे. स्पष्ट मत आहे की ज्या-ज्यावेळी शासन, गर्व्हमेंट, कोर्ट एखाद्या अस किमान वेतनमध्ये बदल झाले. माझे त्यावेळी महानगरपालिका फरकाची रक्कम अदा करतील मग ते ठेकेदार त्यांना पे करतील असा तुमचा क्लॉज आहे का.

सुहास रकवी :-

नाही पण ते म्हणतात ना ॲग्रीमेंटमध्ये तस मेन्शन असेल की किमान वेतन जर महानगरपालिकेने दिले तर तो ठेकेदार देईल अस आहे का त्याच्यामध्ये. पालिकेने दिले असेल तर त्याचा तुम्ही उल्लेख करा ना तसा साहेब.

(सभागृहात गोंधळ)

नरेंद्र मेहता :-

ॲग्रीमेंट वाचून घ्यायला नको.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ॲग्रीमेंटमध्ये क्लॉज आहे दरवर्षी १० टक्के ने वाढवायचा.

नरेंद्र मेहता :-

नॅचरल १० टक्के वाढ करायची आहे मग किमान वेतन १० टक्केचा काय संबंध आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

तसाच क्लॉज पण आता बेसिकमध्ये फरक आहे ना साहेब. आधी काय होत बेसिकमध्ये ४६०० होते. डायरेक्ट ११५०० बेसिक झाले ना.

नरेंद्र मेहता :-

साहेब मी काय बोलतो १५ होऊ द्या. माझं एकच स्पष्ट म्हणणं आहे. मी त्याला ठेका दिला त्यावेळी ४० कोटीचे टेंडर आहे. त्यामध्ये १०० गाड्या असतील १५०० माणस असतील, बाकी इतर सामग्री असतील. त्यामध्ये एक रक्कम झाली. तुमच्या ॲग्रीमेंटमध्ये असा क्लॉज आहे का ज्या-ज्यावेळी किमान वेतनमध्ये बदल होईल त्या-त्या वेळी महानगरपालिका फरकाची रक्कम देईल आणि मग ते ठेकेदार देईल असा क्लॉज आहे का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

तसा क्लॉज नाही साहेब पण याच्यामध्ये मिनिमम वेजेस आपण दिले त्या ठेकेदाराला तर तो कम्पलिशन करेल आपली जबाबदारी आहे ना साहेब तरच तो त्याला देईल ना.

नरेंद्र मेहता :-

आता मी दुसया पध्दतीने विचारतो. आपण गाडी भाड्यावर घेतो ३५००० रुपये भाडे आहे. किमान वेतन डबल झालं. त्याला १५००० दिले आम्ही फरक द्यायचा का? मी गाडी भाड्यावर घेतली आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आपण प्रत्येकाचे रेट मंजूर करुन घेतले आहेत. कॉन्ट्रॅक्टरचे, मजुराचे.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय जेव्हा ठेका देण्यात आला तेव्हा याचा क्षेत्र निश्चित झाले शहराचे ५ प्रभागामध्ये ४ प्रभागांमध्ये ठेके वेगवेगळ्या ठेकेदारांना देण्यात आले मात्र क्षेत्र ४ प्रभाग समितीमध्ये निश्चित करण्यांत आले. त्याच्यामध्ये १९०० मजूर पुरवठा हा निश्चित झाला तेव्हा तेही निश्चित झाले की हे शासनाचा नियमच आहे. तुम्हाला किमान वेतनदराप्रमाणेच जे काही तुमच्याकडे कर्मचारी काम करतात त्यांना तुम्हाला द्यायला लागेल. तेव्हा ही तोच विषय उपस्थित झाला होता की याचे प्रिन्सिपल एम्प्लॉय कोण असणार. उद्या काही प्रॉब्लेम निर्माण झाला तर प्रिन्सिपल एम्प्लॉय महानगरपालिकाच आहे. आज शासनाने तुमच्यावरती किमान वेतन दर वाढीचा बोजा टाकलेला जे आपल्याला आर्थिकदृष्ट्या अडचणीचा असेल पण करावा तर आपल्यालाच लागेल नाही केल तरच ते संपावर जातील. २०१५ ला नोटिफिकेशन आलं आपण त्यांना मंजुरी २ जानेवारी २०१६ पासून देणार आहोत. नाही दिली तर परत ते संपावर जातील आणि परत या शहरालाच वेठीस धरतील. ठेकेदाराच ॲग्रीमेन्ट पध्दतीने ठेकेदारांची जबाबदारी आहे का? मग तेव्हा ही किमान वेतन दराची जबाबदारी ठेकेदारांवर देण्यात आली. आज किमान वेतन दर वाढलेले आहे. आणि तो शासनाने वाढवला पालिकेने वाढविला, कर्मचायांनी वाढविला असा विषय नाही. शासनाने वाढवलेले किमान वेतन तुम्हाला इतका एक या कर्मचायांना मिळालाच पाहिजे. त्या धर्तीवर साहेब आपल्याला करावेच लागणार आहे. ते अस फक्त नविन वेळा काढा किंवा ठेकेदार रद्द करा ही भूमिका घेणे हे काही योग्य नाही. ५ वर्षासाठी हा ठेका देण्यात आलेला आहे. त्याचा फरकाची रक्कम जो आहे तो तुम्हाला आपल्याला दिला पाहिजे. नाहीतर या शहरामध्ये उद्या कचयाचा ढिग परत सुरु होईल.

नरेंद्र मेहता :-

पहिली भूमिका आमची स्पष्ट आहे की त्या कर्मचायांना, कामगारांना किमान वेतन प्रमाणे पैसे मिळायलाच पाहिजे हे कन्फम आहे. आता कोणी द्यायचं आम्ही द्यायचं की त्या ठेकेदाराने आपल्याला हे ठरवायचे आहे. मला तेवढच तुम्हाला सांगायच आहे. त्यांना भेटलच पाहिजे आणि नाही द्यायचं असेल तर तुम्हाला भाग पाडावे लागेल. कॉन्ट्रॅक्टरला ॲज पर ॲग्रीमेन्ट दे. तुझे हे कंडीशन आहे आमच्याकडे एक. आता राहिला प्रश्न की उदा. मी तुम्हाला सांगतो हे १६०० कर्मचारी कुणाचे कर्मचारी, त्या गाड्यांवर ड्रायव्हर आहेत ते कुणाचे कर्मचारी. त्या गाड्यांवर क्लिनर आहे ते कुणाचे कर्मचारी त्यांचा प्रिन्सिपल एम्प्लॉय कोण?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

पालिकेचाच ना.

नरेंद्र मेहता :-

मग त्यांना ते लागू होत नाही का किमान वेतन.

संदिप पाटील :-

होते ना.

नरेंद्र मेहता :-

मग ते तुम्ही का नाही दिले. परत मी सांगतो की आपल्या ॲग्रीमेंटमध्ये असेल तर द्यायच आहे. त्या विषयाला लांबवायच काही कारण नाही. ॲग्रीमेंटमध्ये माझ नाही आहे मग त्या ठेकेदारांचे नुकसान भरायचं जिथपर्यंत त्यांच ॲग्रीमेंट क्लॉज आहे तिथपर्यंत आमचं अस स्पष्ट मत आहे त्यामध्ये. ॲग्रीमेंट क्लॉज आम्हाला दाखवा आम्ही फरक द्यायला तयार आहोत ना. आणि मला एक सांगा तो फरकच द्यायचा आहे तर कॉन्ट्रॅक्टरची आम्हाला गरज काय? त्याला १० टक्के द्या मध्ये परत जे सब्जेक्ट कॉन्ट्रॅक्टर आहेत त्यांना १० टक्के द्या, २० टक्के, ३० टक्के द्या. यांना फरक आता बेसिक झाल यांना तर १०००० वाढवा त्याचे २० टक्के यांना पण वाढवून द्या. ते कशाला आम्ही वाढवून द्यायचे.

मा. आयुक्त :-

सन्मा. महापौर मॅडम, ५ वर्षापूर्वी या महानगरपालिकेमध्ये ठेका पध्दतीने सफाई कामगाराचा ठेका देण्यात आलेला आहे. मला वाटते ४ वर्ष त्यांना संपत आलेले आहे. त्यावेळेस किमान वेतन दिले जात होते हे मान्य आहे. बरोबर ना. परंतु आता महाराष्ट्र शासनाचा हा राजपत्र आहे आणि हे झालेले आहे २४/२/२०१५ रोजी आणि किमान दराने या कामगाराला आपण महानगरपालिकेने सफाईचे काम ठेका पध्दतीवर दिले हे सगळ्या सभागृहाला मान्य आहे. किमान दराने आतापर्यंत त्यांना आपण पैसे देत होते हे पण मान्य आहे. आणि त्यानंतर शासनाने हा निर्णय घेतलेला आहे हा शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द झाला असेल म्हणजे कदाचित आपल्या विधानभवनामध्ये हा ठराव आला असेल त्यावेळेस आपण असाल नसाल विषय नाही तो परंतु हा राजपत्र त्याच्यानंतरच निघतो. आणि हा सगळ्या महाराष्ट्रामध्ये साहेब लागू झाला आहे. आणि याच्यामध्ये त्यांनी वर्गीकरण केले आहे. कुशल, अर्धकुशल आणि अकुशल आणि त्यांची वेतनश्रेणी परिमंडल १,२,३ अस केलेले आहे. वेतनश्रेणी १४०००,१२०००,११०००,१३०००,११०००,१००००,११५००,१०००० आणि ८५०० अस वर्गीकरण केलेले आहे. ठाणा, वसई सगळीकडे कम्पलसरी केले आहे. आणि सर नगरविकास विभागाने सुध्दा पत्र दिले आहे. आपल्याला मी सकाळी दाखवलं त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करा अस म्हटलेल आहे. प्रिन्सिपल जबाबदारी या संस्थेसाठी लोक काम करतात जे कामगार काम करतात ते आपल्या महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये काम करतात याच्यामध्ये सगळ नमूद केल आहे सर. अ,ब,क आणि ड वर्ग महानगरपालिकेचे क्षेत्र, छावणी क्षेत्र तसेच महानगरपालिका क्षेत्रापासून २० कि.मी. पर्यंतचे औद्योगिक क्षेत्र म्हणजे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असेल किंवा महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर असले तरी २० कि.मी.च्या फेरिमधल्या जे पण औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करित असतील त्या कामगारांना देखील हे लागू आहे आणि सर हे २४/२/१५ चे शासनाचे धोरण आहे आणि शासनाने याची अंमलबजावणी झाली नाही लवकरात लवकर म्हणून आता नगरविकास विभागाने देखील आपला नविन एक आदेश काढलेला आहे. आता आपण आतापर्यंत किमान वेतन महानगरपालिकेने दिले त्यावेळेस ॲग्रीमेंट झाले असेल १० टक्के त्याला वाढ द्यावी वगैरे आपण जे आता म्हटले ते परंतु आता शासनाने जे मिनिमम याच्यामध्ये सगळे दिलेले आहे की कुणाला किती द्यायचे ते आणि आपण फक्त कामगारांना हे देत आहोत आणि आता पाठिमागचा डिफरन्स म्हणजे शासनाने गॅझेट ज्या दिवशी प्रसिध्द झाले त्या दिवसापासून लगेचच अंमलात आणावे अस याच्यामध्ये म्हटलेले आहे. परंतु शेवटची ओळ वाचतो. सक्षम प्राधिकारी किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेल्या राहणीमान भत्ता जून किंवा डिसेंबर अखेर पर्यंतच्या किंवा एका स्थितीत किंवा किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहिर करिल अस पण म्हटलेले आहे. किमान वेतन दरमहा साप्ताहिक सुट्टीच्यावेतनासह समावेश असेल अस जी.आरमध्ये सगळ्या गोष्टी नमूद करुन दिल्या आहेत. आतापर्यंत किमान वेतन महानगरपालिकेनेच दिले आहे. महानगरपालिकेने दिले म्हणजे महानगरपालिकेने ठेकेदाराला दिले आणि ठेकेदाराने त्याला दिले. आणि डायरेक्ट त्याच्या अकाऊंटवर पैसे जमा होणार आहेत. त्याच्यामुळे मध्ये कोणी बोगस बाजी करणार वगैरे हा काही विषय नाही. म्हणून विनंती आहे की प्रशासनाचा विषय आहे हा सर्वानुमते विषय मंजूर व्हावा अशी विनंती आहे.

निलम ढवण :-

आयुक्त साहेब एक माहिती पाहिजे होती किमान वेतन कायदा हा सर्वच कामगारांना लागू होतो ना. फक्त साफसफाई नाही ना.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

नाही. नाही.

निलम ढवण :-

या संदर्भात मॅडम माझी एक सूचना आहे. जस सफाई कामगारसाठी लागू करता त्याचप्रमाणे ठेकेदारांमार्फत जे ऑपरेटर वगैरे आहेत त्यांच्यासाठी देखील हा किमान वेतन कायदा लागू करण्यात यावा अशी मी सूचना मांडते.

प्रशांत केळुसकर :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार महाराष्ट्र शासन उद्योग व ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था या अधिसूचित रोजगाराचे पुन:निर्धारित केलेले किमान वेतन व महागाई भत्ता देण्याबाबत राज्य शासनाने दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी अधिसूचना जारी केली आहे.

नगरविकास विभागाने दि. २२ जानेवारी, २०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या अनुसूचित रोजगारातील कामगारांना किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. किवेअ २०१४/५१०/प्र.क्र.१५०/ कामगार-७, दि. २४/०२/२०१५ अन्वये पुन:निर्धारीत केले आहेत. सदर अधिसूचनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाने पुन:निर्धारीत केलेल्या किमान वेतन व महागाई भत्त्यात वाढ केल्याप्रमाणे किमान वेतन मिळण्यासाठी श्रमजीवी वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार रयत संघटना व मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी सुध्दा किमान वेतन व इतर भत्ते मिळणेबाबत मागणी केली आहे.

मनपा.च्या सार्व.आरोग्य विभागात १५९९ कंत्राटी सफाई कामगार कार्यरत आहेत. माहे जानेवारी २०१६ मध्ये महापालिकेमार्फत देण्यात आलेले वेतन व शासनाने पुर्न:निर्धारित केलेले किमान वेतन द्यावे. त्याचप्रमाणे माहे फेब्रुवारी २०१६ पासुन उपरोक्त शासन निर्णयानुसार किमान वेतन देणे करीता निर्णयाबाबत मा. आयुक्त, मा. महपौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी. सदर समितीमध्ये १) महापौर २) उपमहापौर ३) सभापती, स्थायी समिती ४) सभागृह नेता अशी सदस्यांची समिती गठित करावी. सदर समितीने महानगरपालिकेने मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांच्या समवेत केलेल्या करारनामा यांची तपासणी करून दि.२४/०२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार कंत्राटी सफाई कामगारांना पुर्न:निर्धारीत केलेल्या दरानुसार वेतन देणेबाबत सात दिवसात निर्णय घ्यावा. तसेच सदरचा निर्णय हा मा. महासभेचा निर्णय आहे, असे समजण्यात यावे. यास ही सभा मान्यता देत आहे.

शरद पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

प्रमोद सामंत :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार महाराष्ट्र शासन उद्योग व ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था या अधिसूचित रोजगाराचे पुन:निर्धारित केलेले किमान वेतन व महागाई भत्ता देण्याबाबत राज्य शासनाने दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी अधिसूचना जारी केली आहे. नगरविकास विभागाने दि. २२ जानेवारी, २०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या अनुसूचित रोजगारातील कामगारांना किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. किवेअ २०१४/५१०/प्र.क्र.१५०/ कामगार-७, दि. २४/०२/२०१५ अन्वये पुन:निर्धारीत केले आहेत. सदर अधिसूचनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत कळविले आहे. महाराष्ट्र शासनाने पुन:निर्धारीत केलेल्या किमान वेतन व महागाई भत्त्यात वाढ केल्याप्रमाणे किमान वेतन मिळण्यासाठी श्रमजीवी वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार रयत संघटना व मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी सुध्दा किमान वेतन व इतर भत्ते मिळणेबाबत मागणी केली आहे. महानगरपालिका घ्द्वत्दड़त्द्रड्ढथ् क्ष्द्रथ्दृन्ड्ढद्ध म्हणून किमान वेतन देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. मनपा.च्या सार्व.आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या १५९९ कंत्राटी सफाई कामगारसह सर्व विभागातील कंत्राटी मजुरांना कामगारांना माहे जानेवारी २०१६ मध्ये महापालिकेमार्फत देण्यात आलेले वेतन व शासनाने पुर्न:निर्धारित केलेले किमान वेतन, महागाई भत्ता, इमर देय भत्ते यामधील फरकाची रक्कम त्याचप्रमाणे माहे फेब्रुवारी २०१६ पासुन उपरोक्त शासन निर्णयानुसार किमान वेतन देणेस ही सभा मान्यता देत आहे. सदर कामी सन २०१५-१६ या अंदाजपत्रकातील वॉर्ड सफाई/नाले सफाई या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेली तरतुद कमी आहे. या करीता महानगरपालिकेच्या अन्य विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखाशिर्षाखाली असलेली अखर्चीत रक्कम पुर्नविनियोजन करुन सार्व. आरोग्य विभागच्या सफाई/नाले सफाई या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

अशरफ शेख :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

साहेब त्याच अस मत आहे. समिती गठीत करा. समितीने निर्णय घ्यायचा तो महासभेचा निर्णय असेल असं होत का.

भगवती शर्मा :-

तुम्हाला मान्य आहे का?

मा. आयुक्त :-

बघा सगळ्या सभागृहाने ठरवलं तर होऊ शकते.

भगवती शर्मा :-

आम्ही देतो ना मंजुरी.

जुबेर इनामदार :-

आम्ही तुम्हाला डायरेक्ट मंजुरी देतो ना.

भगवती शर्मा :-

गर्व्हमेंटचा एकदा जी.आर. झाल्यानंतर..............

मा. आयुक्त :-

एखाद्या विषयावर निर्णय घेण्यासाठी मा. महासभेला तो अधिकार आहे. यामध्ये मा. महासभा असा निर्णय घेऊ शकते. महापौरांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करुन याच्यामध्ये तुमचे सदस्य महासभा ठरवेल ते सदस्यांनी मिळून ७ दिवसांच्या आत निर्णय घ्यावा.

जुबेर इनामदार :-

निर्णय घेऊन महासभेसमोर सादर करावा.

मा. आयुक्त :-

समितीने निर्णय घेतलेला त्यामध्ये असा अधिकार आहे की त्या समितीने घेतलेला निर्णय हा महासभेचा निर्णय असेल.

जुबेर इनामदार :-

साहेब आम्ही प्रशासनाच्या बाजुने ठराव केला आहे म्हणजे तुम्हाला उद्या शासनाकडे दाद मागायची असेल तर तुम्हाला सगळ सोयीस्कर होईल.

प्रभात पाटील :-

मला एका प्रश्नाच उत्तर हव आहे की आता हे कुशल, अकुशल किंवा ठेका पध्दतीने जे कामगार आपल्याकडे आहेत त्यांच्या बाबतीत हा निर्णय आहे की त्यांना किमान वेतन कायद्यानुसार पगार मिळायला पाहिजे. मग आपला ठेका जो आहे तो पाणी पुरवठा विभागात आहे, संगणक विभागात आहे. बरेच ठिकाणी ठेके आहेत त्यांच काय करणार आहात आणि त्यांचे जर तुम्ही करणार असाल तर मग गेली १२ वर्षे संगणक विभागामध्ये तुमच्या मानधनावर नोकरी करणारे लोक १२-१५ वर्षापासून त्यांना पण घ्या ना ते वर्षानुवर्षे रखडतात तुमच्या साडे नऊ हजारावर सगळ्यांना घ्या. माझी विनंती आहे सगळ्यांना घ्या. सगळे विभाग घ्या संगणक विभाग तर पहिले घ्या ते १२ वर्षापासून रखडतात.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो कामगारांसाठी तो जी.आर आहे. बाकी पे रोलवर आहेत आपले.

प्रभात पाटील :-

मला मान्य आहे त्यांच्याबद्दल माझ दुमत नाही. तो ठराव झाला आहे तो त्यांचा पारित होऊ द्या. आमचा पारित होऊ द्या. माझ म्हणण नाही. पण कायदा सफाई कामगारांसाठीच आहे का ठेकेवर असणाऱ्या सगळ्या लोकांसाठी आहे. माझा तो मुद्दा आहे. नियमाप्रमाणे सगळ्यांना व्हायला पाहिजे.

प्रेमनाथ पाटील :-

उपायुक्त साहेब हे कामगार नाही का संगणक चालक.

प्रशांत केळुसकर :-

आयुक्त साहेब आपल्या त्या प्रकरणामध्ये किमान वेतनचे दावे देखील प्रलंबित आहेत. ते पण निकाली काढावे लागतील.

आसिफ शेख :-

तुम्ही तुमच्या डिपार्टमेंटसाठी विषय आणला का महानगरपालिका महासभा काय सार्व. आरोग्यासाठी घेतली का ही सभा.

प्रभात पाटील :-

बाकी विभाग सुध्दा तेवढेच इम्पोंटन्ट आहेत किमान वेतन सगळ्यांना मिळायला पाहिजे मग तो कुठल्याही ठेक्यात असू दे.

मा. आयुक्त :-

मॅडम आपल्याला मी महाराष्ट्र शासनाचा राजपत्र आता या सभागृहात दाखवलं आहे. त्याच्यामध्ये कामगारांसाठी किमान वेतन आणि त्या कामगारामध्ये कुशल, अकुशल आणि अर्धकुशल अशा ३ व्याख्या

केल्या आहेत आणि ती व्याख्या केल्यानंतर नगरविकास विभागाचा देखील आपल्याला या आदेशाची अंमलबजावणी करावी म्हणून परिपत्रक आलेले आहे आणि हे कामगारांसाठी फक्त लागू आहे हे पानपट्टे साहेबांनी आपल्याला अगोदर सांगितले आहे. आपल्या भावनेशी मी सहमत आहे. पण शासनाकडून जो काही निर्णय आला त्याची अंमलबजावणी करणे आणि महासभेपुढे हा विषय आणणे ही माझी नैतिक व वैयक्तिक जबाबदारी आहे. म्हणून हा विषय आपल्यासमोर आणलेला आहे. ती आपण सूचना मांडली पण त्याच्यामध्ये हा ठराव पारित करुन त्यांना भेटणार नाही. फक्त कामगारांसाठी आहे. अशासकीय ठराव पारित केला तरी त्याची अंमलबजावणी करायची की नाही हा आमचा प्रश्न आहे. तुम्ही काहीही ठराव पारित केला तरी आम्ही जो काही शासनाचा निर्णय असेल त्याप्रमाणे करणार.

प्रभात पाटील :-

माझा प्रश्नच तसा होता ते पण तुमच्यासाठी कामगार आहेत ना. तुम्ही ठेक्याने का होईना कामगार म्हणूनच घेतल आहे. कामगार म्हणूनच आहे ते काय तुमच्याकडे झाडू मारत नाही ते तुमचे कामगारच आहे.

मा. आयुक्त :-

बघा मॅडम, कर्मचारी, अधिकारी, कामगार सफाई कामगार याच्यामध्ये डिफरन्सशिएट आहे. आणि ती व्याख्या केली आहे. शासनाचा जी.आर. आपल्या हातात आहे. त्याच्यामध्ये कुशल, अकुशल, अर्धकुशल लिहीलेले आहे. त्याचा विपर्यास आपण करु नये कृपया.

प्रभात पाटील :-

सर मी तेच बोलते ते पण कामगार आहेत याच्यामध्ये म्हटल नाही की ते सफाई कामगार याच्यामध्ये कुठेही म्हटल नाही. कामगार म्हटलं आहे. कंत्राटी कामगार म्हटल आहे. आपण निट वाचले असेलच मी म्हणत नाही पण मी परत नीट वाचलं आहे. याच्यात कंत्राटी कामगार असच म्हटल आहे. संगणकचालक त्यात बसतात.

आसिफ शेख :-

सन्मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेबांनी या ठिकाणी खुलासा केला आहे जो जी.आर शासनाचा वाचून दाखवला आहे त्या जी.आरच्या अनुषंगाने किमान वेतन सल्लागार मंडळाचा अध्यक्ष मी होतो. तर आमच्या मंडळाच्यामार्फत तो निर्णय घेतला जातो. मिनिमम वेज द्यायची जबाबदारी ही संपूर्ण प्रिन्सिपल एम्प्लायरची असते आणि दर ५ वर्षांनी त्या किमान वेतनाचे दर पुर्निर्धारित करण्याचीच तरतूद कायद्यात आहे. आयुक्त महोदयांनी जो आता जी.आर. वाचला कुशल, अकुशल, अर्धकुशल या तिन्ही क्लासच्या कर्मचायांना मग त्यात वर्गीकरण करण्यांत आले. अ,ब,क अ वर्ग म्हणजे काय की महानगरपालिका क्षेत्र, ब वर्ग काय नगरपरिषद आणि क वर्ग काम................

(सभागृहात गोंधळ)

आसिफ शेख :-

आयुक्त साहेब चुकीची माहिती देतात. मॅडम बोलतात ते अत्यंत योग्य आहे. आपण हा जो विषय आणला आरोग्याचा कंत्राटी कामगार फक्त आरोग्याचे नाही. कंत्राटी कर्मचारी हे इतर विभागातील पण आहे. वृक्ष प्राधिकरणाचे असो किंवा तुमच्या ठेके पध्दतीने काम करणारे असो सगळ्यांनाच तो लागू करण्यात यावा. महानगरपालिकेचे इतरही विभाग आहेत त्या ठिकाणचे कंत्राटी कामगार आहेत. मजूर आहेत त्यांनाही द्यायला पाहिजे. शासनाने असं म्हटलं आहे का त्या जी.आरमध्ये की फक्त आरोग्याच्या कंत्राटी कामगारांना मिळणार म्हणून आम्हाला माहिती आहे आम्ही निर्णय घेतलेला आहे तो. मिनिमम ॲडव्हायझरी बोर्ड म्हणून आणि आम्ही निर्णय घेतल्यानंतर शासनाचा राजपत्र प्रसिध्द होतो. त्यानंतर त्याची अंमलबजावणी केली जाते. हा विषय जो आहे प्रशासनाने संपूर्ण आपल्या महानगरपालिकेतील इतर विभागात काम करणाया कंत्राटी कामगारांना मजुरांना ही त्याचा लाभ द्यायला पाहिजे नुसते आरोग्य विभागाला मिळून चालणार नाही. तसा ठराव केला आहे तुम्ही कमिटी गठीत करण्याचा. कमिटी गठित करायचे म्हणजे काय करायचे आहे ते ठेकेदाराला बोलवायचे काय करतो बोल तस चालणार नाही. मिनिमम प्रिन्सिपल एम्प्लॉयर म्हणून जबाबदारी जी आहे ती महानगरपालिकेची आहे. महानगरपालिकेने जर दिले तरच ते घेऊ शकतात अशी कायद्यात स्पष्ट तरतूद आहे.

प्रभात पाटील :-

महापौर मॅडम, जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावात माझी सूचना नमूद करायची मी सूचना लिहून देते.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७६ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक श्री. प्रशांत केळुसकर, दुसरा ठराव सुचक श्री. प्रमोद सामंत. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. सूचनेसहित सूचक श्री. प्रमोद सामंत यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. प्रशांत केळुसकर यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सूचक श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३७, विरोधात २१ इतकी मते पडली आहेत. सूचक श्री. प्रशांत केळूसकर यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

निलम ढवण :-

साफसफाई कामगारांपैकी मॅडम मागच्या ३० तारखेपासून आतापर्यंत ते कामगारांना तिघं जण आहेत. त्यांना कामावर घेतलेले नाही. लोकशाही आहे इथे त्यांनी काही निर्णय घेतल्यामुळे त्यांना कामावरुन कमी करण्यांत आलेले आहे. इतक्या दिवसांचा पगार देखील त्यांचा नाही. त्यांचे घर कसे चालणार. त्या पगारासहित त्यांना हजर करुन घेण्यात यावे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो त्या कर्मचायांना घ्यायला लावतो मागचा पगार वगैरे नाही.

मदनउदित नारायण सिंग :-

ते गरिब लोक आहेत त्यांच घर त्या पगारावरच चालते. ते कामावर यायचे पण त्यांना घ्यायचे नाही. त्यांना महिनाभरचा पगार ही देण्यात यावा. ते यायचे पण त्यांची हजेरी लावायचे नाही ते लोक.

निलम ढवण :-

ते तिथे येऊन जातात रोज हजेरीसाठी येऊन जातात त्यांच्यावर दबाव टाकला जातो त्यांना कामावर घेतले जात नाही. ३० तारखेपासून आजपर्यंत त्याचा पगार मिळणार नसेल तर ते कस करतील.

मदनउदित नारायण सिंग :-

त्यांच घर कस चालणार साहेब.

मा. आयुक्त :-

त्यांना कामावर घेण्यात येईल परंतु ज्या दिवशी काम केले नाही त्या दिवशी...............

मदनउदित नारायण सिंग :-

आयुक्त साहेब तिघे कामगार दररोज कामावर यायचे पण हजेरी त्यांची घ्यायचे नाही.

मा. आयुक्त :-

पानपट्टे साहेबांनी त्यांची खातरजमा करावी आणि त्याप्रमाणे निर्णय घ्यावा.

प्रकरण क्र. १७६ :-

दि. २४ फेब्रुवारी २०१५ च्या महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार कंत्राटी सफाई कामगारांना पुनःनिर्धारीत केलेले किमान वेतन लागु करणे व फरकाची रक्कम देणेबाबत.

ठराव क्र. १३८ :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार महाराष्ट्र शासन उद्योग व ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था या अधिसूचित रोजगाराचे पुनःनिर्धारित केलेले किमान वेतन व महागाई भत्ता देण्याबाबत राज्य शासनाने दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी अधिसूचना जारी केली आहे.

नगरविकास विभागाने दि. २२ जानेवारी, २०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या अनुसूचित रोजगारातील कामगारांना किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. किवेअ २०१४/५१०/प्र.क्र.१५०/ कामगार-७, दि. २४/०२/२०१५ अन्वये पुनःनिर्धारीत केले आहेत. सदर अधिसूचनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाने पुनःनिर्धारीत केलेल्या किमान वेतन व महागाई भत्त्यात वाढ केल्याप्रमाणे किमान वेतन मिळण्यासाठी श्रमजीवी वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार रयत संघटना व मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी सुध्दा किमान वेतन व इतर भत्ते मिळणेबाबत मागणी केली आहे.

मनपा.च्या सार्व.आरोग्य विभागात १५९९ कंत्राटी सफाई कामगार कार्यरत आहेत. माहे जानेवारी २०१६ मध्ये महापालिकेमार्फत देण्यात आलेले वेतन व शासनाने पुर्नःनिर्धारित केलेले किमान वेतन द्यावे. त्याचप्रमाणे माहे फेब्रुवारी २०१६ पासुन उपरोक्त शासन निर्णयानुसार किमान वेतन देणे करीता निर्णयाबाबत मा. आयुक्त, मा. महपौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी. सदर समितीमध्ये १) महापौर २) उपमहापौर ३) सभापती, स्थायी समिती ४) सभागृह नेता अशी सदस्यांची समिती गठित करावी. सदर समितीने महानगरपालिकेने मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांच्या समवेत केलेल्या करारनामा यांची तपासणी करून दि.२४/०२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार कंत्राटी सफाई कामगारांना पुर्नःनिर्धारीत केलेल्या दरानुसार वेतन देणेबाबत सात दिवसात निर्णय घ्यावा. तसेच सदरचा निर्णय हा मा. महासभेचा निर्णय आहे, असे समजण्यात यावे. यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदन :- श्री. शरद पाटील

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. निलम ढवण ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

किमान वेतन कायदा मनपातील सर्व विभागातील ठेकेदरांमार्फत असलेल्या ऑपरेटवर सर्वांना लागु करण्यात यावा अशी सुचना मांडते.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसैन | |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | ग्रिटा स्टीफन फॅरो | |
| ४ | मिरादेवी रामलाल यादव | ४ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ५ | कोठारी सुमन रमेश | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | डॉ. नयना मनोज वसाणी | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | सिमा कमलेश शहा | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ८ | जैन गिता भरत | ८ | पाटील सुनिता कैलास | |
| ९ | अरोरा दिपीका पंकज | ९ | विराणी रेखा अनिल | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | मेहता डिंपल विनोद | ११ | वंदना रामदास चक्रे | |
| १२ | मेघना दिपक रावल | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १३ | इनामदार जुबेर | |
| १४ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १५ | सुजाता रविकांत शिंदे | १५ | शेख अशरफ मोहम्मद | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | सामंत प्रमोद जयराम | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | रकवी सुहास माधवराव | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २० | कासोदरीया अश्विन | २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | डॉ. आसिफ शेख | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २५ | तारा विनायक घरत | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटीयन | | | |
| २७ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| २८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| २९ | हरिश्चंद्र आमगावकर | | | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३१ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३२ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३३ | भोईर राजु यशवंत | | | |
| ३४ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३५ | मुन्ना सिंग | | | |
| ३६ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३७ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | | |

ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७७, ठाणे येथे होणाऱ्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेल्लनासाठी महानगरपालिकेतर्फे निधी देणेबाबत.

प्रशांत दळवी :-

फेब्रुवारी २०१६ मध्ये ''९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेल्लन'' ठाणे येथे संपन्न होणार आहे. सदर नाटय संम्मेलन हे ठाण्याचे वैभव ठरविणारे असल्याने संपूर्ण भारतभरातून मोठया प्रमाणावर नाटककार उपस्थित राहून त्यांचे कला अविष्कार दाखविणार आहेत. या संम्मेलनातून मराठी नाटय प्रकार जनतेसमोर ठेवण्याच्या दृष्टीने नाटय संमेल्लन हे उत्तम व्यासपीठ आहे. सदर नाटय संम्मेलन दोन दिवस चालणार असून या दोन दिवसात मुख्य संमेल्लन, संमेल्लन पूर्व कार्यक्रम, नाटयदिंडी, नाटय विषयक प्रदर्शने, जिल्हयातल्या, राज्यातल्या कलाकारांचे कार्यक्रम तसेच बालरंगभूमी, हौशी रंगभूमी, प्रायोजिक

रंगभूमीसह सर्व घटकांना सामावून होणारे हे संमेल्लन आयोजन करण्यासाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करावा लागणार असल्यामुळे सदर नाटय संमेल्लनासाठी महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करून देणे करिता मा. पालकमंत्री, मा. श्री. एकनाथ शिंदे व मा. आमदार, श्री. प्रताप सरनाईक यांनी संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे.

अर्थसंकल्पिय लेखाशिर्ष नगरभवन व सभागृह मधील ३ वर आर्ट गॅलरी व प्रदर्शने भरविणे अंतर्गत रू. ५ लाखाची तरतुद उपलब्ध आहे. सदर तरतुदीमध्ये अतिरिक्त रु. २० लाखाची तरतुद उपलब्ध करुन ठाणे येथे होणाऱ्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेल्लनासाठी महानगरपालिकेतर्फे रु. २५ लाख इतका निधी देण्यात यावा, असा ठराव मांडत आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

माझे अनुमोदन आहे.

प्रशांत केळुसकर :-

यामध्ये तरतूद ५ लाख आहे तर ५ लाखच करावी.

निलम ढवण :-

प्रशांत ५ लाख करायचे म्हणजे २५ लाखाची आमची मागणी आहे. ५ लाखच का? एवढी मोठी नाट्य परिषद चालु असेल, एवढी मोठी संस्कृती जोपासली जाते. ठाणे जिल्ह्यामध्ये ठाणे जिल्ह्यामध्ये आपण नाही का? नको म्हणजे काय? मराठी संस्कृती जपायला तुमचा विरोध आहे का.

प्रशांत केळुसकर :-

नकोचा विषय नाही आहे आपल्याकडे तरतूद ५ लाखाची आहे.

निलम ढवण :-

तरतूद करा ना. बाकीची पण तरतूद करता ना ही पण तरतूद करा. तरतूद नाही तर तरतूद करुन घ्यावी. तरतूद करुन देऊन त्यांची व्यवस्था करावी.

प्रशांत केळुसकर :-

फेब्रुवारी २०१६ मध्ये "९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेल्लन" ठाणे येथे संपन्न होणार आहे. सदर नाटय संम्मेलन हे ठाण्याचे वैभव ठरविणारे असल्याने संपूर्ण भारतभरातून मोठया प्रमाणावर नाटककार उपस्थित राहून त्यांचे कला अविष्कार दाखविणार आहेत. या संम्मेलनातून मराठी नाटय प्रकार जनतेसमोर ठेवण्याच्या दृष्टीने नाटय संमेल्लन हे उत्तम व्यासपीठ आहे. सदर नाटय संम्मेलन दोन दिवस चालणार असून या दोन दिवसात मुख्य संमेल्लन, संमेल्लन पूर्व कार्यक्रम, नाटयदिंडी, नाटय विषयक प्रदर्शने, जिल्हयातल्या, राज्यातल्या कलाकारांचे कार्यक्रम तसेच बालरंगभूमी, हौशी रंगभूमी, प्रायोजिक रंगभूमीसह सर्व घटकांना सामावून होणारे हे संमेल्लन आयोजन करण्यासाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करावा लागणार असल्यामुळे सदर नाटय संमेल्लनासाठी महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करून देणे करिता मा. पालकमंत्री, मा. श्री. एकनाथ शिंदे व मा. आमदार, श्री. प्रताप सरनाईक यांनी संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे.

अर्थसंकल्पिय लेखाशिर्ष नगरभवन व सभागृह मधील ३ वर आर्ट गॅलरी व प्रदर्शने भरविणे अंतर्गत रू. ५ लाखाची तरतुद उपलब्ध आहे. भारतीय मराठी नाटय संमेल्लनासाठी अनुदान देणे ही बाब धोरणात्मक असल्याने त्यासाठी ही सभा मंजुरी देत आहे

निलम ढवण :-

महाराष्ट्रामध्ये प्रत्येक राज्यामध्ये प्रत्येक मातृभाषेला जास्त महत्व दिले जाते. नाहीतर याच्यापुढे कुठलेही पुर्नवियोजन करताना देखील आमचाही हातभार असेल. मराठी भाषेला मराठी लोकांचाच विरोध असेल तर शेम आहे. ठाणे जिल्हयाचा आहे तर मिरा भाईंदरला ठाणे जिल्हा नाही का? आपला ठाणे जिल्हाच आहे ना जिल्हा नियोजनमध्ये का मागत नाही तुम्ही मिरा भाईंदरसाठी.

प्रभात पाटील :-

महापौर मॅडम वाद झाला आहे तो वाद मिटेलच. कारण तुमचे युतीचे सरकार आहे. सामंजस्यच सरकार आहे. माझा विषय वेगळा आहे की आपण त्या नाट्यसंमेलनाला ५ देतो की २५ देतो आपली निश्चितपणे जबाबदारी आहे कारण या साहित्यीक चळवळी आहे त्या व्हायला पाहिजे, रंगल्या पाहिजे, गाजल्या पाहिजे. संस्कृती पुढे जायला पाहिजे. परंतु मॅडम आपल्या शहराचं काय आपण एक नाट्यगृहाचं उद्‌घाटन केल त्याच काम कुठपर्यंत आलं त्याची माहिती कोण देईल का? आपल्या शहरात का नाट्यगृह होत नाही. कुठे थांबले ते काम? का थांबले ते काम. होणार की नाही माझ्या शहरात व्हायला पाहिजे ना या गोष्टी.

निलम ढवण :-

आणि ठाणे जिल्ह्याच्या महानगरपालिकेने त्या नाट्यसंमेलनाला मदत केली आहे तेवढी. इथे मराठी संस्कृती जपणारे नाही का कोणी हा मराठीचा प्रश्न आहे आणि मराठी नाट्यसंमेलनासाठी तेवढी अमाऊंट आम्हाला मिळायला पाहिजे.

मा. महापौर :-

ठराव मतदानाला घ्या.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आम्ही जो ठराव केला आहे तो सर्वानुमते होणार असेल तर ठिक आहे. नाही तर आम्हाला भीक नकोय आम्ही घेणार नाही. आम्ही आमचा ठराव मागे घेतो.

निलम ढवण :-

मग अजिबात नको आम्हाला.

प्रशांत दळवी :-

आज कल्याण डोंबिवली, ठाणे महानगरपालिका सगळ्या महानगरपालिका देत आहे ना. अनुदान उद्या जर आपल्या इकडे नाट्य संमेलन भरवणार असेल तर आपल्यालाही महानगरपालिकेतर्फे घ्यावे लागणार ना.

निलम ढवण :-

आणि ठाणे जिल्ह्यामध्ये मिरा भाईंदर येते अस पण नाही कुठेतरी उचलून आपण मिरा भाईंदरवाले देतो.

प्रशांत दळवी :-

आपण स्वतः महापौर मॅडम प्रथम नागरिक म्हणून त्या नाट्यसंमेलनाला गेल्या होत्या ना.ठाणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीने सुध्दा विनंती केली ना आणि आपण ही त्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

निलम ढवण :-

या नाट्य परिषदेसाठी जर द्यायचे नसतील तर या पुढे कुठचाही तुम्ही निर्णय घेतला तर त्याला आमची सहमती नसणार.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम शासनाचे राष्ट्रीय जे कार्यक्रम घेतात त्याला महानगरपालिकेचा आपला इतिहास आहे. नगरपरिषद महानगरपालिका जी महानगरपालिका करते ती मागते असा अर्थ लावू नका हे शासनाचे निर्देष असतात आपल्याकडे जर पुढच्या वर्षी आपण हा कार्यक्रम घेतलातर अशीच आपली पत्र वेगवेगळ्या महानगरपालिकेला जाणार आणि शासनाचे त्यावर निर्देश असतात की तुम्ही तुमच्या परिने हातभार लावायचा असतो. याच्यात निर्णय कसा घ्यायचा तो तुम्ही निर्णय घ्या. पण ते मागतात आपण देत नाही किंवा आपण मागतो ते देणार नाही अस नाही. हे कार्यक्रम परत येत असतात आणि वेगवेगळ्या महानगरपालिकेकडे येणारच ते. या वर्षी नाही तर पुढच्या वर्षी येणार. निर्णय काय घ्यायचा तो घ्या.

प्रभात पाटील :-

माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही का कोणी देणार.

मा. महापौर :-

ते सांगतात त्यांना अजुन काही माहिती नाही. आता आपला जो विषय आहे त्यावर येऊ या. निलमताई आपल्यालाही माहित आहे की आपली तेवढी तरतूद नाही. आपण पुर्नविनियोजन करु तस काही त्याच दूमत नाही. पण मी मधला मार्ग एक सांगू का, जर सगळ्यांना मान्य असेल तर.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, सगळ्या गोष्टीमध्ये जेव्हा आर्थिक बाब कमी होते तेव्हा पुर्नविनियोजन आपण करतो. सगळ्या गोष्टीसाठी तुम्ही करता ना याचं ही करा ना मग. आमची जी मागणी आहे. २५ ची ती मागणी २५ राहणार. त्यामध्ये आकड्यांमध्ये बदल होणार नाही. एरवी तुम्हाला काय बोलायचं असेल तर बोला.

मा. महापौर :-

निलमताई आपण ही थोडा विचार करायचा असतो की आपली लहान आहे त्यांची मोठी आपली ड वर्ग आहे. त्यांचा बजेट आणि आपला बजेट फरक आहे.

निलम ढवण :-

अनाठायी खर्च होतो तेव्हा नाही विचार करत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती काय आहे. अनाठायी खर्च होतो मॅडम तो खर्च वाचवा. या नाट्यसृष्टीचा प्रश्न आहे. त्यासाठी आपल्याकडून एवढी रक्कम गेली पाहिजे.

मा. महापौर :-

मी तुम्हाला सांगते माझ्या वतीने की आपण ११ लाख पाठवू या. कारण २५ पण आपल्यासाठी खूप मोठी रक्कम आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, आपण आता किमान वेतन आयोग लागू करणार आहोत. आज जर तो ठराव तुम्ही ७ दिवसांनी पारित केला तर १ कोटी ९६ लाख रुपये कुठून आणणार. आपल्याकडे आहेत का आयुक्तांना विचारा.

मा. महापौर :-

आपल्याकडे अकराही नाहीत. आपल्याकडे २ कोटीही नाही ११ ही नाही. तरतूद आता आपल्याकडे दोघेही नाही. ठाणेसारखी मोठी महानगरपालिका जेव्हा २५ करते आपण त्यापटीने खूप कमी आहोत.

निलम ढवण :-

असू द्या कल्याण डोंबिवली आहेत बाकीच्या महानगरपालिका आहेत त्यांनी देखील केलेले आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आपण थोड मोठ मन दाखवा ना.

मा. महापौर :-

प्रशांत भाई मोठं मन दाखवून आपली तिजोरी मोठी होत नाही ना.

प्रशांत दळवी :-

मी काय म्हणतो आतापर्यंत दिले नाही २०१५ ला सफाई कामगाराचे किमान वेतन २०१५ ला लागू झालेले आहे. आजमितीस दिले नाही ना आपण त्यांना.

भगवती शर्मा :-

दळवी साहेब यह मराठी अस्मिता का सवाल है।

प्रशांत दळवी :-

आम्ही तुम्हाला शिवसेनेच्या माध्यमातून सर्व सन्मा. सदस्यांच्या माध्यमातून हात जोडून विनंती करतो एकदा की आपण ही त्या नाट्य संमेलनाला गेलात. किती खर्च झाला आपण ही बघितलं आहे.

मा. महापौर :-

आपण आपली चादर बघावी.

निलम ढवण :-

द्यायचे असेल तर मॅडम उगाचच सभागृहाचा, सन्मा. सदस्यांचा वेळ वाया जायला नको. तुम्ही २५ देणार असाल तर अनाउन्स करा. नसेल तर आम्हाला एक पैसाही नको. मग सभा संपली म्हणून जाहिर करा.

(सभागृहात गोंधळ)

प्रशांत केळुसकर :-

२५ लाख करुन घ्या.

निलम ढवण :-

धन्यवाद प्रशांत केळुसकर.

प्रशांत केळुसकर :-

मी माझा ठराव मागे घेतो.

मा. महापौर :-

माझं रुलिंग ऐका मी इथून २५ लाखांची मंजूरी देते पण पुर्नविनियोजन करुन.

प्रकरण क्र. १७७ :-

ठाणे येथे होणाऱ्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेल्लनासाठी महानगरपालिकेतर्फे निधी देणेबाबत.

ठराव क्र. १३९ :-

फेब्रुवारी २०१६ मध्ये “९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेल्लन” ठाणे येथे संपन्न होणार आहे. सदर नाटय संम्मेलन हे ठाण्याचे वैभव ठरविणारे असल्याने संपूर्ण भारतभरातून मोठया प्रमाणावर नाटककार उपस्थित राहून त्यांचे कला अविष्कार दाखविणार आहेत. या संम्मेलनातून मराठी नाटय प्रकार जनतेसमोर ठेवण्याच्या दृष्टीने नाटय संमेल्लन हे उत्तम व्यासपीठ आहे. सदर नाटय संम्मेलन दोन दिवस चालणार असून या दोन दिवसात मुख्य संमेल्लन, संमेल्लन पूर्व कार्यक्रम, नाटयदिंडी, नाटय विषयक प्रदर्शने, जिल्हयातल्या, राज्यातल्या कलाकारांचे कार्यक्रम तसेच बालरंगभूमी, हौशी रंगभूमी, प्रायोजिक रंगभूमीसह सर्व घटकांना सामावून होणारे हे संमेल्लन आयोजन करण्यासाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करावा लागणार असल्यामुळे सदर नाटय संमेल्लनासाठी महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करून देणे करिता मा. पालकमंत्री, मा. श्री. एकनाथ शिंदे व मा. आमदार, श्री. प्रताप सरनाईक यांनी संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे.

अर्थसंकल्पिय लेखाशिर्ष नगरभवन व सभागृह मधील ३ वर आर्ट गॅलरी व प्रदर्शने भरविणे अंतर्गत रू. ५ लाखाची तरतुद उपलब्ध आहे. सदर तरतुदीमध्ये अतिरिक्त रु. २० लाखाची तरतुद उपलब्ध करुन ठाणे येथे होणाऱ्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेल्लनासाठी महानगरपालिकेतर्फे रु. २५ लाख इतका निधी देण्यात यावा, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रभात पाटील :-

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने दिले नाही. प्रशासनाचा निषेध आहे. प्रशासनाला मिरा भाईंदर शहराच्या विकासामध्ये गती नाही, रस नाही.

मा. आयुक्त :-

पाटील मॅडम विशेष महासभा आहे. इलेव्हन हवर्सला काहीही प्रश्न विचारला तर प्रशासनाला ते बंधनकारक नाही.

प्रभात पाटील :-

किती विषय चर्चेला आले इथे. तुम्हाला या विषयामध्ये इंटरेस्ट नाही. शहराच्या विकासामध्ये इंटरेस्ट नाही. त्यामुळे मी सभागृहातून सभात्याग करते. माझ्या २५ वर्षाच्या इतिहासातील पहिला सभात्याग आहे.

मा. महापौर :-

भारतीय जनता पार्टीचे गटनेता श्री. शरद केशव पाटील यांचे पत्र आहे. त्याप्रमाणे आता सभागृह नेताची नेमणून आज होणार आहे. सभागृह नेत्याचे नाव श्री. मुन्ना सिंग यांना मी सभागृह नेता म्हणून आजपासून घोषित करते.

प्रशांत केळुसकर :-

महापौर मॅडम आमच्या गटनेत्यांनी आपणास जे पत्र दिले त्याप्रमाणे आपण नियुक्ती केली. पण मी आपल्या एक निदर्शनास आणून देऊ इच्छितो की जेव्हापासून सभागृह नेते पद हे आमचे वरिष्ठ काका यांच्याकडे होते त्यांनी खूप चांगल्या प्रकारे सभागृह नेत्याचे कार्य एकदम व्यवस्थित पार पाडले आहे त्याबद्दल मी त्यांचे खूप अभिनंदन करतो.

मा. महापौर :-

काका, आम्ही पण तुमचे अभिनंदन करु इच्छितो कारण तुम्ही खरच खूप चांगली कामगिरी केली आहे.

रोहिदास पाटील :-

महापौरांनी केलेल्या सूचनेनुसार सभागृह नेत्याची जबाबदारी काही काळापुरती माझ्याकडे दिली होती. आज दिलेल्या सुचनेनुसार मी कारकिर्दितून मुक्त झालो. त्याबद्दल महापौरांचे मी आभारी आहे. धन्यवाद या कार्यकालामध्ये सर्व सभागृहाच्या सदस्यांनी, अधिकायांनी जे काही सहकार्य केले त्यांचही मी आभार मानतो.

नयना वसाणी :-

आदरणीय माजी नगरसेवक श्री. रामनारायण दुबे यांच्या धर्मपत्नी सौ. जाऊत्रीदेवी दुबे यांचे २०/२/२०१६ रोजी निधन झाले आहे. तसेच ए.बी.पी. माझाचे पत्रकार श्री. प्रभाकर कुडाळकर यांचे ज्येष्ठ बंधु श्री. रामचंद्र कुडाळकर यांचेही काल रात्री निधन झाले आहे. सन्मा. सदस्यां तर्फे सभागृहाच्या वतीने त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

रोहिदास पाटील :-

लक्ष्मण पांडुरंग पाटील यांचेही निधन झाले तसेच सिमेवरील सियाचीनमध्ये जे आपले सैनिक शहिद झाले त्यांचा ही मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

दुःखवठा ठराव क्र. १३९अ :-

माजी नगरसेवक श्री. रामनारायण दुबे यांच्या धर्मपत्नी सौ. जाऊत्रीदेवी दुबे यांचे २०/२/२०१६ रोजी निधन झाले आहे. तसेच ए.बी.पी. माझाचे पत्रकार श्री. प्रभाकर कुडाळकर यांचे ज्येष्ठ बंधु श्री. रामचंद्र कुडाळकर यांचेही काल रात्री निधन झाले आहे. सन्मा. सदस्यां तर्फे सभागृहाच्या वतीने त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच लक्ष्मण पांडुरंग पाटील यांचेही निधन झाले तसेच सिमेवरील सियाचीनमध्ये जे आपले सैनिक शहिद झाले त्यांचा ही मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. नयना वसाणी     अनुमोदन :- श्री. रोहिदास पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

सर्वांनी २ मिनिटे जागेवर उभे राहून मृतात्म्यास श्रध्दांजली वाहायची आहे.

(सभा संपण्याची वेळ संध्या ६.४१)

सही/-
महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका